


त्वं हि दुर्गा दशप्रहरण - धारिणी
कमला कमल - दल विहारिणी
वाणी विद्यादायिनी
नमामि त्वां
नमामि कमलाम् अमलाम् अतुलाम्
सुजलां सुफलां मातरम्
वन्दे मातरम् ॥

बंकिमचंद्र

# 'स्व'-रूपवर्धिनी

कार्यवृत्त १९९६ - ९७

# 'स्व'-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त १९९६-९७

अं त रं गा त


| | |
|---|---|
| मनोगत | |
| उपक्रम वृत्त | |
| व्यक्ति व्यक्ति घडविणे मार्ग हा भला | श्री. पंकज मीठभाकरे |
| यात्रा चार सेवाधामांची | श्री. केदार मुकुंद पारगावकर |
| एक सुखद अनुभव : शाखा चिमुरड्यांची | श्रीमती पुष्पाताई नडे |
| शिवारातलं सोनं | कुमारी वैभवी पवार |
| अरूणाचलाच्या दैनंदिनीतील चार पाने | वैद्य कु.मनिषा बोईन |
| शब्देविणे संवादिजे | वैद्य कु.मनिषा बोईन |
| बांधीलकी 'स्व'रूपवर्धिनीशी | श्रीमती जयवंती कलबाग |
| वाढता वाढता वाढे | |
| आदरांजली | |



*संपादक*

**श्री. जयंत कवठेकर**

*मुद्रण*

**प्रबोध उद्योग**, शुक्रवार पेठ, पुणे - २

**अभय मुदणालय,** टिळक रोड, पुणे - २

मुखपृष्ठ व रेखांकने

**श्री. सचिन जोशी / श्री मिलिंद सबनीस / श्री. अरुण फडणीस**

# 'स्व'-रूपवर्धिनी म्हणजेच ...

- सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडविणारी संस्था
- व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्याद्वारा
  हेतुप्रधान शिक्षण देणारी एक चळवळ
- आपुलकीने व जिव्हाळयाने मुलांचे प्रश्न हाताळणारा,
  सर्वांना आपलासा वाटणारा परिवार
- विपरित परिस्थितीवर मात करायला शिकविणारी कार्यशाळा
- राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि
  सामाजिक बांधिलकी जोपसणारा
  एक संभाव्य 'राष्ट्रीय प्रकल्प'
- परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला,
  तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखविणारी
  आपुलकी निर्माण करणारी संघटना
- अर्थात, ही पूर्ण वेळची शाळा नाही; शाळेला पर्यायही नाही.
  विविध उपक्रमांद्वारे एकही दिवस सुट्टी न घेता
  वर्षभर सायंकाळी राबविला जाणारा एक शिक्षण प्रकल्प आहे.

***With Best Compliments From :***

**M/S. BALDOTA SAMAL AND ASSOCIATES**

**KRUTANJALI**

65/20, Erandawana, Shangrilla Restaurant Lane,
Law College Road, Pune : 411 004.
Tel : 333200 Fax : 332300

# मनोगत

स्वातंत्र्याचं अर्धशतक ओलांडलं. आपण सर्वजण अर्धशतक महोत्सवही साजरा करीत आहोत. पण अद्याप हवं तितकं स्थैर्य नाही. आहे तो निवाराही...बऱ्याच ठिकाणी खांब उलथून गेलेले, अनेक ठिकाणी वासे कललेले - असा उद्‌ध्वस्त धर्मशाळेसारखा!

दुर्दैवानं ज्यांच्या हाती घराच्या किल्ल्या सोपविलेल्या, त्यांनीच आपल्या स्वार्थी, भ्रष्ट, ढोंगी आणि मदांध सत्ताकारणानं, या घराचा लिलाव मांडलेला!!

एका बाजूला असं मन खिन्न करणारं आपल्या घराचं - देशाचं रूप दिसत असतानाच दुसऱ्या बाजूला या गडद अंधाराला उजळून टाकणाऱ्या असंख्य ज्योती पेटताना दिसत आहेत. देशाच्या जडण-घडणीचं काम अत्यंत जोमानं चालू असलेलं दिसत आहे. तन- मन- धन अर्पण करून समाजोध्दारासाठी झटणारे, सळसळत्या रक्ताचे व उमद्या मनाचे कृतिवीरही दिसत आहेत.

'आपणच आपल्या जीवनाचे व आपल्या देशाचेही शिल्पकार आहोत' अशा आत्मसाक्षात्काराने त्यांनी या सेवाकृती यज्ञात आपली समीधा देऊन टाकली आहे.

खरे समाजपरिवर्तन अशा कृतिवीरांच्या निःस्वार्थ, निरपेक्ष कृतीद्वाराच घडणार आहे. म्हणूनच अशा कृतिशील देशभक्तांच्या पावलांचा मागोवा घेत घेत 'ही माय धन्य होईल। वैभवी दिव्य शोभेल।' या आकांक्षेनं 'स्व'रूपवर्धिनी गेली एकोणीस वर्षे काम करीत आहे. त्या कामाची, गतवर्षातल्या वाटचालीची रुपरेखा या कार्यवृत्तात सुहृदांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

# थोडेसे मुखपृष्ठासंबंधी



यंदाचं वर्ष हे स्वातंत्र्याचं अर्धशतकपूर्ती वर्ष. स्वातंत्र्याचं अखंड प्रेरणास्रोत असलेल्या 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताचं ऋण सच्चा भारतीय कधीच विसरू शकत नाही. म्हणूनच बंकिमचंद्रांमधील ऋषीप्रज्ञेला भावलेलं, अरुणोदयाच्या रंगानं उजळलेल्या क्षितिजावर विराजमान झालेलं, गंगेच्या प्रवाहातून प्रकटलेलं, भारतमातेचं दुर्गेच्या रूपातलं, ज्योतिर्मय स्वर्णमयी रूप या अंकाच्या मुखपृष्ठावर चित्रांकित केलं आहे. विविध शस्त्रास्त्रे व आभुषणे यांनी लखलखणाऱ्या दशभुजा, पदतली छिन्नाविच्छिन्न होऊन चिरडला गेलेला असुर आणि तिच्या चरणतलाजवळ शत्रूला लोळविणारा तिचा शक्तिशाली सिंह! अशा रूपातली 'सुजलाम्, सुफलाम्' आणि 'दशप्रहरण धारिणी दुर्गा' आपणा सर्वांना विजयपथावर मार्गक्रमणा करण्यासाठी निश्चितच प्रेरणा देईल.

# कार्यकारिणी व मा. सभासदांची यादी

## सन्माननीय सभासद

श्री. जयसिंगभाई मरिवाला
श्री. अविनाश वारदेकर
श्री. एम. ए. बदूदखान

## कार्यकारी समिती

अध्यक्ष
**श्री. पु. व श्रॉफ**

उपाध्यक्ष
**श्री. अ. न. गोगावले**

कार्याध्यक्ष
**श्री. कृ. ल. पटवर्धन**

सहकार्याध्यक्ष
**श्री. व ना. दाते**

सहकार्याध्यक्षा
**श्रीमती कुंतला मुजुमदार**

कोषाध्यक्ष
**श्री. श्री. शं. सामळ**

कार्यवाह
**श्री. रा. प. देसाई**

सहकार्यवाह
**श्री. शिरीष रा. पटवर्धन**

**'स्व'-रूपवर्धिनी**
२२/१, मंगळवार पेठ,
पारगे चौक,
पुणे – ४११ ०११
दूरध्वनी : ६२१७०४

## सभासद

श्री. प्रतापराव पवार
श्री. वा. दे. संचेती
श्री. कां. गि. शहा
श्री. कृ. गो. लवळेकर
प्रा. श्रीमती उषःप्रभा देसाई
श्री. उदय गुजर
श्री. पुखराजजी जैन
सौ. चंद्राताई दलाया
श्रीमती पुष्पाताई नडे
श्री. नंदकिशोर सोंडूर
श्री. संजय विष्णू तांबट
श्री. कन्हैय्यालाल बलदोटा

## संपर्क :-

कार्याध्यक्ष :
श्री. कृ. ल. पटवर्धन
४२८/२०, शिवाजीनगर,
पुणे – ४११ ०१६.
दूरध्वनी : ३५५८३५

कार्यवाह
श्री. रा. प. देसाई
दूरध्वनी : ६८४३७५

सहकार्याध्यक्षा
श्रीमती कुंतला मुजुमदार
दूरध्वनी : ३५३६०६

सहकार्यवाह
श्री. शिरीष पटवर्धन
दूरध्वनी : ६३४३१०

कार्यालय :
श्री. रामकृष्ण रानडे
दूरध्वनी : ६२१७०४

'स्व' रूप वर्धिनी कार्यवृत्त १९९६/९७

# दैनंदिन प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

१) **रामकृष्ण शाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११.
शाखाप्रमुख : **श्री. केदार पारगावकर**
शाखापालक : **श्री. शिरीष पटवर्धन**

२) **समर्थ रामदास शाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११.
शाखाप्रमुख : **श्री. निशिकांत वाईकर**
शाखापालक : **श्री. विलास कुलकर्णी**

३) **विवेकानंद शाखा**
रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय,
पांडवनगर, वडारवाडी, पुणे १६.
शाखाप्रमुख : **श्री. पंकज मुंडे**
शाखापालक : **श्री. र. ज. नरवणे**

४) **अखंडानंद शाखा**
कै. यशवंतराव चव्हाण विद्यालय,
बिबवेवाडी, पुणे ३७.
शाखाप्रमुख : **श्री. विनोद बिबवे**
शाखापालक : **श्री. राजाभाऊ लवळेकर**

५) **सुबोधानंद शाखा**
ज्ञानदा प्रशाला, नवसह्याद्री वसाहत,
कर्वेनगर, पुणे ५२.
शाखाप्रमुख : **श्री. अमोल उंदरे**
शाखापालक : **श्री. व. ना. दाते**

६) **भगिनी निवेदिता शाखा**
आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे ११.
शाखाप्रमुख : **कु. किरण राठी**
शाखापालक : **श्री. शिरीष पटवर्धन**

७) **'आजोळ'**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११.
प्रकल्प प्रमुख : **श्री. जयंत कवटेकर**
संपर्क : **सोम. ते शुक्र. १ ते ५**

८) **शारदामणि महिला विभाग व बालवाडी 'पाकोळी'**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११.
प्रकल्प प्रमुख : **श्रीमती पुष्पाताई नडे**
संपर्क : **सोम. ते शुक्र. स. १० ते १**
**शनि. ९ ते १०.३०**

९) **वीर अभिमन्यू बालशाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११.
शाखाप्रमुख - **श्रीमती पुष्पाताई नडे**

१०) **कार्यालय**
**१) श्रीमती वासंतीताई यादव**
**२) कु. स्मिता कुलकर्णी**
**३) श्री. रामकृष्ण रानडे,** व्यवस्थापक
**४) श्री. पुरुषोत्तम अभ्यंकर**
**संपर्क : सोम. ते शनि. ११ ते ५**

**दैनंदिन शाखांसाठी संपर्क :**
सोम. ते शुक्र. सायं. ६.१५ ते रात्रौ. ८.३०
शनिवार दु. ४.३० ते सायं. ७.३०
रविवार स. ७.३० ते १०.००

**प्रधान शाखापालक**
**श्री. दि. दा. जोशी**
जनता गृहरचना संस्था,
बिबवेवाडी, पुणे ३७.

# विजयाचे वारस आम्ही

- ★ विद्यावाचस्पती ही सन्मानाची पदवी पुणे विद्यापीठाने, वर्धिनीतील एक नामवंत शिक्षक कार्यकर्ते श्री. विनयकुमार आचार्य, यांना त्यांच्या गणित विषयातील संशोधनपर बहाल केली.
- ★ श्री. प्रसाद जमाखिंडीकर यांनी इंजिनिअरिंग पदवीनंतर टोलॅडो विद्यापीठ, अमेरिका येथून एम्.एस.ची पदवी उत्तम गुणांसह मिळवली.
- ★ कु. पंकज मुंडे हा मार्च १९९७ च्या माध्यमिक शालांत परीक्षेत गुणवत्ता यादीत २० व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला.
- ★ कु. हनुमान सकट याने पुणे म.न.पा. च्या आंतरशालेय चित्रकला स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळवले.
- ★ कु. माधव सावंत याची राज्य पातळीवरील मुष्टीयुध्द स्पर्धेसाठी निवड झाली.
- ★ कु. रोहीणी तेंडूलकर ही विज्ञान शाखेची पदवी परीक्षा विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाली आणि लगेचच अरूणाचल प्रदेशात वनवासी क्षेत्रात पूर्ण वेळ काम करण्यासाठी तिकडे रवाना झाली.
- ★ सौ. संगीता यादव या प्रशिक्षण पूर्ण करून नुकत्याच पोलिस उपनिरीक्षक म्हणून पोलीस दलात भरती झाल्या.
- ★ तुषार जगताप हा ७वी मधील वर्धक विश्वकर्मा विद्यालयाचा आदर्श विद्यार्थी म्हणून सन्मानित.

आपुलकीच्या अश्रूंनी दुदैवी माणसाच्या मनातला वणवा विझतो.

'स्व' रूप वर्धिनी कार्यवृत्त १९९६/९७

# उपक्रम वृत्त

**संक्रांत उत्सव - शाखा विभाग :-**

दि. १९ जानेवारी रोजी शाखा विभागाचा संक्रांत महोत्सव आगरकर हायस्कूल येथे संपन्न झाला. वर्धकांच्या विविध चित्तथरारक प्रात्याक्षिकांनी साऱ्यांची मने जिंकली. यावर्षीच्या प्रात्याक्षिकांचा नूरच काही और होता. रामकृष्ण शाखेतील मुलांच्या हातातील जळत्या बोथाटींवर नजर ठरत नव्हती, तर विवेकानंद शाखेने दमदार असे नियुध्द प्रात्याक्षिक सादर केले. अखंडानंद शाखेची छुरीकांची पाती आकर्षक पदविन्यासात चकाकत होती. समर्थ शाखेने मानवी मनोरे रचलेले होते. सुबोधानंद शाखेच्या जळत्या कड्यांतील उड्यांनी साऱ्यांचेच श्वास रोखले गेले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. प्राज उद्योगसमूहाचे श्री. प्रमोद चौधरी. सहप्रांतप्रचारक श्री. सुहासराव हिरेमठ यांनी आपल्या मार्गदर्शनाने साऱ्यांची अंतःकरणे भारून टाकली.

**महिला व युवती विभाग :-**

दि. २६ जानेवारी ९७ रोजी महिला विभाग, युवती विभाग व प्रकल्प विभाग यांचा संक्रांत महोत्सव आगरकर हायस्कूलच्या प्रांगणात साजरा झाला श्री. चंदुभाई शहा हे समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. ॲड. सौ. निलिमा गोखले, या प्रमुख वक्त्या होत्या. दि. २६ जानेवारी ९७ रौजी प्रजासत्ताक दिनानिमित्त कार्यक्रमाचा प्रारंभ 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीतानं झाला. बालवाडीतल्या पाकोळयांनी अभिनय गीते, एक नाटुकले सादर केले. आजोळ प्रकल्पाची योगव्यायामाची प्रात्याक्षिके झाली. वीर अभिमन्यू या बालशाखेनं 'शिवरायांनी भवानी मातेला घातलेलं साकडं' 'गोंधळ' कार्यक्रमातून सादर केलं. भगिनी निवेदिता शाखेनं लेझीम प्रात्याक्षिक दाखवलं. युवती गटानं 'माते मंगलमय माते' हे पद्य सांघिक स्वरात गायिले.या कार्यक्रमामध्येच एकसष्ठीनिमित्त वर्धिनीतील सर्वप्रिय असे श्री. जयंतराव कवठेकर व श्री. रामकृष्ण रानडे यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर संघचालक मा. मल्लप्पा सोलापूरे, यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या संपूर्ण कार्यक्रमाकरिता उपस्थित असलेले श्री. अत्रे यांनी दुसऱ्या दिवशी दैनिक केसरीत या कार्यक्रमाबद्दल गुणगौरवपर पत्र लिहून वर्धिनीच्या या सोहळयाला उत्स्फूर्त दाद दिली.

## रथसप्तमी

चैतन्यमय अशा सृष्टीचा मुकुटमणी असा जो तेजोनिधी सूर्य त्याचा महाउपासना दिन म्हणजे रथसप्तमी. दरवर्षीप्रमाणेच यावर्षीही या उपासनादिनी सूर्यनमस्कार या तेजोमय बलसाधन अभियानासाठी वर्धिनीचे वर्धक- वर्धिका कार्यकर्ते, शिक्षक, महिला विभागातील प्रशिक्षणार्थी इत्यादि सुमारे ५० जणांनी सकाळी ७ वाजता पूर्वक्षितिजांवरील मंगलमय तेजोगोलाला वंदन करून १३ सूर्यनमस्कार घातले. शेवटी गगनराज भास्कराची आराधना करताना सर्वमुखी हेच स्वर होते.


**अकालमृत्युहरणम् । सर्व व्याधी विनाशनम् ।**
**सूर्य पादोदकं तीर्थम् । जठरे धारयाम्यहम् ।**

## वर्षप्रतिपदा

हिंदू संस्कृतीचा गौरवशाली नववर्षदिन. वर्षाच्या या प्रथमदिनी वर्धिनीचे सर्व कार्यकर्ते, मार्गदर्शक, वर्धक, वर्धिका संपूर्ण गणवेशात सकाळी ६.१५ वाजता ओंकारेश्वर शिवालयाच्या धीरगंभीर सभामंडपात ध्यानस्थ अवस्थेत बसले आहेत. तानपुऱ्याच्या मंगलमय स्वरमंडलाबरोबर गायत्री मंत्राचे प्रचोदक शब्द आसमंतात चिरंतन विशुध्दता भरत आहेत. अशा भारावलेल्या वातावरणात, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्वांचलातील जेष्ठ प्रचारक श्री. मधुजी लिमये यांनी उपस्थित असलेल्या सुमारे ८० कार्यकर्त्यांचे, वर्धक- वर्धिकांचे अत्यंत तळमळीने प्रबोधन केले. आव्हानात्मक परिस्थितीत आसामातील त्यांनी केलेले संघकार्याचे वर्णन प्रत्येकाच्या ठिकाणी 'आपणही आयुष्याचा काही काळ, प्रतिकूल अशा सीमावर्ती भागात, काम केलेच पाहिजे'! अशी प्रेरणा जागृत करणारे होते.

# रक्षाबंधन

भगिनी निवेदिता शाखेने यंदाच्या वर्षी मुली व युवती यांचे चार गटांत विभाजन करून चार वेगवेगळया उपक्रमांतून रक्षाबंधन साजरे केले. एका गटानं, स्वातंत्र्यप्राप्तीच्या अर्धशतकपूर्तीनिमित्त पुण्यातील काही स्वातंत्र्य सैनिकांच्या घरी जाऊन त्यांना कृतज्ञताभावानं रक्षाबंधन करून बंधुत्वाचं नातं जोडलं. एका गटानं, दूर अरूणाचलातून पुण्यात येऊन शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना रक्षाबंधन केलं. एक गट इथून पंचेचाळीस किलो मीटरवर असलेल्या 'माले' (ता. मुळशी) या गावी गेला. स्वरूपवर्धिनी व विज्ञानभारती यांच्या 'फिरती प्रयोगशाळा' प्रकल्पात सामावलेलं हे गाव. तिथल्या शाळेतल्या लहान मुलांचे या गटानं खेळ घेतले, गप्पागोष्टी केल्या आणि एका अभिनव पध्दतीनं रक्षाबंधन साजरं केलं. चवथ्या गटानं शाखेतल्या काही विद्यार्थिनींच्या घरी संपर्क करून पालकांना रक्षाबंधन केलं



आजोळ प्रकल्पातली १० ते १२ मुलं मुली प्रतिवर्षाप्रमाणे ह्या वर्षी कमला नेहरू रूग्णालयात गेली होती. रूग्णांच्या बरोबर असलेले नातेवाईक, डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी या सगळयांना रक्षाबंधन केलं. सर्वांचा प्रतिसाद आपुलकीचा, कौतुकाचा होता. त्याच दिवशी सकाळी जन्मलेल्या एका चिमुरडीच्या आईनं आजोळच्या एका छोट्या वर्धकाला हाक मारून बोलावलं आणि मुद्दाम राखी ठेऊन घेतली. नंतर त्याला म्हणाली , "आजच माझी छोटी जन्माला आली आणि लगेच तिला भाऊ मिळाला!"

बालशाखासुध्दा सर्व उपक्रमांत आघाडीवर असते. यंदा रक्षाबंधनाच्या उपक्रमात या बालवीरांनी एक वेगळाच उच्चांक प्रस्थापित केला. 'स्व'रूपवर्धिनीकडे 'स्वयंसिध्दा' या अंधभगिनींच्या संस्थेने तयार केलेल्या उत्तमोत्तम राख्या विक्रीकरिता ना नफा ना तोटा या स्वरूपात येतात. सर्व शाखा व प्रकल्प यांच्याद्वारे या राख्यांची विक्री केली जाते. यंदाच्या वर्षी बालशाखेने निवेदिता शाखेप्रमाणेच जास्त राख्या विकून एक उच्चांक प्रस्थापित केला.

याशिवाय विविध शाखांमधील एकूण ४०० मुलांनी व युवकांनी शाखास्थानाच्या परिसरातील वस्त्या, कोथरूड व रामटेकडी येथील अंधशाळा, ससून, ताराचंद इ. रूग्णालये, शाखेच्या संपर्कातील प्रतिष्ठित नागरिक, पोलीस अधिकारी, नगरसेवक यांच्याशीं रक्षाबंधनदिनी बंधुत्वाचं नातं जोडलं.

**शरीर ह्या मोठ्या शत्रूवर विजय मिळविण्याकरिता सतत धडपडत राहाणं हेच मनुष्याचं प्रथम कर्तव्य आहे.**

# स्मरण स्वातंत्र्याचे

### * युवती विभाग

स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्ताने स.प. महाविद्यालय व फर्ग्युसन महाविद्यालय येथे वर्धिनीच्या युवतीगटाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात 'स्वातंत्र्याच्या ५० वर्षात आपण काय मिळवले व काय गमवले ?' हा विषय महाविद्यालयात सुमारे २०० विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आला. या कार्यक्रमाला दोन्ही ठिकाणी विद्यार्थी व प्राध्यापक यांचा अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला.

### * शाखा विभाग

शाखांतर्गत रंगलेल्या अनेक मैदानी स्पर्धांनी बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाचे मैदान कार्यक्रमाच्या पूर्वार्धाने दणाणून टाकला. कार्यक्रमास सर्व शाखांचे मिळून १६५ जण उपस्थित होते. उत्तरार्धात आपल्या प्रमुख भाषणात ॲड. नंदू फडके यांनी गतकाळातील आपणा भारतीयांच्या योग्य-अयोग्य, प्रसंगांचा आढावा घेत राष्ट्रोध्दारासाठी आपल्या प्रमुख कर्तव्यांविषयी वर्धकांचे उद्‌बोधन केले. या सर्व कार्यक्रमाचे संयोजन दरवर्षीप्रमाणे विवेकानंद शाखेनेच केले होते. 'राष्ट्र की जय चेतना का गान वंदेमातरम्' या पद्यपंक्ती हृदयस्थ करूनच जो तो स्वस्थानी परतला.

### *दिवाळीतील स्पर्धा

स्वातंत्र्याच्या ५० व्या वर्धापनानिमित्त दिवाळीच्या सुटीत स्पर्धा घ्यायच्या असे ठरविले. अत्यंत अटीतटीने परंतु खेळीमेळीच्या वातावरणात सर्व वर्धकांनी या स्पर्धांची कसून तयारी केली व विजयाचा आनंद लुटला.

शारीरिक व बौध्दिक सदरातील अशा या ५० स्पर्धा खालीलप्रमाणे होत्या.

#### *शारीरिक स्पर्धा :-

कब्बडी, लंगडी, खोखो, फुटबॉल, डॉजबॉल, बेसबॉल, गोल खोखो, राऊंड रन्स, कुस्ती, बॉक्सिंग, ध्वजयुध्द, धर्मगुरू, रस्सीखेच, धावणे, लांब उडी, उंच उडी, गोळा फेक, दंडगोल, स्लो-साईकलींग, सूर्यनमस्कार, आदर्श समता व जोर बैठका, वजन उचलणे, फास्ट साईकलिंग, टेली मॅचेस.

#### *बौध्दिक स्पर्धा :-

वाद-विवाद, इंग्रजी संभाषण, विमान पडते आहे, विनोद सांगा, आदर्श वाचन, हस्ताक्षर, वक्तृत्व, उत्स्फूर्त भाषण, प्रसंगनाट्य, प्रश्नमंजूषा, नकला, खजिनाशोध, कथाकथन, पद्य स्पर्धा, चित्रकला, हस्तकला, आदर्श पद्यवही, वस्तुसंग्रह मुक-अभिनय, वेषभुषा, पदार्थ-निर्माण, पाढे पाठांतर, स्मरणशक्ती, सर्वाधिक संपर्क, गायन

#### पुढचे पाऊल पुढेच टाका :-

पुण्याच्या मध्यवर्ती भागात रमणबाग प्रशाला येथे व गोखलेनगरचे वीर बाजीप्रभू विद्यालय या दोन ठिकाणी येत्या नोव्हेंबरपासून प्रायोगिक स्वरूपात नवीन शाखांची सुरूवात केली आहे. रमणबागेमध्ये सुरेंद्र खेडकर व गोखलेनगरमध्ये मंदार रायरीकर हे युवक कार्यकर्ते शाखाप्रमुख म्हणून कार्यभार सांभाळीत आहेत.

१४ ऑगस्ट ते १६ ऑगस्ट ९७ असे तीन दिवस दिवंगत स्वातंत्र्य सैनिक नानासाहेब गोखले यांच्या संकल्पनेनुसार चित्रकार श्री. केळकर यांनी रेखाटलेल्या स्वातंत्र्यसंगर चित्रावलीचे प्रदर्शन वर्धिनीत आयोजित केले होते. सुमारे ६०० जणांनी या प्रदर्शनीला भेट दिली.



# भ्रमंती - डोंगरवाटांनी

★ आजोळ प्रकल्पाची निवासी सहल प्रथमच योजली होती. सहल राजगडला ऐन उन्हाळयात काढण्यात आली होती. वाटेत गाडी बंद पडणे, म्हणून गडावर पोचण्यास उशीर होणे, परिणामी निवासाला अगदी मोजकी जागा मिळणे, मेणबत्त्या वाऱ्यानं टिकत नसल्यानं मोजक्या विजेऱ्यांच्या उजेडात - जवळ जवळ अंधारातच शाखा, प्रार्थना, आणि शेवटी डबे खाणे, इत्यादि सर्व गंमती साग्रसंगीत घडल्यानं सहलीला खरी मजा आली! सगळयात रोमहर्षक अनुभव होता बालेकिल्ला चढाईचा, आणि उतरण्याचा ! शेवटी राजगडाच्या पायथ्याला तळपणाऱ्या उन्हात, एका माऊलीनं वाफाळलेला भात, झणझणीत आमटी अन् तितकंच तिखटजाळ लोणचं खाऊ घालून दिलेला अनुभवही अविस्मरणीयच होता! असेच अनुभव निवेदिता शाखेच्या युवती गटाला राजगड चढाईत आले.

★ विवेकानंद शाखा राजमाची किल्ल्यावर सप्टेंबरमध्ये गेली होती. पुणे ते लोणावळा हा सुखदायक लोकल प्रवास संपल्यावर खरी परीक्षा सुरू झाली. जाऊन येऊन तीस किलोमिटरचा पायी प्रवास म्हणजे काय प्रकरण असतं याचा प्रत्यय प्रत्येकाला आला. साहजिकचं सहल संपताना आता व्यायामाला पर्याय नाही ! अशा निष्कर्षावर हे बालचमू आले.

★ नोव्हेंबरमध्ये रामकृष्ण शाखेतील वर्धकांनी डोंगरकपारीतील दुर्गम अशा "ढाकचा भैरी" येथे वर्धिनीचे निशाण रोवले. पायथ्यापासून तीन डोंगर चढायचे उतरायचे म्हणजे स्वतःच्या पावलांवर जबरदस्त विश्वास हवाच. पण खरा कस ढाक भैरीच्या गुहेपर्यंत दोराच्या आणि झाड फांद्यांच्या आधारावर कसरत करत दोनशे फूट उभा कडा चढताना लागतो. ते दिव्य पार केल्यावर मात्र गुहेतील थंडगार जलतीर्थानं जीवाचा शीण निघून जातो. अशा अवघड प्रवासात अडचणीतल्या मित्राला आधार देताना जीवनातील सहकार्याचं महत्त्व खऱ्या अर्थी उमगतं.

★ दिपावलीच्या सुट्टीत समर्थ शाखेतील सर्व रामदासी वर्धक शिवरायांच्या प्रथम राजधानीला भेट द्यायला राजगडावर दाखल झाले. पद्मावती, संजीवनी व सुवेळा या डौलदार माच्या, बालेकिल्ला, तटबंद्या, बुरूज, ही स्वराज्याची सारी दौलत या बालकांनी जवळून निरखली. त्याच्या अणू रेणूत भरलेला इतिहास समजावून घेतला. सर्व बालचमूंबरोबर आपले अंध शिक्षक गायकवाडसर सुध्दा किल्ल्याचा कानाकोपरा पाहून आले, सद्गतित झाले.

★ ऐन पावसाळयात पहिल्या पावसाचे अधीर टपोरे थेंब अंगावर झेलत अखंडानंद शाखेचा कार्ले, भाजे येथील धीरगंभीर लेण्या व विसापूर, लोहगड या आवळया जावळया किल्यांची भटकंती असा मनमुराद कार्यक्रम झाला. पण सर्वांच्या लक्षात राहिली ती म्हणजे भाजाच्या शक्तीस्तंभासमोरील बुध्दवंदना ! आणि मनात तरंगणारी स्वरवंदना होती-

बुध्दं सरणं गच्छामि ।
धम्मं सरणं गच्छामि ।
संघं सरणं गच्छामि ।

**हिरवळीत साप लपून बसतात. विरक्तीच्या आड आसक्तीही तशीच.**

# गणेशोत्सव ९७



मंगलमूर्तीच्या भव्य विसर्जन सोहळयात आपण दरवर्षी सहभागी होतो. कशासाठी? आकर्षक, शिस्तबध्द पथकांचे दर्शन घडविण्यासाठी, ढोल-ताशे-झांजा यांच्या गजरात देहभान हरपण्यासाठी, दमदार, नयनमनोहर अशा पदविन्यासाच्या नवनवीन प्रकारांनी गणेश भक्तांचे चित्त वेधून घेण्यासाठी. वर्धिनीचे छोटे छोटे वर्धकसुध्दा प्रचंड उत्साहात, आवेशात, त्या नादब्रम्हात सलग ७-८ तास विविध रचनाप्रकारांत नाचत असतात. हे प्रकारही अत्यंत अभिनव असतात. कधी त्यात ओंकार, स्वस्तिक, कमळ अशी संस्कृतीची प्रतिके साकारतात. कधी दही-हंडी फोडणारा गोविंदा दिसतो. कधी वंदेमातरमचा गजर करत गळयाभोवती लेझीमरूपी फास अडकवून मातृचरणी जीवन अर्पित करणारे भगतसिंग, सुखदेव व राजगुरू पापण्यांच्या कडा ओलावून जातात. यावर्षी रामकृष्ण व अखंडानंद शाखेच्या मोठ्या गटातील वर्धकांनी ध्वजदलाचे प्रात्यक्षिक बसविण्याचा आग्रह धरला व आपणही युवकांप्रमाणे ८ फुट उंचीचा ध्वज दमदारपणे पूर्णवेळ मिरवणुकीत नाचवू शकतो हे दाखवून दिले. वर्धिनीच्या शाखा व प्रकल्प यांची एकूण १३ पथके यंदा गणेशोत्सवासाठी सुसज्ज होती. शक्य होईल त्या सर्व ठिकाणी खेळ करायचे असे आयोजन केले गेले. गणेशचतुर्थी व अनंतचतुर्दशी या दोन्ही दिवशी ३० ढोल व २० ताशे यांसह वर्धिनीने एकूण १० ठिकाणी मिरवणुकीत भाग घेतला. त्या कार्यक्रमांचा तक्ता खाली देत आहे.

| गणेशोत्सव मंडळ | सहभागी शाखा | प्रात्यक्षिकाचा प्रकार | प्रात्यक्षिक प्रमुख |
|---|---|---|---|
| **गणेश चतुर्थी** | | | |
| १) श्री जिलब्या मारूती मंडळ | रामकृष्ण शाखा | झांजपथक व ध्वजदल | सोमनाथ गायकवाड |
| २) अखिल बिबवेवाडी मंडळ | अखंडानंद शाखा | झांजपथक व ध्वजदल | रविंद्र चव्हाण |
| ३) श्री शिवाजी मंडळ गावठाण | भगिनी निवेदिता शाखा | टिपरी पथक | विद्या कुडलिंगार व किरण राठी |
| ४) सिध्दार्थ टॉवर्स मंडळ, फातीमानगर. | आजोळ | लेझीम पथक | किरण राठी/छाया गायकवाड |
| ५) नवचैतन्य मंडळ, कॅम्प. | आजोळ / बालशाखा | लेझीमपथक/टिपरीपथक | रेखा मालपाणी |
| ६) साळुंके विहार मंडळ, कोंढवा. | समर्थ रामदास शाखा | लेझीम पथक | सागर खामकर |
| **अनंत चतुर्दशी** | | | |
| १) तुळशीबाग मित्र मंडळ | बालशाखा/आजोळ/ युवकगट/ निवेदिता सुबोधानंद | टिपरी/लेझीम/ध्वजदल/ झांज | दत्तात्रय सकट (ध्वजदल) दुष्यंत यादव (झांज) |
| २) श्री जिलब्या मारूती मंडळ | अखंडानंद शाखा | झांजपथक/ध्वजदल | अरविंद केळकर |
| ३) श्रीमंत दगडूशेट हलवाई गणपती | युवकगट/ विवेकानंद शाखा | ध्वजदल/झांजपथक | अमर वाबळे |
| ४) मित्र सहकार तरूण मंडळ कोरेगाव पार्क | रामकृष्ण शाखा | ध्वजदल/झांजपथक | सोमनाथ गायकवाड |

**विशेष :- शाखाशः झालेल्या 'आदर्श पथक ' स्पर्धेत यंदा प्रथमच सहभागी झालेल्या भगिनी निवेदिता शाखेला विजय ढाल मिळाली.**

**या सर्व रचनांचे महाव्यवस्थापक होते श्री. शिरीष अडके**

# शब्द लेणी ही देखणी

वर्धक व युवकांच्या वैचारिक आणि भावनात्मक विकासाचे मुख्य साधन म्हणजे विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने विविध विषयांवर होणारी मार्गदर्शक व्याख्याने. रविवारच्या साप्ताहिक बैठकीत संघटनात्मक, मूल्याधिष्ठित पैलूंवर प्रकाश टाकणारी, विशुध्द मुलभूत संकल्पनांचे मनात रोपण करणारी, ओजस्वी शब्दौघांनी अथांग अनुभवगंगेचे दर्शन घडविणारी अशी व्याख्याने राष्ट्रीय वृत्तीची निर्मिती करत असतात. कार्यकर्त्यांना कार्यप्रवण करणारी मानसिकता तयार होते, अशाच व्याख्यांनांमधून !

यावर्षीची अशीच काही व्याख्याने आणि त्यांचे व्याख्याते यांचा परिचय खालीलप्रमाणे.

## शाखा विभाग

१) श्री. रमेश जोशी : उद्योजक मानसिकतेचा विकास.

२) ॲड. अविनाश गानु : आंतरराष्ट्रीय कायदे व भारत.

३) श्री. राजाभाऊ लवळेकर : मारूती स्तोत्राचा गर्भितार्थ.

४) श्री. श्रीधरपंत फडके : प्रभावी संपर्कसूत्रे.

५) ॲड. निलीमाताई गोखले : ग्राहक संरक्षण कायदा.

६) श्री. बापूराव जोगळेकर : चेन्नईतील संघकार्याचे अनुभव.

७) श्री. म.शं. अभ्यंकर : कलात्मक विकास.

८) श्री. गरूड : ग्रामीण जीवनकथा.

९) डॉ. श्री. शरदराव कुंटे : प्रेरणात्मक साहस कथा.

१०) श्री. र.ज. नरवणे सर : कॅनडाच्या भेटीतील अनुभव.

११) डॉ. कु. मनिषा बोईन : अरूणाचलातील कार्याचे अनुभव.

१२) डॉ. देवरे : प्राण्यांचे मानसशास्त्र व सवयी

१३) श्री. प्रभाकरपंत भट : वैकुंठावरील क्रियाकर्म : एक सेवाव्रत.

## युवती विभाग

१) श्री. दि. दा. जोशी : क्रांतीकारकांच्या बलिदान गाथा.

२) श्री. दादा पुणतांबेकर : प्रायोगिक सिध्दांतांवर विज्ञानाच्या गमती जमती.

३) श्री. पराग ठाकूर : शिवाजी महाराजांची पत्रव्यवहारातून राजनीती.

**जग जिंकण्याइतकं मनं जिंकण सोपं नाही**

# अक्षररंगी रंगले मन

श्री. नाना लाभे. प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा एक मनोहारी आविष्कार म्हणजे सुंदर हस्ताक्षर. सुंदर, टपोरं, मोत्याच्या दाण्यासारखं. असं दिलखेचक अक्षर आपलंही असावं, असे प्रत्येकाला मनापासून वाटत असतं. पण, प्रयत्नसाध्य अशा या "सुंदर हस्ताक्षराची" रवानगी दैवी देणग्यांच्या असाध्य यादीमध्ये करून सर्वसामान्य माणूस आयुष्यभर 'उंदराचे पाय मांजराला' जोंडत पांढऱ्यावर काळे करीत असतो.

या परीस्थितीविरूध्द क्रांती करण्याचा चंग बांधला, नागपूरच्या 'केशवभूमीतील' ७३ वर्षीय नानासाहेब लाभे यांनी. समर्थांच्या दासबोधातील सातव्या समासातील दशकामध्ये वर्णिलेल्या सुलभ-बाळबोध हस्ताक्षर संकल्पनांचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला व हस्ताक्षर तत्त्वज्ञानावर सिध्दी मिळविली. गेली दोन तपे अत्यंत सोप्या शैलीत संपूर्ण हिंदूस्थानभर हा विषय मांडण्यासाठी परिभ्रमण करणाऱ्या या हस्ताक्षरमहर्षींना 'स्व'-रूपवर्धिनीने आग्रहाने पुण्यास पाचारण केले. श्री. नानासाहेब लाभे यांनी या दोन तपांमध्ये अक्षरशः लक्षावधी विद्यार्थ्यांचे अक्षर सुधारले आहे. नोव्हेंबर'९७ मधील आपल्या आठ दिवसांच्या वास्तव्यात आदरणीय नानासाहेब लाभेंनी वर्धिनीच्या सर्व शाखा, सर्व प्रकल्प व वर्धिनीच्या परिवारातील शाळांचे सर्व विद्यार्थी, शिक्षक, कार्यकर्ते व लहानथोर या साऱ्यांना आपल्या अक्षरगंगेत मनसोक्त स्नान घातलं. जो एक-दीड तास तन्मयतेने हे व्याख्यान ऐकेल त्याच्या अक्षरात उत्तम परिवर्तन घडेलच घडेल असा प्रत्यय सर्वांना आला. अक्षरवळणे शिकविताना विद्यार्थ्यांची मनेही राष्ट्रप्रेमाने भारण्याचे त्यांचे वैशिष्ट्य खरोखरीच वंदनीय आहे.

वाटोळे-सरळ-मोकळे हा संदेश देणाऱ्या समर्थशब्दांना श्री. नानासाहेबांनी खालील नियमांमध्ये प्रतिरूप दिले.

- ✍ अक्षरातील उभी रेषा : अगदी सरळ.
- ✍ रेषा मोठी, सारी चिन्हे अर्धी ,लहान.
- ✍ अक्षर उंचीचा मंत्र अर्धा, पाव, पाव
  (मंत्राचा अर्थ अर्ध्या जागेत अक्षर पाव.पाव जागेत मात्रा उकार.
- ✍ दोन शब्दांत अंतर रेषेच्या उंचीएवढे
- ✍ दोन वर्णात अंतर रेषेच्या जाडीएवढे.
- ✍ समर्थांचा आदेश मध्यस्त लिहिण्याची करणी केली पाहिजे.
- ✍ जीवनमंत्र मी सरळ, माझी भाषा सरळ.

**With Best Compliments From :**

**ASHA CONSTRUCTION COMPANY**


Surekha Apartments, Opp Octroi Naka,

Pune – Satara Road, Pune 411 009.
Phone : 461112, 469322

# भगिनी निवेदिता शाखा

**अमृत सुरभि प्रकल्प :-** १ जून, शाखेचा वर्धापनदिन. या वर्षी शाखेच्या वर्धिकांनी आपल्या काही समाजबांधवांसाठी, कोणत्या ना कोणत्या स्वरूपाची मदत म्हणून, त्यांच्यासाठी रोज जेवणातील एक मूठभर तांदूळ आठवण म्हणून बाजूला काढण्याचा संकल्प केला. अशातऱ्हेने महिनाभरात सर्वांचे साधारणपणे ३० किलो तांदूळ गोळा होतात. आणि आत्तापर्यंत असे दर महिन्याचे एकत्रित केलेले तांदूळ हे गुरूकुल व सासवड येथील अनाथाश्रम अशा संस्थांना दिले गेले आहेत.

**पालकसभा :-** गेल्या वर्षभरामध्ये शाखेतील मुलींच्या पालकांची दोन वेळा पालकसभा झाली. पहिल्या पालक सभेच्या वेळी राजाभाऊ लवळेकर यांनी 'वर्धिनी म्हणजे नेमके काय? हे आपल्या बोलण्यातून पालकांना सांगितले. तसेच आपली पाल्य वर्धिनीत येऊन काय काय शिकली आहे हे अनेक पालकांनी अगदी कौतुकाने सांगितले. दुसऱ्या पालकसभेच्या वेळी ॲड. निलिमाताई गोखले यांनी 'ग्राहक कायदा' या विषयावर पालकसभेत विषय मांडला व काही पालकांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला.



**गुरूपौर्णिमा :-** यावर्षी गुरूपोर्णिमेचा कार्यक्रम शाखेतील इ. १० वीच्या विद्यार्थीनींनी आयोजित केला. कार्यक्रमाला श्री. प्रदीप आगाशे सर व्याख्याते म्हणून आले होते. शाखेवर १० वीच्या मुलींनी इ. ५वी ते ७वी च्या वक्तृत्त्व स्पर्धा, इ. ८वी ते १०वी निबंध स्पर्धा व इ. ५वी ते १०वी पद्य स्पर्धा घेतल्या. स्पर्धांचा बक्षीस समारंभ श्री. आगाशे सरांच्या हस्ते झाला.

# आजोळ प्रकल्प



**लो. टिळक पुण्यतिथी :-** लो. टिळकांनी मार्गदर्शक वचने मुलांनी सादर केली. सौ. बागेश्री पोंक्षे प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या.

**गुरूपौर्णिमा :-** मुलांनी गुरू-शिष्य नात्याचा गौरव सांगणाऱ्या कथा सांगितल्या. श्रीमती कलबाग प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

**दहीहंडी :-** प्रारंभी खेळ झाले. नंतर मनोरे रचना स्पर्धा होऊन यशस्वी स्पर्धकांना हंडी फोडण्याचा मान मिळाला.

**भोंडला :-** विद्यार्थिनींकरिता म्हणून नवरात्रीत भोंडला, फुगड्या, नाच, गाणी व नंतर भरगच्च खिरापत असा कार्यक्रम झाला.

**या जगात गोड फळांनाच कीड लागण्याचा अधिक संभव असतो.**

# बालशाखेचे कार्यक्रम

दहिहंडीच्या दिवशी आजोळ व बालशाखा यांनी एकत्र येऊन दहिहंडी फोडण्याची मजा लुटली. २ ऑक्टोबरला गांधी जयंतीच्या दिवशी ताईंनी मुलांना गांधीजींच्या गोष्टी सांगितल्या.

दिवाळीत भाऊबीजेच्या दिवशी बालशाखेतील मुलांनी ससूनमधील मुलांना फराळवाटप केले. तेव्हा तेथील डॉक्टरांनी मुलांना चॉकलेटं दिली. त्यादिवशी बालशाखेतील स्नेहल मारणे हिने ताईंना सांगितले की? 'माझा वाढदिवस डिसेंबर महिन्यात आहे. त्यादिवशी मी श्रीवत्स येथील मुलांना चॉकलेटं देणार आहे.' त्याप्रमाणे तिने तिच्या वाढदिवशी तिथे जाऊन चॉकलेटं वाटली.

२६ जानेवारी रोजी बालशाखेतली मुले बालवाडीबरोबर झेंडावंदनास उपस्थित होती. गुरूपोर्णिमेला बालशाखेवर गुरूपोर्णिमा साजरी केली. त्यावेळी तिसरी व चौथीच्या मुलांनी गुरूशिष्यांच्या गोष्टी सांगितल्या. आषाढी एकादशीच्या दिवशी बालवाडीच्या मुलांच्या पालखीबरोबर ही मुले न दमता न थकता घोषणा देत होती. १५ ऑगस्टला झेंडावंदनासाठी ही मुले आली होती. तसेच नागपंचमीच्या दिवशी या शाखेतील मुलींच्या झिम्मा व फुगडीच्या स्पर्धा घेतल्या.

☆ ☆ ☆

## इदं न मम !

बिबवेवाडीच्या अखंडानंद शाखेतील आठवीचा वर्धक चि. तुषार रमेश जगताप. अभ्यास, खेळ, कार्यक्रम यांत सदैव पुढे. सहामाही परिक्षेत शाळेमध्ये वर्गात त्याचा दुसरा क्रमांक आला. अत्यंत आनंदाचा असा हा प्रसंग. पण तिसरा क्रमांक मिळालेल्या मुलीची टक्केवारी आपल्यापेक्षा जास्त आहे हे तुषारला समजताच तो स्वतःहून तडक आपल्या शिक्षकाकडे गेला. आपण स्वतः दुस-या क्रमांकाचे मानकरी नसून तो क्रमांक त्या मुलीला द्यावा व आपण तिस-या क्रमांकावर रहाणेच पसंत करु असे त्याने सांगितले. त्याच्या मनाचा मोठेपणा पाहून शिक्षकांनी अत्यंत प्रेमाने त्याची पाठ थोपटली.

☆ ☆ ☆

## धागा धागा अखंड विणुया !

बालशाखेतील मुले ससूनमध्ये रक्षाबंधनासाठी गेली होती. बालशाखेतली एक छोटी तिथं आलेल्या एका माणसाकडे राखी बांधण्यासाठी मोठ्या उत्साहानं धावत गेली. पण तिची थोडी गफलतच झाली. बिचारीला कळलंच नाही की आपण एका दगडाकडे - माणसाकडे नव्हे - धावलो आहोत. त्यानं तिच्याकडे रागानं पाहिलं. राखी बांधायला आलेल्या तिच्या चिमुकल्या हातांना झिडकारलं. या 'अलौकिक प्रतिसादानं' बिचारी हिरमुसली. तोंड रडवं झालं. पलिकडेच उभा असलेला एक मुस्लिम बांधव हे पहात होता. तो झटकन् तिच्याजवळ आला. तिला म्हणाला "ताई ! माझ्या हाताला बांध राखी."

# शिबिरवृत्त

## उन्हाळी शिबिरे

वर्धिनी आपल्या वर्धकांकडे समाजाच्या विविध क्षेत्रांना भावी काळात समर्थ नेतृत्व देऊ शकणारे अधिकारी या भूमिकेतून पाहते. या भावी अधिकाऱ्यांचा, विद्यमान परिस्थिती विविध क्षेत्रांमध्ये धडाडीने कार्य करणाऱ्या संस्थांचा, व्यक्तींचा परिचय होणे व अभ्यास होणे ही अत्यंत गरजेची गोष्ट आहे. म्हणूनच या उन्हाळी शिबीरांतील मुलांच्या मोठ्या गटाच्या विषयाचे शिर्षक होते **''समाजदर्शन''** शिबिरस्थान होते पुण्याच्या मध्यभागातील शिवाजी मराठा हायस्कूल शिबिरप्रमुख विवेकानंद शाखेचे श्री. विजय महेंद्रीकर हे होते. शिबीरार्थी संख्या सुमारे १५० होती. मोठ्या गटातील ७० विद्यार्थ्यांनी गटशः प्रत्यक्ष भेटी देऊन पुणे परिसरातील सामाजिक, शैक्षणिक, संशोधन इत्यादी क्षेत्रांतील १८ प्रथितयश संस्थांच्या जडणघडणीचा अभ्यास केला. त्यांचे सविस्तर अहवाल बनवले. या संस्थांच्या कार्यपध्दतीतील कोणता भाग वर्धिनीच्या विकासास उपयोगी पडू शकेल या विषयीचे विचारमंथन वर्धकांच्या मनात वेगाने सुरू झाले. शिबीर कालातील त्या सर्व संपर्कित संस्थांची सूची खाली दिलेली आहे

१) बालचित्रवाणी
२) विज्ञानाश्रम, पाबळ
३) ज्ञानप्रबोधिनी
४) उद्योगधाम, तळेगाव
५) निवारा वृध्दाश्रम
६) भारत इतिहास संशोधन मंडळ
७) ज्ञानदा गुरूकुल, खानापूर
८) पुणे विद्यापीठ
९) विज्ञानवर्धिनी
१०) राजा केळकर संग्रहालय
११) ASPT(आर्मी स्कूल ऑफ फिजीकल ट्रेनिंग)
१२) अंधशाळा, रामटेकडी
१३) हिंगणे स्त्री शिक्षणसंस्था
१४) मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र
१५) 'स्व'रूपवर्धिनी
१६) जयकर ग्रंथालय
१७) IMLD (इन्स्टिट्यूट फॉर मॅनेजमेंट ट्रेनिंग अँड लिडरशिप डेव्हलपमेंट, ज्ञान प्रबोधिनी )
१८) रामकृष्ण आश्रम

या शिबीरातील लहान गटाचा विषयही खूपच छान होता. **''अभिरूची निर्माण''** गणित, इतिहास, विज्ञान व संगीत या जीवन मार्गातील अभिन्न अशा विषयांची गोडी बालवयातच ५वी ते ७वी या वयोगटातील वर्धकांना लागावी अशा प्रकारे व्याख्याने योजली होती. आलेल्या सर्व व्याख्यात्यांनी वर्धकांच्या मनातील या विषयांसंदर्भातील पारंपारिक पूर्वग्रहांचे नकळत उच्चाटन करून आपल्या अनुभवसिध्द वक्तृत्वाने सदर विषयांची ज्ञानलालसा विद्यार्थ्यांत जागृत केली. लहान गटाचे विषय व व्याख्याते खालीलप्रमाणे होते.

| | |
|---|---|
| १) गणित - | श्री. विलासराव पोतनीस |
| २) इतिहास - | श्री. सुरेशराव परचुरे |
| ३) विज्ञान - | डॉ. वसंतराव पुणतांबेकर व श्री. सुनील कुलकर्णी |
| ४) संगीत - | सौ. हिंगे, श्री. उमाकांत गायकवाड, श्री. मिलींद सबनीस |

रिवाजाप्रमाणे शिबिराच्या पाहिल्या रात्री ह.भ.प. प्रदीपराव

**शरीराच्या प्रत्येक वासनेला आत्म्याचं बंधन हवं. म्हणून माणसाचा आत्मा सदैव जागृत हवा. अपहारासारखा अधर्म नाही.**

आगाशे सर यांचे 'केल्याने देशाटन' या विषयावर सुरेख कीर्तन झाले. रात्र सत्रांमध्ये मोठ्या गटावर श्री. शामराव आपटे यांनी 'धगधगत्या काश्मिरची 'दृकश्राव्य माध्यमाद्वारे माहीती दिली. लहान गटावर श्रीयुत फणसे यांनी 'भारतीय देवालयांच्या प्राचीन शिल्पकलेचे वैभव' स्लाइड्सद्वारा मुलांना दाखविले.

## युवक शिबिर

युवक विभागाचे वार्षिक प्रशिक्षण शिबिर भोसरीच्या लुंकड धर्मशाळेत संपन्न झाले. आपले सर्व आयुष्य केरळ प्रांतातील संघकार्यासाठी अर्पित करणारे व सध्या वनवासी कल्याण आश्रमाचे मार्गदर्शक असे जेष्ठ संघ प्रचारक मा. भास्करराव कळंबी यांचा पूर्णवेळ सहवास या युवक शिबिराला लाभला ही महतभाग्याची गोष्ट आहे. मैदानावरील नियुध्द, पदविन्यास व समता या बरोबरीने अधिक खुमासदार अशी या शिबिरातील गोष्ट म्हणजे विविध विषयांवरील अत्यंत अभ्यासपूर्ण व्याख्याने. युवक शिबिरातील व्याख्याने खालीलप्रमाणे होती.

१) संपर्कातून संघटन - श्री सुहासराव हिरेमठ

२) करियर आणि सामाजिक कार्य
   - श्री. रामभाऊ डिंबळे

३) वर्धिनीच्या स्थापनेमागील कल्पना व कार्यविस्तार
   - श्री. कृ. ल. पटवर्धन

४) सुवर्णमहोत्सवी पार्श्वभूमीवर देशविचार
   - श्री. दादा पारखी

५) आर्थिक स्वातंत्र्याच्या लढाईत सामान्यांची भूमिका
   - श्री.उदयराव पटवर्धन

६) कैलास लेणे (स्लाईड शो)- श्री. उदयन इंदूरकर

७) नेताजी सुभाषचंद्र बोस - श्री. दि. दा. जोशी

८) आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके
   श्री. मोहन शेटे

९) भारतीय क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाची गौरवगाथा
   - श्री. प्रदीप कुरूलकर

नुकत्याच कॉलेज विश्वात पदार्पण केलेल्या वर्धिनीच्या नवयुवकांनी वर्धिनीच्या ध्येयउद्दीष्टांना अनुसरून दैनंदिन शाखेवर तासिका घेताना विषय शिकवावेत कसे? याबद्दल सर्वश्री प्रदीपराव आगाशे, मा. भैय्या वैद्य, मा. सुरेशराव परचुरे प्रभृतींनी अत्यंत सोप्या पध्दतीने पण अत्यंत परिणामकारक असे मार्गदर्शन केले. मा. भास्कररावांच्या रात्र कार्यक्रमातील मुलाखतीमधून अत्यंत व्रतस्थ अशा राष्ट्रसमर्पित व्यक्तिमत्त्वाचे प्रेरणादायी दर्शन सर्व युवकांना पुलकित करून गेले. शिबिराच्या समारोपात मा. भास्कररावांच्या बोलण्यातून देशाचे प्रमुख शत्रु कोण आहेत, तसेच त्यांच्यावर जय मिळवण्यासाठी, अखंड अविरत कार्य करण्यासाठी कार्यकर्त्यांची मानसिकता कशी असावी यासंबंधी दृढमूल असे मार्गदर्शन झाले.

## दिवाळी शिबिर

गेले जवळ जवळ १७ वर्षे विविध विषयांवर गुणवत्तापूर्ण शिबिरांचे आयोजन करण्यात वर्धिनीने प्रभुत्व मिळवले आहे. आता शिबिरे व त्यातील ज्ञान-रंजन अनुभवलेल्या आपल्याच युवकांच्या साहाय्याने ग्रामीण विद्यार्थी बांधवांची शिबिरे त्यांच्याच गावात जाऊन आपण घ्यावीत असे युवक बैठकीत ठरले व या आयोजनात सर्व शाखांवरील सर्व वर्धकांचाही सहभाग त्यांच्या जडणघडणीच्या दृष्टीने असावे हे ही नक्की झाले. पण यासाठी पूर्ण प्रशिक्षण शिबीर मात्र नक्कीच महत्वाचे ठरले. दि. ३ ते ६ नोव्हेंबर या कालावधीत श्री मंगेश निवंडीकर यांच्या नेतृत्वाखाली सुमारे १६५ वर्धकांचे पूर्वप्रशिक्षण शिबिर रेणूकास्वरूप प्रशालेत पार पडले.

सर्व वर्धकांची वैयक्तिक अभिरूची व नैपुण्य लक्षात घेऊन तीन गटात त्यांची प्रशिक्षणासाठी विभागणी झाली. संबंधित विषयांमध्ये आपण स्वतः तज्ज्ञ व्हायचे व हे विषय आपल्या ग्राम शिबिरातील मित्रांना कौशल्याने शिकवायचे या विचारातून सर्वजण प्रशिक्षणात रममाण झाले.

१) पहिल्या गटाचा विषय होता - चित्रकला, हस्तकला, मूर्तीकला इ. या कलांमधील कौशल्ये शिकविण्यासाठी सर्वश्री मुकेश प्रभुणे, दिदा जोशी सर मुकुंद भावे, अवधूत फडणीस, कपिल काळे व मिलींदराव सबनीस यांचे मार्गदर्शन लाभले.



२) दुसऱ्या गटाचा विषय, वक्तृत्व कथाकथन नाट्य अभिनय, संगीत अशा अभिव्यक्ती संकल्पनेत गुंफलेला होता. यासाठी सर्वश्री प्रदीपराव आगाशे, कु. रूपाली भावे, पंकज मिठभाकरे, सुरेशराव परचुरे श्री देव सर यांचे मार्गदर्शन लाभले.

३) तिसरा गट होता - शिबिरातील नेत्यांचा म्हणजेच प्रशासकांचा. यात संभाषण कौशल्य, शिबिराचे व्यवस्थापन नियंत्रण, विविध स्पर्धांचे आयोजन व क्रीडा कोडी करमणूक इत्यादी विषयांचा अंतर्भाव होता. यासाठी सर्वश्री कृ.ल.पटवर्धन सर, संजय तांबट, ज्ञानेश पुरंदरे, शिरीष अडके यांनी मार्गदर्शन केले.

रात्र कार्यक्रमात आपल्या खणखणीत व ओजस्वी वाणीने कथाकथन कसे करावे हे श्री मंदार परळीकर यांनी प्रात्याक्षिकासह समजावून सांगितले. मुंबईच्या नाना पालकर स्मृती समितीचे डॉ. माधवराव परळकर यांनी विविध विषयांसदर्भात मोठ्या गटाशी गप्पा मारल्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचारक प्रमुख मा. मोरोपंत पिंगळे यांचे मार्गदर्शन हा शिबिरातील परमोच्च क्षण होता असेच म्हणावे लागेल.

वरील चार दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण करून सर्वजण विश्रांती न घेता आपापल्या शाखांचा गट घेऊन मुळशी खोऱ्यातील नेमून दिलेल्या आपापल्या गावाकडे दि. ७ रोजी उत्साहात मार्गस्थ झाले. समर्थ शाखेचे वर्धक कार्येकर्ते खानापूरच्या ज्ञानदा गुरूकुलात पोहोचले.


सुबोधानंद व रामकृष्ण शाखेने कोळवण खोऱ्यातील चाले व कोळवण या गावातील सुमारे ६० विद्यार्थी विद्यार्थीनींचे शिबीर घेतले. अखंडानंद शाखेने मु. पो. खेचरे पादाक्रांत केले, तर विवेकानंद शाखेने, सेनापती बापटांची कर्मभूमी अशा माले या गावात आपला तळ ठोकला. केवळ तीन दिवसांच्या या आनंद सोहळयात दोघांनी एकमेकांना भरभरून दिले. वर्धिनीच्या वर्धकांनी कला क्रीडा नाट्य, संगीत अशा विषयांचे मार्गदर्शन आपापल्या ग्रामीण बांधवांना केले. तर गावातील या जिवलगांनी या पुणेकर मित्रांना शिवारात मिरवून आणले. शेतात नाचवले, नदीत डुंबवले, भजनात रंगवले आणि हृदयात साठवले. या सर्वच ठिकाणांवरील स्थानिक ग्रामस्थ मंडळींना या ग्रामशिबिरांचे अपरंपार कौतूक वाटले. ९ तारखेला साश्रूनयनांनी आपल्या या गावांमधील दिलदार जिवलगांचा निरोप घेऊन पुण्याकडे परतताना प्रत्येक वर्धकाने ठरविले. ही यारी आता कायमची !

***शिबिर वृत्तांत - निवेदिता शाखा***

१) **उन्हाळी शिबिर** स्थान नवीन मराठी शाळा

संख्या :- ४० ते ४२

विषय :- व्यक्तिमत्व विकास



या शिबिरात अनेक विषय हाताळले गेले. वैदिक गणित विषयांवरील व्याख्याने इतकी छान झाली की, शेवटच्या दिवशी सरांनी घेतलेल्या परिक्षेला अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला. रूपालीताई भावेंच्या थिएटर गेम्स् मधून संघटना कशी करावी? नेतृत्व कसे करावे? आपला आत्मविश्वास कसा वाढेल या व अशा अनेक नवीन नवीन गोष्टी शिकण्यास मिळत होत्या. महाभारत हे आपणा सर्वांना पाहून ऐकून पूर्ण माहिती आहे असे वाटते. परंतु दादा करंदीकरांनी सांगितलेल्या महाभारतातील माणसांच्या गोष्टी ऐकताना अगदी नवीन वाटत होत्या. कोणत्या वयोगटात कोणती व कशा प्रकारची पुस्तके कशी वाचली गेली पाहिजे हे विवेक पोंक्षे सरांच्या

**जगानं माझ्याशी जसं वागावं असं मला वाटतं, तसं मी जगाशी वागायला हवं.**

"वाचनाचा व्यक्तिमत्त्वावर होणारा परिणाम "या सत्रातून समजले. किशोर भावे यांच्या "संभाषण कौशल्य" या विषयात त्यांनी पुढे येऊन संभाषण किंवा भाषण कसे करावे, यासाठी लागणारी एकाग्रता आत्मविश्वास हे गुण आपल्यामधे कसे आणता येतील याविषयी दिलेली माहिती ऐकून अनेक मुलींची पुढे येऊन बोलण्याची भिती कमी झाली व मुली विश्वासाने बोलू लागल्या. त्यांच्याच 'मी व माझे वास्तव' या विषयात त्यांनी स्वतःच्या अस्तित्वामधे व वास्तवामधे जो फरक आहे, तो फरक जाणवून दिला. व आपले स्वतःचे वास्तव विद्यार्थ्यांनी कसे ओळखावे हे अतिशय उत्तमपणे सांगितले. प्रकाश पारखी यांच्या सत्रातून नाट्याभिनय या विषयाचे धडे आम्हांला मिळाले. कल्पनाशक्ती ही सर्वांकडेच असते. परंतु त्याच कल्पनाशक्तीचा अचानक विस्फोट केला तर त्याचा मिळणारा प्रतिसाद हा अतिशय उस्फूर्त असतो. याचा प्रत्यक्ष प्रत्यय आला श्री शरद सुंकर सरांनी सांगितल्याबरोबर दोन मिनीटांत पाचवीतील एका मुलीने वर्धिनीसाठी एक गीत रचले

'स्व-रूपवर्धिनी स्व-रूपवर्धिनी
तूच आहे शिस्तीची पायरी ।
स्व-रूपवर्धिनी स्व-रूपवर्धिनी
तूच आहे अमुची जननी ।
स्व-रूपवर्धिनी स्व-रूपवर्धिनी
आम्ही आहोत तुझ्या कन्यका ।
आशीर्वाद दे सतत आम्हाला, सतत आम्हाला ॥

दोन व्याख्यानांच्या मधे जो वेळ असतो त्यावेळेचा सुध्दा शिबिरात अतिशय काटकसरीने सदुपयोग केला गेला. यावेळामधे सहा गटांना वेगवेगळे प्रकल्प करण्यास दिले ते पुढीलप्रमाणे

१)एम्बोझिंक २) ग्रिटींग ३) सॉफ्ट टॉईज् ४) चलन ५) भूकंप ६) आदर्श वर्तमानपत्र कसे असावे?

अशा तऱ्हेने या चार दिवसाच्या शिबिरातून मुली काही शिकून बाहेर पडल्या.

***हिवाळी शिबिर (३ नाव्हेंबर ते ७ नोव्हेंबर) :-*** निवेदिता शाखेची यावर्षीचे हिवाळी शिबिर प्रथमच शहरापासून दूर झाले. शिबिराचा विषय शिवचरित्र असा होता. या विषयाला अनुसरून शिबिरस्थान म्हणून कल्याण गावाची (सिंहगड पायथा) निवड करण्यात आली. शिबिर लांबच्या ठिकाणी असल्याने अनेक अडचणी येणार हे दिसत असतानासुध्दा सर्वांच्या



सहकार्याने हे शिबीर यशस्वी झाले. शिबिरार्थींची संख्या ३५ होती.

या शिबिरात शिवचरित्राचा तीन टप्प्यात अभ्यास करण्यात आला. शिवपूर्वकाल, शिवकाल, आणि शिवोत्तर काल या तीन टप्प्यात शिवचरित्राचा अभ्यास शिबिरार्थींनी केला. शिबिरात सर्वश्री ज्ञानेश पुरंदरे, नरेंद्र उंब्रजकर, शरद कुंटे, जयंतराव कवठेकर. श्रीधरपंत फडके, सौ शैलाताई जोशी यांची सत्रे झाली. या सर्व सत्रांमधून मुलींना शिवाजी महाराजांसंबंधी अनेक प्रकारची माहिती मिळाली.

शिबिरात व्याख्यांनां व्यतिरिक्त शिवचरित्र या विषयावर आधारित हस्तलिखिते तयार करण्यात आली. शिबिरात बालशिवाजी हा चित्रपट दाखविण्यात आला. यांच्याबरोबरच मैदानी स्पर्धा, प्रश्नमंजूषा पद्य स्पर्धा सुध्दा झाल्या.

शिबिराच्या शेवटच्या दिवशी सिंहगड कल्याणमार्गे चढलो. सिंहगडाचीदेखील माहिती सत्रांमधून मिळाल्याने गड पाहण्यास जास्त मजा आली.

***With Best Compliments From :***

**ADEPT RECORDING INSTRUMENTS (P) LTD,**

Plot No. 4, S. No. 17/ 1 – B, Kothrud Industrial Estate,

Kothrud, Pune - 411 029. ☎ 331474, 341124, 340480

तसेच गावात पाण्याचे नळ नसल्याने विहिरीतून पाणी शेंदून भरण्याचा आनंद लुटता आला. आणि कमी पाण्याचा सुयोग्य वापर करण्याचं शिक्षण मुलींना मिळालं. महत्त्वाचं म्हणजे ताईनी केलेला स्वयंपाक खाण्याची संधी मुलींना मिळाली.

या शिबिरात मुलींनी ग्रामीण जीवनाचा खऱ्या अर्थाने मनमुराद आनंद लुटला.

**आजोळ :-**

'विज्ञानातील चमत्कृती' हा उन्हाळी शिबिराचा विषय होता. श्री. दादा पुणतांबेकर यांच्या वैज्ञानिक खेळण्यांमध्ये मुले इतकी रंगली की, दुपारची न्याहरी देखील त्यांना 'व्यत्यय' वाटली. सौ. अपर्णाताई बोकीलांनी



श्री रामानुजम् - थोर गणिती ' यांची जीवनकथा सांगितली. ती इतकी भावपूर्ण होती की, या थोर देशभक्त गणितीच्या देहांताचं वर्णन ऐकताना सर्व बालचमूंच्या डोळयांत पाणी उभं राहिलं. प्रा. दिलीप साठे यांनी शिबिर समारोप करतांना सर्वांना भर उन्हात मैदानावर नेऊन 'सावल्यांचा खेळ' आणि वेळ यांचं नातं सप्रात्याक्षिक दाखवलं.

'कला शिक्षण कृतिद्वारा' हा दिवाळी शिबिराचा विषय होता. श्री. दि. दा जोशी यांनी 'कागद हस्तकला' (ओरिगामी), श्री. मिलिंद सबनीस यानी आकाशकंदील व श्री. प्रभाकरपंत जोशी यांनी कॅमेरा आणि त्याची रचना ह्या विषयांची मांडणी केली. सर्व विषयांना कृतीची जोड असल्यानं सर्वांना अक्षरशः या शिबिरांनं वेडं केलं होते. 'शिबिर फार लवकर संपलं' हीच सगळयांची जोरदार तक्रार होती. शिबिराचा कलशाध्याय ठरला, सुप्रसिध्द व्यंगचित्रकार, लेखक, दिग्दर्शक श्री. मंगेश तेंडूलकर यांचा अत्युत्कृष्ट समारोप ! समारोपाला श्री. राजाभाऊ लवळेकर, डॉ. अनिल ठकार (युरोलॉजिस्ट) हे आवर्जून उपस्थित होते.

### बालशाखा शिबिर

यंदाचे बालशाखेचे हिवाळी शिबिर मुळशी तालुक्यातील माले या गावी तीन दिवसांचे, 'निवासी शिबिर' झाले. शिबिराचा विषय 'आनंद मेळावा ' हा होता. या शिबिरात मुलांना भरपूर वेगवेगळ्या गोष्टी शिकायला मिळाल्या. मुळशीचे धरण पाहण्यासाठी सर्व मुले २-३ कि.मी. चालत गेली व धरणावर त्यांनी मनसोक्त आंघोळीचा आनंद घेतला व पुन्हा तितकेच चालत न थकता ती मुले पुन्हा शिबिरस्थानी आली. नंतर पद्याचा सराव केला. अशाप्रकारे तीन दिवस मुलांनी उत्साहाने शिबिरात भाग घेतला.

## शिबिरे एका दृष्टीक्षेपात

प्रेरणादायी विषयांना प्राधान्य देणारी विविध शिबिरे हे 'स्व'-रूपवर्धिनीच्या कामातील एक महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे.

पुढील पानांवरील तालिकेत 'स्व'-रूपवर्धिनीच्या उन्हाळयातील आठ व दिवाळीतील चौदा अशा सोळा शिबिरांचा संक्षिप्त आढावा दिला आहे. त्यावरून झालेल्या शिबिरांतील विषयांतील विविधता समजू शकेल. शालेय वा महाविद्यालयीन विषयांच्या चौकटीपलीकडे जाऊन शिकण्यासारखं, अनुभवण्यासारखं खूप काही आहे याचा प्रत्यक्ष प्रत्यय देणारी अशी ही शिबिरं आहेत.

**जीवन हा एक दिव्य वर आहे.**

ॐ

# 'स्व'-रुपवर्धिनी

## शिबिर - विषय तालिका - एप्रिल ते जुलै १९९७

| अ.न. | विभाग | कालावधी | संख्या | स्थान | विषय | शिबिर प्रमुख |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | वीर अभिमन्यू बालशाखा | ७ दिवस | ४० | पेपल सेमिनरी, विठ्ठलवाडी, पुणे | क्रीडा, कला कौशल्ये | श्रीमती पुष्पाताई नडे |
| २. | वर्धकांच्या शाखा : रामकृष्ण, विवेकानंद, अखंडानंद सुबोधानंद, देवगिरी, गुरुकुल (डोमरी) | ६ दिवस | १५० | शिवाजी मराठा हायस्कूल, शुक्रवार पेठ, पुणे | मोठा गट - समाजदर्शन (सुमारे २४ सामाजिक, शैक्षणिक, संशोधन संस्थांचा अभ्यास)<br>लहान गट - विषय रुची शिबिर | विजय महेंद्रीकर |
| ३. | भगिनी निवेदिता शाखा | ७ दिवस | ४० | नवीन मराठी विद्यालय, पुणे | व्यक्तिमत्व विकास | कु. किरण राठी |
| ४. | आजोळ | ५ दिवस | ५० | शिशुविहार हायस्कूल, पुणे विद्यापीठ, पुणे | वैज्ञानिक चमत्कृती | कु. भाग्यश्री कोठारी |
| ५. | विद्यार्थिनी शिबिर | ४ दिवस | २५ | शिरीषकुमार विद्यालय, शिवाजीनगर, पुणे | व्यक्तिमत्त्व विकास | कु. तेजश्री शेंडे |
| ६. | १०वी पूर्वपिठिका शिबिर | ४ दिवस | ५० | 'स्व'-रुपवर्धिनी, पुणे | अभ्यासपूरक कौशल्ये, १०वीचे वार्षिक नियोजन, अभ्यासक्रमाची ओळख | श्री. प्रशांत वेदपाठक |
| ७. | १० वी अभ्यासवर्ग | ३०दिवस | ५० | 'स्व'-रुपवर्धिनी, पुणे | १० वीच्या महत्त्वाच्या विषयांचे रोज ६ तास मार्गदर्शन | श्री. प्रशांत वेदपाठक |
| ८. | युवक कार्यकर्ते | ५ दिवस | ५० | पताशीबाई रतनचंद लुंकड मानव सेवा ट्रस्ट, भोसरी | कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग | श्री.विलास कुलकर्णी |

# 'स्व'-रुपवर्धिनी

## शिबिर - विषय तालिका - नोव्हेंबर १९९७

| अ.न. | विभाग | कालावधी | संख्या | स्थान | विषय | शिबिर प्रमुख |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | वीर अभिमन्यू बालशाखा | ३ दिवस | ३५ | ग्राम : माले | निसर्ग अभ्यास, मुक्त छंद, क्रीडा | श्रीमती पुष्पाताई नडे |
| २. | भगिनी निवेदिता शाखा | ४ दिवस | ४० | ग्राम : कल्याण,सिंहगड पायथा | शिवचरित्र अभ्यास | कुमारी सुरेखा माळी |
| ३. | शाखा विभाग शिबिर | ४ दिवस | १६० | रेणुका स्वरूप प्रशाला, पुणे | गट (१) चित्रकला, हस्तकला, मूर्तीकला<br>(२) वक्तृत्व, नाट्य, अभिनय, कथाकथन<br>(३) नेतृत्व विकसन, शिबिर व्यवस्थापन व संचालन | श्री. मंगेश निवंडीकर |
| ४. | आजोळ | ५ दिवस | ४५ | रेणुका स्वरुप प्रशाला, पुणे | कला मार्गदर्शन (चित्रकला, हस्तकला) | कु. भाग्यश्री कोठारी |
| ५. | यमगरवाडी शिबिर | ४ दिवस | पुणे - १९<br>यमगरवाडी-४६ | यमगरवाडी प्रकल्प केंद्र<br>ता. तुळजापूर | पद्य, कथा, नाट्य, संस्कार, कृषीज्ञान स्पर्धा | श्री. ज्ञानेश पुरंदरे |
| ६. | १० वी इयत्ता अभ्यास शिबिर | १७ दिवस | ४० | 'स्व'-रुपवर्धिनी, पुणे | शालेय विषय मार्गदर्शन, रोज ७ तासिका, व्यायाम | श्री. संजय राच्चेल्ली |
| ७. | विज्ञान शिबिरे<br>(स्वरुपवर्धिनी व<br>विज्ञान भारती संयुक्त कार्यक्रम) | शिबिर<br>१) २ दिवस<br>२) २ दिवस | <br>५५<br>४० | <br>ग्राम - माले<br>ग्राम - भूगाव | क्रीडा, प्रेरणासत्रे, गटचर्चा, परीक्षा इ.<br>विज्ञान दृष्टिकोन, प्रयोग, प्रात्यक्षिके<br>विज्ञान दृष्टिकोन, प्रयोग, प्रात्यक्षिके | श्री. पंकज मुंडे<br>सौ. बागेश्री पोंक्षे<br>कु. वैभवी पवार |
| ८. | ग्राम शिबिरे | शिबिर<br>१) ३ दिवस<br>२) ३ दिवस<br>३) ३ दिवस<br>४) ३ दिवस<br>५) ३ दिवस | <br>५६<br>६०<br>५०<br>६०<br>३५ | <br>ग्राम - माले<br>ग्राम - खेचरे<br>ग्राम - चाले<br>ग्राम - कोळवण<br>ग्राम गुरुकुल | <br>चित्रकला, हस्तकला, मूर्तीकला<br>वक्तृत्व, नाट्य, कथाकथन<br>मैदानी व बौध्दिक स्पर्धा<br>शेतीविषयक माहिती, ग्रामसंपर्क व प्रबोधन कार्यक्रम, प्रेरणादायी चित्रपट इ.<br>दृकश्राव्य कार्यक्रम | <br>श्री. योगेश मुकनाक<br>श्री. अमोल उंदरे<br>श्री. केदार पारगांवकर<br>श्री. विनोद बिबवे<br><br>श्री. निशिकांत वाईकर |

# दहावी एक विजयपर्व



आयुष्यात कर्तृत्वाचे दर्शन ज्या काही मोजक्याच संधीमुळे होते, त्यातील अत्यंत मानाची संधी म्हणजे दहावीचे वर्ष होय. आपल्या बुध्दीवैभवाचे व वर्षभरातील परिश्रमांचे मुल्यांकन होते, शालांत परिक्षेच्या गुणपत्रकावरूनच, म्हणूनच या वर्षात शिक्षण घेणाऱ्या सर्व शाखांच्या वर्धकांसाठी दैनंदिन अभ्यास व्यवस्थेबरोबरच विशेष केंद्रीय कार्यशालांचे आयोजन वर्षभर केले जाते. या वर्षभरातील कार्यक्रमांचा तपशील खालील तक्त्यात दिला आहे.

| क्र. | कार्यक्रम | कालावधी | उद्देश/तपशील | समन्वयक |
|---|---|---|---|---|
| १. | पूर्वपीठिका शिबिर | ४ दिवस पूर्णकालीन निवासी | अभ्यासक्रमाची ओळख, अभ्यासाचे नियोजन अभ्यासपूरक कौशल्यांचे (वाचनवेग, शुध्दलेखन इ. सर्व प्रमुख विषयांचे मार्गदर्शन | ज्ञानेश पुरंदरे |
| २. | उन्हाळी अभ्यास वर्ग | ४५ दिवस रोज ५ तास | एप्रिल व मे महिन्याच्या सुट्टीत रोज ५ तास मार्गदर्शन | प्रशांत वेदपाठक |
| ३. | दिवाळी अभ्यास शिबिर | १७ दिवस पूर्णकालीन निवासी | सर्व विषयांचा वर्षभराचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो, जेणेकरून दिवाळीनंतर स्वाध्याय व प्रश्नपत्रिका सराव यांसाठी जास्तीत जास्त वेळ मिळू शकेल. तसेच भाषा विषयांचे व्याकरण, पत्र व निबंधलेखन या दुर्लक्षिल्या जाणाऱ्या विषयांचे मार्गदर्शन व सराव. तसेच दररोज व्यायाम, खेळ, प्रेरणादायी व्याख्याने. | संजय राचेल्ली पंकज मुंडे |
| ४. | परिक्षातंत्र मार्गदर्शन वर्ग | ८ दिवस रोज दीड तास | प्रत्येक विषयाची प्रश्नपत्रिका कशी सोडवावी याचे तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व शंकांचे निरसन | आरतीताई बेलवलकर |

*With Best Compliments From :*

**M/S. LANDMARK CONSTRUCTIONS**

**KRUTANJALI**

65/20, Erandawana, Shangrilla Restaurant Lane,
Law College Road, Pune : 411 004.
Tel : 333200 Fax : 332300

वर्षभरातील दहावीसाठीच्या वरील सर्व कार्यक्रमांमध्ये परिवारातील मान्यवर शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन सर्वकाळ मिळत असते. उन्हाळी शिबिरातील दुपारच्या टळटळीत उन्हातील गणिताचा तास असो वा दिवाळीच्या थंडीतील पहाटेचे प्रेरणा सत्र असो, हे व्रतस्थ शिक्षक अविरतपणे अध्यापनकार्यात मग्न असतात. यावर्षी ज्या शिक्षकांचे मार्गदर्शन दहावीतील विद्यार्थ्यांना लाभले त्यांचा परिचय खाली देत आहोत.


| विषय | मार्गदर्शक - शिक्षक | विषय | मार्गदर्शक - शिक्षक |
|---|---|---|---|
| बीजगणित | श्री. सु.म. जोशी. | अर्थशास्त्र | श्री. गिरीश अडके |
| | श्रीपाद गर्गे, श्री. पेंडसे | अभ्यासपूरक कौशल्ये | सौ. अनघा लवळेकर, |
| | श्रीमती नेने, श्री. वाळिंबे | | अभयाताई टोळ, |
| भूमिती | प्रदीपराव आगाशे | | सौ. सायगावकर |
| | श्री. मामा मोडक | मराठी | श्री. काकडे, |
| इंग्रजी | श्री. दाबके, | | श्री. कवठेकर |
| | श्रीमती लवळेकर, | | सौ. मराठे. |
| | सौ. रेखा कुलकर्णी | हिंदी | सौ. सरनाईक |
| | श्री. शामसुंदर देशपांडे, | संस्कृत | सौ. पांढरे, |
| विज्ञान | श्री. सूर्यवंशी, सौ. लाळे | | श्री. ज.वा. जोशी |
| | श्री. इंगळे, सौ. फडके | इतिहास | सौ. घाटपांडे |
| | सौ. अनुराधा कुलकर्णी | भूगोल | सौ. दाबके, |
| | | | सौ.वैशाली कुलकर्णी |




रक्षाबंधनाकरिता बालशाखा ससूनमधे श्रीवत्सच्या बेबीवॉर्डमध्ये गेली होती. तिथल्या डॉक्टरांनाही मुलांनी राख्या बांधल्या. कौतुकानं डॉक्टरांनी या मुलांना खाऊसाठी पैसे देऊ केले, मुलं ते घेईनात. शेवटी डॉक्टरांनी जबरदस्तीनं ते त्यांच्या खिशात कोंबलेच जणू ! अखेरी मुलांनी ते पैसे पुष्पाताईंच्याकडे जमा केले. आणि पुष्पाताईंना मुले लगेच म्हणाली, “ताई ! डॉक्टरांनी दिलेल्या या पैशातच आम्ही आमचे खाऊचे पैसेही जमा करू. सगळे पैसे जमा झाले की, आपण या बेबी-वॉर्डमधील मुलांना खेळणी, खाऊ घेऊन देऊ”. आणि खरोखरच तेव्हापासून रोज कोणी ना कोणी खाऊचे पैसे या ‘आगळया गंगाजळीत’ जमा करतो आहे. आणि आता थोड्याच दिवसात ‘ या मुलांनी दिलेल्या व खाऊ व खेळण्यात काही क्षण तरी दंग झालेला बेबी वॉर्ड ’ हे स्वप्नक्षण प्रत्यक्षात येणार आहेत.

**शरीरसुख हा काही मानवी जीवनाचा मुख्य निकष नाही. तो निकष आहे आत्म्याचं समाधान.**

# "ग्रंथावली, दुसरी माऊली, जणू सरस्वतीची सावली"



आपल्या स्व-रूपवर्धिनीत अनेक प्रकल्प चालतात, प्रत्येक प्रकल्पाचा फायदा भरपूर प्रमाणात प्रत्येकास स्व-रूपवर्धनासाठी होत असतो. असाच स्वरूपवर्धनात भर पाडणारा महत्त्वाचा घटक म्हणजे, "ग्रंथालय ". अत्यंत प्रेरणादायी आणि मूल्यनिष्ठा जोपासणारं साहित्य येथे आहे. सर्वच वाचक ग्रंथालय केव्हा उघडणार म्हणून वाट पाहत असतात. कधी कधी तर पुस्तक मिळविण्यासाठी प्रेमळ भांडणे पण होतात. नुकतचं, "अमृतवेल" हे पुस्तक खांडेकरांच्या प्रतिभा शैलीतून वेगळीच हाक देवून गेलं. "अमृतवेल" ग्रंथालयात आलं तसं नोंदणी होवून लगेच बाहेर गेलं त्यानं रॅक हे पाहिलंच नाही आणि आजही ५ नावं प्रतिक्षायादीवर आहेतच. कोण आधी घेणार यासाठी प्रेमळ वाद असतात.

विविध विषयांवरची १० हजार पुस्तकं या ग्रंथालयात आहेत, ज्यात कथा, काव्य, कादंबरी, चरित्र, संतसाहित्य, संघसाहित्य, विविध मासिके, साप्ताहिके, धार्मिक ग्रंथावली, राज्यशास्त्र, विज्ञान, मानसशास्त्र तर्कशास्त्र, सामान्यज्ञान, विविध स्पर्धा परीक्षा आणि शब्दकोष इत्यादी अनेक प्रकारची बुध्दीमत्तेला सतेज करणारी पुस्तकं आहेत. Encylopedia Britanica, चे २३ खंड Book of knowledge चे २० खंड, Pictorial Knowledge चे ८ खंड, Children's Encyclopedia चे १० खंड, भारतीय संस्कृतीकोष, विश्वकोष, रामायण, महाभारत, स्वामी विवेकानंद , स्वा. सावरकर व महात्मा गांधी यांचे पूर्ण साहित्य येथे आहे. एकंदरीत ग्रंथालय हा येथे व्यक्तिमत्त्व विकासासाठी, सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी, महत्त्वपूर्ण घटक आहे.

*With Best Compliments From :*

**GURUPRASAD TRANSPORT**

156 Mangalwar Peth, Parge Chowk,
Barne Road, Pune - 411 011. Phone - 627260

- **All types of Transport Service**
- **All over Maharashtra**

# तुझे आहे तुजपाशी ... तू जागा चुकलासी



महिला विभागांतर्गत चालणाऱ्या विविध वर्गांमध्ये 'जगायला' लागणारं ज्ञान आपण परस्परांमध्ये वाटून वाढवत असतो. कोणत्याही गटातील महिला, विशेषकरून आर्थिक-सामाजिकदृष्ट्या अविकसीत गटातील महिला, आत्मनिर्भर आणि आत्मविश्वासानं परिपूर्ण असावयास हवी. त्याकरिता ती स्वतःच्या पायावर उभी हवी, तरच ती स्वतःचा आत्मसन्मान मिळवू शकते. 'स्व'रूपवर्धिनीमध्ये तिच्यामधल्या विविध कलागुणांची पारख करून तिच्या आवडीप्रमाणे विविध वर्गातून ती अर्थार्जन करू शकेल, असे शिक्षण तिला दिले जाते. तिच्याच परिश्रमातून, ती या वर्गांमधील ज्ञानाचा उपयोग, करून स्वतःचे घर स्वतःला आवडलेल्या प्रकारे सजवण्यासाठी पाहिलेल्या स्वप्नांना आर्थिक बळ देते. आपल्या अनेक सहकारी महिलांसमवेत या वर्गाला येणाऱ्या लाभार्थींना 'अग तुझ्या सगळया दुःखावरचा उपाय तुझ्यापाशीच आहे. फक्त तू जागा चुकलीयस ती शोध आणि खंबीरपणे उभी रहा' असं सांगते आहे 'स्व'रूपवर्धिनी. 'स्व'रूपवर्धिनीतील विविध वर्गांबद्दल थोडेसे :

**बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग :-** या वर्षी नव्यानंच सुरू झालेला वर्ग. घराघरातील संपर्कात आपल्याला अशी गोष्ट आढळली की, दहावी नापास मुलींची संख्या खूप आहे. जवळ जवळ ६० ते ६५% नापास झालेल्या, नाऊमेद झालेल्या, शिक्षण अर्धवट राहिलेल्या आढळल्या. त्यांच्याकरता काहीतरी करावं, त्यांना उमेदीनं उभं करावं, असं वाटू लागलं. त्यातून या प्रशिक्षण वर्गाची कल्पना पुढे आली. त्यांना आपण पत्रं लिहिली. त्यांचे पत्ते घ्यायला शाळांमध्येही गेलो. त्या सर्वांनिशी आता आपण बालवाडी शिक्षिकांकरिता प्रशिक्षण वर्ग सुरू केलाय आणि लौकीक अर्थानं चालू शिक्षणपध्दतीनं परिक्षापध्दतीत नाकारलेल्या ह्या मुली, रमून गेल्या आहेत, चिमण्या-चिमण्या मुला-मुलींच्या शिक्षणात. त्यांना खालील तज्ज्ञ शिक्षक शिक्षिकांचे समर्थ मार्गदर्शन लाभत आहे -

**श्रीमती शुभदाताई बदामीकर**

**श्रीमती नलिनीताई अक्कलकोटकर**

**श्रीमती सुरेखाताई पेंडसे**

**श्री. जगताप**

**श्रीमती मंगलाताई मोडक**

**श्रीमती निर्मलाताई सोहनी**

**श्री. जयंतराव कवठेकर**

**श्रीमती पुष्पाताई नडे**

या वर्गातील सर्व प्रशिक्षणार्थींना वर्धिनीच्या 'पाकोळी' बालवाडीत रोज प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण दिले जाते.

**पाकोळी (बालवाडी ) -** 'स्व'रूपवर्धिनीच्या वास्तूत बालवाडीचे ९ वर्ग वर्धिनीच्या वास्तूत व एक वर्ग येरवडा येथे तेथील बालकांसाठी चालतो. एकूण १५ शिक्षिका सुमारे ३०० बालकांना या १० वर्गातून शिकवतात.

**प्रीती हा मानवाच्या शापित जीवनाला देवाने दिलेला एकुलता एक वर आहे.**

**गृहशुश्रुषा वर्ग :-** (होम नर्सिंग वर्ग) सेवेचा आनंद ही स्त्रीसुलभ भावना असते जणू ! अन् आजारी माणसाची सेवा करणं हे तर परमआनंदाचं काम ! पण हे काम व्रत म्हणून करायचं आणि ...'उतणार नाही मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही' असं म्हणत हे करायचं असतं हे शिकवतात स्वतः आपले आयुष्य या कामासाठीच देण्याकरता वानप्रस्थाश्रमात जगणाऱ्या श्रीमती कलबाग व त्यांच्या सहकारी श्रीमती मराठे. वर्गाचा कालावधी सहा महिने. जून १९९७ ला या वर्षीची पाहिली बॅच बाहेर पडली, तर जुलै ९७ ला दुसरी बॅच सुरू झाली. संख्या २५. वेळ सोमवार ते शुक्रवार, १२ ते ३. पाच महिने अभ्यासक्रम व एक पूर्ण महिना के.ई.एम.मध्ये प्रात्याक्षिके असतात. पंधरा दिवसातून एकदा व्याख्यान असते. यात यंदाच्या वर्षी Care India तर्फे कॅन्सरच्या माहितीच्या स्लाईडस् दाखवल्या. सौ. बागेश्री पोंक्षे व शिरीष पटवर्धन यांची प्रेरणा जागृती करण्यासाठी व्याख्याने झाली.

**शिवण वर्ग :-** सौ वाईकर या वर्गाचं काम पहातात. सहा महिन्यांचा कालावधी असतो. संपूर्ण मशीनची माहिती दिली जाते. बालांचे व स्त्रियांचे कपडे शिवले जातात. याही वर्गात दर पंधरा दिवसांनी प्रेरणादायी व्याख्याने व आरोग्य विषयक फिल्म दाखविल्या जातात. महिला स्वतःचा व्यवसाय सुरू करतात. या वर्गात ३२ विद्यार्थिनी महिला सहभागी झाल्या आहेत.

**फॅशन डिझाईन कोर्स :-** या कोर्सचे काम सौ. त्रिगुणाईत पहातात. विशिष्ट कालावधीकरिता हा कोर्स नाही. १६/१७ महिला सतत लाभ घेत असतात. ७०/८० मुली शिकून बाहेर पडल्या आहेत. पैकी ६० जणींनी स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे. हे या वर्गाचे यश आहे.

**लोकर विणकाम वर्ग :-** सौ. पुष्पाताई कुदळे या दर रविवारी लोकरीचा विणकाम वर्ग घेतात. यंदाच्या वर्षी त्या वर्गातून शिकून बाहेर पडलेल्या चार मुलींना महिना रू. १०००/- पर्यंत प्राप्ती होत आहे.

**उर्दु मराठी वर्ग :-** सौ. शिंदे व श्रीमती कबीर या वर्गाचं काम पहातात. उर्दु शाळेत जाणाऱ्या २०/२५ मुली असतात. तिसरी ते नववी पर्यंतच्या मुली मराठी शिकायला वास्तूवर येतात. तर वस्तीवरील मुस्लिम भगिनींसाठी एकूण आठ वर्ग सुरू आहेत. ह्या वर्गात मराठी शिकलेल्या मुली, महिला शिवणवर्गात किंवा अन्य वर्गात प्रवेश घेतात. स्वतःच्या पायावर उभ्या राहतात.

**विविध प्रकारच्या उद्योगवर्गांचा, शिक्षणवर्गांचा कसा उपयोग होतो व महिला कशा स्वावलंबी व स्वाभिमानी बनतात हे खालील काही उदाहरणांवरून लक्षात येईल.**

१) धनकवडी येथील एक मुलगी शिवणवर्गाला आली. तिच्या घरात तिला मारहाण होत होती. भांडणं होत होती. सुरवातीला शिवणाचं मशीन तिला चालवता पण येत नव्हते. अशा परिस्थितीत ती 'स्व'रूपवर्धिनीत आली. तिने येथे फॅशन डिझाईनचा कोर्स पूर्ण केला. सध्या तिने स्वतःचा व्यवसाय सुरू केला व ती स्वतःच्या पायावर उभी आहे.

२) एका विद्यार्थिनी महिलेने स्वतः शिवणाचे वर्ग चालू केले आहेत. ५०० रू. दरमहिना ती मिळविते आहे.

३) एका प्रशिक्षित महिलेनं अप्पर इंदिरानगरला घर घेतले. तिथे कुठेही शिवणाचे वर्ग नाहीत हे पाहून तिने तिथे क्लास सुरू केला. तिची जाऊ व ती दोघीजणी खाजगी कामे घेतात. एक कटींग करते व दुसरी शिवण शिवते. सध्या त्यांचा व्यवसाय चांगला चालू आहे.

४) एका मुस्लिम मुलीने घरगुती टेलरिंगचा व्यवसाय येथे शिकून सुरू केला. केवळ ब्लाऊज शिकण्यासाठी ती इथे आली. एक महिन्यात ती ब्लाऊज शिवायला शिकली. परंतु पुढच्या कालावधीत तिचे लग्न ठरले. व तिने हे ज्ञान तिच्या आईला शिकविले. पुढे आईने व्यवसाय सुरू ठेवला.

# संगोपन - परिसरातल्या परिवारांचं

बालवाडी, बालशाखा, निरनिराळया शाखा, यांच्या माध्यमातून पालकांशी संपर्क वाढला. आणि पाल्य-पालक-परिसर अशी एक साखळी तयार झाली. हळूहळू या परिसरासाठी आरोग्य सेवा केन्द्र सुरू करण्याची कल्पना पुढे आली. हे सेवा केंद्र फक्त आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करून देणारे नसावे तर आरोग्य शिक्षण देणारे असावे असेही ठरले आणि के.ई. एम हॉस्पिटलच्या सहकार्यातून 'स्व'रूपवर्धिनीने माताबालसंगोपन केन्द्राची सप्टेंबर १९९२ पासून सुरवात केली. समाजाचे स्वास्थ्य हा महत्वाचा घटक आहे. आणि कुटुंबकल्याण व बालविकास या आघाड्यांवर हे स्वास्थ सुदृढ असेल तर तो समाज नक्कीच बाळसं धरेल या भूमिकेतून सदानंद नगर मधील रहीवाशांकरिता सदर केंद्र सुरू झाले व त्याचे परिणाम आता ५ वर्षांनी दिसू लागले आहेत.

के.इ.एम. हॉस्पिटलद्वारे 'स्व'रूपवर्धिनीत माताबालसंगोपन केन्द्र सुरू झाल्याला सप्टेंबर १९९७ रोजी ५ वर्षे पूर्ण झाली. उपेक्षित वस्त्यांमधील स्त्रियांचे आरोग्य, कुटुंबनियोजन, लसीकरण अशा अनेक गोष्टींकरीता मुख्यतः हा उपक्रम राबविला जातो. कुटुंबनियोजन, पोषक आहार, वैयक्तिक स्वच्छता, लहान वयांमधील लग्ने व त्यांचे दुष्परिणाम अशा अनेक विषयांचे शिक्षण देण्याचेही काम येथे चालते. स्त्रिया व मुलांकरिता चालविण्यात येणाऱ्या या केंद्राचा आठवड्यातून दोनदा ५० ते ६० व्यक्ती फायदा घेतात. १९९२ साली आठवड्यातून एकदा चालणाऱ्या या केंद्राचा १५-२० जण फायदा घेत. त्याच्या तुलनेत लक्षणीय वाढ १९९६-९७ या वर्षात दिसते. केंद्रात किरकोळ आजरांवरही तात्काळ उपाय केले जातात व निष्णात डॉक्टरांकडून तपासणी करून पुढील काही चाचण्या आवश्यक असल्यास अशा रूग्णांस के.ई.एम हॉस्पिटल तर्फे तपासले जाते व अल्प दरात उपचार केले जातात. नुसती वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा हेतू नाही. प्रत्यक्ष काम करताना संबंधित कुटुंबांना महिन्यातून एकदा नियमीतपणे भेट दिली जाते व विविध विषयांवर त्यांच्याशी चर्चा होऊन सल्ला दिला जातो.

१) गर्भधारणेपूर्वी घेण्याची काळजी. मुलाच्या जन्मानंतर घ्यायची काळजी.

२) मुलांचे लसीकरण

३) जोडप्यांशी सविस्तर चर्चा व त्यांनी कुटुंब नियोजनाच्या विविध उपयांचा विचार करून साधनांचा वापर करावा यासाठी त्यांनी केंद्रप्रमुखांची भेट घ्यावी असे प्रयत्न केले जातात. ज्यांना या साधनांचा उपयोग करायचा आहे त्यांना ती उपलब्ध करून देणे, वंध्यत्वीकरणाच्या शस्त्रक्रिया करणे व त्याचे अनुधावन करणे ह्या गोष्टी नियमितपणे केल्या जातात.

**मुलांचे लसीकरण :-** सदानंदनगरमधील रहिवासी ससून, कमला नेहरू व KEM हॉस्पिटल अशा तीनही ठिकाणांवरून लसीकरण करून घेऊ शकतात. तसेच आपल्या केंद्रावरही ही सोय केली जाते. १९९७ सालात ९०– मुलांचे लसीकरण झाले आहे. राष्ट्रीय लसीकरण

**माणूस झाडासारखा आहे. तो सुखासुखी वठत नाही. तो ओलावा शोधीत राहातो.**

मोहीमेत ३८३ मुलांचे लसीकरण झाले. तसेच गरोदर असलेल्या सर्व स्त्रियांना आयर्न व फॉलीक ॲसिडच्या गोळया वाटण्यात आल्या आणि सर्व स्त्रियांना धनुर्वाताची इंजेक्शन्स् देण्यात आली होती.

**कुटुंब कल्याण उपक्रम**

वस्तीतील पात्र ५२६ जोडप्यांपैकी ३६५ जोडप्यांनी वंध्यत्वीकरणाच्या शस्त्रक्रिया करून घेतल्या आहेत, आणि तात्कालीक साधने वापरण्याची संख्या ८२ आहे व एकूण कायमस्वरूपी तात्कालीक कुटुंबनियोजन साधने वापरणाऱ्यांची संख्या ४३८ म्हणजेच उपलब्ध जोडप्यांपैकी ८०% जोडप्यांनी या उपक्रमाचा फायदा घेतला आहे.



मुलांची आरोग्य तपासणी : एकूण २४७ मुलांची तपासणी करण्यात आली.

| रोगाचा प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| १) कोणताही आरोग्यविषयक तक्रार नाही असे विद्यार्थी | १३५ | ५४.७ |
| २) दातांचे प्रश्न असलेले विद्यार्थी | २८ | ११.३ |
| ३) कान-नाक-घसा यांबद्दल प्रश्न असलेले विद्यार्थी | २८ | ११.३ |
| ४) 'अ' जीवनसत्वाची कमतरता असलेले विद्यार्थी | ५ | २ |
| ५) त्वचा विकार | १ | ०.४ |
| ६) जंत | ३२ | १३.० |
| ७) सुमार आकलनशक्ती असलेले विद्यार्थी | १८ | ७.३ |

# फिरत्या चाकावरची शाळा

✍ सौ. बागेश्री पोंक्षे

माले गावातील बालचमूंना अंगाभोवती चादर गुंडाळून राम-दरबारात बसलेलं पाहिलं. शिबिरातला भजनाचा कार्यक्रम आटोपत आला होता. त्यानंतरचा कार्यक्रम होता भोजन आणि आकाशदर्शन. दातीर गुरूजींच्या साथीनंही भजन रंगलं. सातव्या इयत्तेतील विद्यार्थ्यांच्या सहभागानं दरबारातील 'ओंकार-स्वरूपा सद्गुरू समर्थानं' मजा आली.

फिरत्या चाकावरची शाळा, प्रयोगशाळा किंवा अनुभव शाळा, काहीही नाव द्या. या आमच्या 'अनुभव शाळेचं' हे पहिलंच निवासी शिबिर होतं. पहिल्या शिबिराला असतो, तसा उत्सुकतेचा, नवेपणाचा, ताजेपणाचा वास सर्वत्र भरून राहिला होता.

गरीब शेतकऱ्यांच्या 'जिमिनी' पाण्याखाली जाऊ नयेत, त्यांच्या रोजी-रोटीवर पाय येऊन भल्या-भल्यांना 'विकास' वाटणाऱ्या धरणाचं बांधकाम तिथं सुरू होऊ नये, म्हणून धरणं धरणाऱ्या सेनापती बापटांचं हे गाव. आणि त्यांच्याच नावानं शिक्षण देणाऱ्या संस्थेच्या शाळेची ही मुलं. 'सेनापती बापट विद्यालय',माले, मुळशी.. शिबिरार्थींची संख्या ६०.इयत्ता ७वी. हे शिबिर घेतलं जात होतं 'स्व'-रूपवर्धिनी, पुणे व विज्ञानभारती, पुणे यांच्या वतीनं. अर्थात शारीरिक विकास, मानसिक विकास, सर्वांगीण विकास अशा अनेकानेक विकासांच्या गर्दीत वैज्ञानिक दृष्टिकोन किंवा वैज्ञानिक विकास या नवीन गुंत्यांची भर टाकून, ग्रामीण पातळीवर भरभराटीची स्वप्न पाहण्याइतक्या ह्या संस्था कामात नवख्या किंवा अननुभवी नव्हत्या. मालेकरही "लई मान्सं शहरास्नं येत्यात, काय-बाय सांगत्यात. अन् पुन्ना त्यांचं त्वांड बी दिसत न्हाई". अशा मनस्थितीत नव्हते. गेले सहा महिने दर शनिवारी बापट विद्यालयात चार चाकी गाडीतनं येणाऱ्या ह्या 'फिरत्या साळंबद्दल' त्यांनाही विश्वास वाटायला लागला होता. त्या विश्वासाची पावती या शिबिरात मालेकरांनी दिलेल्या प्रचंड उत्स्फूर्त सहकार्यावरून मिळत होती. शिबिरार्थी, व्याख्याते, पाहुणे या सर्वांच्याच जेवणाची व्यवस्था गावानं केली होती. शिवाय शेवटच्या दिवशी अभ्यागतांना बुंदीची कळी देऊन त्यांचं तोंड गोडही केलं होतं.

अर्थात या सगळ्या कामाची पध्दतशीर सुरवात आणि नियोजन केलं होतं अनेक कार्यकर्त्यांनी. विज्ञानभारतीचे डॉ. पुणतांबेकर, डॉ. पानसे व डॉ. कुंटे हे त्यांच्यासह काम करणाऱ्या बिविध विभागातील ४५ तज्ज्ञांसह या कामासाठी कंबर कसून उभे राहिले होते. त्यात होते संशोधक, प्राध्यापक, शिक्षक, डॉक्टर, पशु वैद्य, पाणी तज्ज्ञ, शेती तज्ज्ञ, अनेकजण. या सर्वांनी आपल्या अनुभवांचं भांडार खुलं ठेवलं होतं. सगळयांसाठीच आणि जेव्हा जेव्हा गावकऱ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शनाची आणि सहभागाची गरज भासेल तेव्हा तेव्हा ते उपस्थित राहणार होते. त्यांच्याबरोबर 'स्व'-रूपवर्धिनीचे युवक-युवती, कार्येकर्ते, प्रत्यक्ष गावकऱ्यांपर्यंत पाहोचण्याच्या कामी, स्वतःचा उपयोग करणार होते.

'स्व'-रूपवर्धिनीसारखी शिक्षण व सहवासाद्वारे समाजपरिवर्तन करणारी स्वयंसेवी संस्था व विज्ञानभारती सारखी 'वैज्ञानिक दृष्टिकोनाचा सर्वदूर प्रसार करण्यासाठी विविध माध्यमांद्वारे समाजापर्यंत पोहोचणारी व त्याद्वारे समाज परिवर्तन घडवू पहाणारी संस्था अशा दोन संस्था एकत्र येऊन त्यांनी हा प्रकल्प सुरू केला होता.

निवडलेल्या गावांमध्ये त्या त्या गावच्या शाळेतील मुलांपर्यंत फिरती प्रयोगशाळा व गणित / इंग्रजी / शास्त्र या विषयातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनासह पोहोचणे हा उपक्रम 'पायलट प्रोजेक्ट' सारखा वापरला जाणार होता. त्याचाच एक भाग म्हणून हे शिबिर आयोजित करण्यात आलं होतं. या मुलांच्याद्वारे त्यांच्या घराघरांमध्ये पाहोचून सगळं गावच आपल्या हया उपक्रमात सहभागी करून घेण्याचं स्वप्न आहे. आणि त्याला थोडा-थोडा आकार प्राप्त व्हायला लागला आहे. मग आंबडवेटमधील डॉ. दवेरे यांचं दुग्धव्यवसायावरचं भाषण हे त्या गावचं काम उभं करताना आपला सहभाग देणारं होतं. तर

**माणूस जन्माला येताच अनेक अतूट धाग्यांनी जगाशी बांधला जातो.**

डॉ. जोशींच किटकनाशकांवरील भाषण हे त्याचं समर्थ योगदान देणारं होते.

मालेसारख्या गावात विविध वनस्पतींचा औषधासारखा उपयोग, आयुर्वेद चिकित्सेतील वनस्पतींचं महत्व, जैविक रसायनांचा वापर असे अनेकानेक विषय पुढे येत गेले व गावकऱ्यांसमोर तज्ज्ञांचे मार्गदर्शन होत गेले. आता तर 'स्व'-रूपवर्धिनीचा तरूण कार्यकर्ता वैद्य विनेश नगरे यांनी दर रविवारी, वैद्यकीय सेवा, मालेकरांसाठी उपलब्ध करून दिली आहे व तिचा लाभही मालेकरांना उत्तम रीतीने मिळत आहे.

गावातील बालगोपाळ हे त्या गावाचं मुख्य धन. गुरावासरांसाठी विविध उपक्रम झाले. पण या वांड, वारं प्यायलेल्या खोंडांना काबूत आणायला हवं होतं. नुसत काबूत ठेऊनही भागणार नव्हतं. त्यांना पुस्तकातल्या गणिताचा डोळा वटारलेला वाटणार नाही अशी काळजी घ्यायची होती. कविता, धडे शिकवता शिकवता त्यांच्या बोली भाषेत त्यांना कवितेतली माणसं अवती-भवती आपल्यातच असतात. आपल्यालाही कविता करता येतात, नव्हे नव्हे खरं तर आपल्यावरच कुणी कविता का करू नये? आपण का असं काही विशेष करू नये की ज्याची आपल्या गावानं दखल घ्यावी! सेनापती बापटांनी ज्या गावात लढा, धरणे धरले तेथे आपण जन्माला आलो अशी प्रेरणा तिथल्या मुलांमध्ये निर्माण व्हावी ह्याकरता प्रेरणाजागृतीचं काम कुणीतरी करायला हवं होतं. ते हाती घेतलं कु. वैभवी पवार व कु. मंगल कुडलिंगार यांनी ! वर्धिनीतील विविध शाखांमधील कार्येकर्ते त्यांना मदत करणार आहेत.

दर रविवारी खेळ, गाणी, गप्पा, गोष्टी, डबा खाणे व अभ्यास अशा अनेकानेक गोष्टींनी त्या बाळगोपाळांमध्ये इतक्या रमल्या आहेत की मुलांना रविवार त्यांच्याशिवाय सुना-सुना वाटतो.

त्यांच्याबरोबरच मुलांना 'गणितातही गमती जमती असतात' असं सांगणारे गोडसे सर दिसतात. त्यांच्या स्वच्छ पांढऱ्या केसांमुळे आणि दाढीमुळे ते मुलांना 'सांताक्लॉजच' वाटतात. 'गणिताच्या मास्तराचं सुरांशी वाकडं असतंच असं नाही' असा धडाही 'माले'तील मुले गिरवीत असतात, 'राम नारायण बाजा बजाता', या त्यांच्या गीतातून !

या मुलांचा मला अगदी हेवा वाटतो! गोडसे मास्तरांसारखे 'मास्तर' त्यांना मिळाले! ते आपल्या गणिताच्या पोतडीतून चक्क गंमती-जमती काढून मुलांना हसवतात तेही अधून-मधून नव्हे - पूर्ण तास संपेपर्यंत. "गणिताचा तास संपला कधी ते कळलंच नाही " असा लौकिक प्राप्त झालेले, या विषयाचे एवढे एकच सर, माझ्या पाहण्यात आले. डॉ. पुरुषोत्तम जोशी हे देखील तसेच. सतत चालू असलेल्या त्यांच्या शांत निरीक्षणामागे आणि शाळेतल्या वनस्पतींवर आढळणारे कीटक बंद बाटल्यांमधून भरून ठेवण्यांच्या त्यांच्या छंदामागे त्यांचा केवढा प्रचंड अभ्यास लपलेला आहे ! तो सगळा अभ्यास वेगवेगळया स्लाईडस्मधून, कधी पडद्यावरून, तर कधी सूक्ष्मदर्शिकेखालून, मुलांपर्यंत पोहोचतेय, आणि एरवी शांत-शांत दिसणाऱ्या जोशी मास्तरांना त्यांच्या आवडत्या विषयांवर खुलून बोलताना ते पाहताहेत म्हणूनच या मुलांचा मला हेवा वाटतो. असे धडे किंवा चॅप्टर न शिकवता तो विषय आमच्यामधे राहून, हसून, खेळून शिकवणारे मास्तर आम्हांला मिळाले असते, तर आमच्यातूनही काहीतरी घडले असते. नुसताच "उंच वाढला एरंड" अशी गत झाली नसती.

तेव्हा या सगळयाच प्रकल्पाला दर्जा मिळवून देण्यासाठी आणि उंच वाढलेल्यांचे 'एरंड' न बनता 'इक्षुदंड' बनावेत म्हणून झटणारे अनेक लोक या प्रकल्पाला लाभले. ते जोशी मास्तर असतील, गोडसे मास्तर असतील, वैभवीताई, मंगलताई, दिपालीताई, भारतीताई, बोकीलबाई, पुणतांबेकर सर, असे किती - किती जण या फिरत्या गाडीबरोबर फिरताहेत !

मुलेच उद्या गावच्या निर्णयप्रक्रियेत पुढाकार घेतील असे पहायचेय. सर्वच गावांमधून 'माले' गावाप्रमाणे विद्यार्थी, गावकरी, महिला, युवक, गावातील प्रश्न सोडवण्याकरीता झटणारे ज्येष्ठ नागरिक, या सर्व पातळयांवर कामाचे जाळे विणले जावे, असा प्रयत्न असणार आहे.

गावात व्यसनमुक्ती, शिक्षण, आरोग्य, शेती, पाणी अशा विविध अंगांनी काम वाढावे असा प्रयत्न आहे. सध्या ५ गावांमध्ये चालू केलेले काम आणखी गावांपर्यंत पोहोचावे असा प्रयत्न आहे.

मालेचे मुख्य पीक भात. या भातासाठी खत गोळीचा प्रकल्प करायचाय. या शिबिरात शिबिरार्थी म्हणून आलेला विद्यार्थी या प्रकल्पाची धुरा खांद्यावर घेणारा खंदा कार्यकर्ता बनेल. जर तो स्वतःच अशी शिबिरे घेऊ लागेल-गावकऱ्यांसाठी, शेतकऱ्यांसाठी, महिलांसाठी-तरच हा प्रकल्प योग्य दिशेने चाललाय असे सांगता येईल. त्यासाठी तुम्हा सर्वांचे सहकार्य लाभेल. एक शिक्षक म्हणून, कार्यकर्ता म्हणून, एखाद्या विषयाचा तज्ज्ञ म्हणून, एखाद्या प्रकल्पाचा प्रतोत म्हणून. वाचकांतील कोणी आमच्यापर्यंत पाहोचेल तर फिरती गाडीची चाके जोराने फिरतील.

# प्रयत्न - सावरण्याचा



ॲडव्होकेट सौ. निलिमा गोखले

गेली पाच वर्षे 'स्व' रूपवर्धिनीच्या वास्तुमध्ये कौटुंबिक समस्या, कलह सोडविण्याच्या संदर्भात मार्गदर्शन करणारं एक केन्द्र चालवलं जातं. 'स्व'रूपवर्धिनीच्या विचारप्रणालीला अनुसरून कुटुंबात सामंजस्य निर्माण करण्याच्या प्रयत्नाला प्राधान्य दिलं जातं. यातूनही मार्ग न निघाल्यास कायदेशीर प्रक्रियेच्या बाबतीतही मार्गदर्शन व साहाय्य केलं जातं. हे केन्द्र दर मंगळवारी तीन ते पाच या वेळात 'स्व' रूपवर्धिनीच्या वास्तूतच चालविले जाते. यंदाच्या वर्षी अंदाजे चाळीस प्रकरणे या केन्द्रानं हाताळली. **यापैकी बारा ते तेरा प्रकरणांमध्ये सामंजस्यानं मार्ग काढण्यात यश आले.** सुमारे आठ ते दहा प्रकरणी कायदेशीर प्रक्रियेत साहाय्य केले. उर्वरित प्रकरणात अद्यापी तडजोडीचा प्रयत्न चालू आहे.

सामंजस्यानं मार्ग काढण्याकरता खूपच प्रयास पडतात. एक नांदतं कुटूंब. पती-पत्नीत बेबनाव होतो. पत्नीला असह्य छळ भोगावा लागतो. छळ इतका की शेवटी मन घट्ट करून आपल्या मुलींना टाकून तिला घरातून निघून जावं लागतं. पती पोलिसात तक्रार नोंदवतो. इथपर्यंत पोचलेल्या प्रकरणातही केन्द्रानं अत्यंत कुशलतेनं मार्ग काढला. उभयतांची समजूत काढली. शेवट अत्यंत गोड झाला. मुलींना आई मिळाली, आईचं प्रेम मिळालं.

कायदेशीर प्रकरणात जवळ जवळ सात-आठ प्रकरणी पत्नीला पोटगी मिळवून देण्यात आली. एका ख्रिश्चन मुलीच्या बाबतीत केन्द्राला एक वेगळ्या प्रकारचे कायदेशीर प्रकरण हाताळण्याचा अनुभव आला. **ख्रिश्चन विवाह कायद्यात स्वातंत्र्योत्तर काळांतही कोणताही बदल न झाल्यानं ख्रिश्चन महिलांना कितीही आवश्यकता असली तरी त्वरीत न्याय मिळू शकत नाही.** अशा स्थितीत मेरी आमच्या केन्द्राकडे आली. विवाहाच्या पहिल्या दिवसापासूनच मेरीच्या पतीला तिच्याबद्दल काडीचीही आपुलकी, प्रेम वाटले नाही. दोघांच्यात प्रारंभापासूनच जवळिकीऐवजी दुरावाच रहात आला. एकाच घरात असूनही दोघंही विभक्त राहू लागले. नावापुरतेच पती-पत्नीचें नातं राहिलं. हे एक वेगळंच प्रकरण होतं. शेवटी ख्रिश्चन कायद्याच्या चौकटीतच पण एक धाडसी पाऊल केन्द्रानं उचललं. घटस्फोटाऐवजी हा ' विवाह ' विवाहच नाही असा निर्णय कायदेशीर लढाई देऊन मिळवण्यात केन्द्राला यश आलें.


एकूण सर्व प्रकरण हाताळताना काही बाबी लक्षात येतात. पती-पत्नींचा पराकोटीचा अहंकार, पराकोटीचे गैरसमज दुराव्याच्या मुळाशी असतात. पुरूषी अहंकार किंवा अहंगंड असतो. उभयतांच्या नातेवाईकांचे अनावश्यक हस्तक्षेप असतात. याचा परिणाम म्हणून कुटुंब उध्वस्त होतंच पण कोणताही अपराध नसलेल्या मुला-बाळांचं, एक प्रकारे आपल्या राष्ट्राच्या भावी धनसंपत्तीचं भवितव्य अंधारून टाकलं जातें याचा विचार समाजानं विशेषतः अशा प्रश्नांशी संबंधित असलेल्या सर्वांनीच करावा असे केन्द्राला तळमळीनं वाटतं.

**माणसे अनेक नाजूक धाग्यांनी परस्परांशी बांधली जातात.**


# या दानासी, या दानाहुन अन्य नसे उपमान !

'स्व'- रूपवर्धिनीने विज्ञानभारती या संस्थेच्या सहकार्याने फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प सुरू केला आहे. या प्रकल्पासाठी मुंबईच्या जे. आर. डी. ॲन्ड थेल्मा जे. टाटा ट्रस्टने 'स्व'- रूपवर्धिनीला एक वाहन देणगी स्वरूपात दिले आहे. हे वाहन वर्धिनीला प्रदान करण्याचा कार्यक्रम दि. २७ सप्टेंबर १९९७ रोजी संपन्न झाला.

**त्याची ही क्षणचित्रे ....**




टाटा ट्रस्टच्या संचालिका व वर्धिनीच्या सक्रीय हितचिंतक आदरणीय डॉ. बानू कोयाजी वाहनाची किल्ली संस्थेचे अध्यक्ष श्री. पुरूषोत्तमभाई श्रॉफ यांचेकडे सुपूर्द करीत आहेत.



टाटा ट्रस्टने देणगीस्वरूपात दिलेल्या वाहनापाशी डॉ. बानू कोयाजी यांच्या समवेत वर्धिनीचे संचालक व कार्यकर्ते.

# व्यक्ती व्यक्ती घडविणे मार्ग हा भला

**पंकज मीठभाकरे :-**

गेली १९ वर्षे 'स्व'रूपवर्धिनी काम करीत आहे. या १९ वर्षात संपर्कात आलेले विद्यार्थी तर आपुलकीच्या धाग्याने जोडले गेले आहेतच, पण अनेक कुटुंबेही वर्धिनीशी जोडली गेली आहेत. व्यक्ती व्यक्तीचे हे नाते जुळवण्यासाठीचा वर्धिनीतील सर्वात प्रभावी कार्यक्रम आहे तो म्हणजे संपर्क. वर्धिनीच्या सर्व शाखांमधून, संपर्काच्या माध्यमातून हे साध्य झाले आहे. संपर्काला सातत्याने जाणाऱ्या कार्यकर्त्यांना मुलांमध्ये, घरांमध्ये होत जाणारे बदल टिपायची संधी मिळते. संपर्काच्या या प्रभावी कार्यक्रमाच्या दरम्यान आलेले हे काही अनुभव.

**आत्मविश्वासाची किमया :-** प्रशांत नावाचा नियमित शाखेत येणारा एक विद्यार्थी. चित्रकला, हस्तकला, पद्य, गायन, इत्यादी सर्व कलांच्या ओढीमुळे त्याचं अभ्यासावरचं लक्ष कमी झालं. परिणाम गुणांमध्ये दिसायला लागले. पालकांना चिंता वाटू लागली व त्यांनी त्याला खाजगी शिकवणी वर्गाला पाठवण्याचे ठरवले. एक दिवस पालकांनी त्याला सांगितले की, वर्धिनीची शाखा बंद करायची आणि क्लासला जायचे. प्रशांतला हे मंजूरच नव्हते. त्याने आपल्या पालकांना सांगितले की, 'मला क्लासच्या कुबड्यांची आवश्यकता निश्चितच नाही आणि वर्धिनीच्या शाखेत अगदी मनापासून शिकवतात'. व्यावसायिक क्लासमुळे काय तोटे होऊ शकतात तेही पालकांना त्याने पटवून दिले. प्रश्न होता गुण कमी मिळाल्याचा. त्याने पालकांना ठामपणे सांगितले की अभ्यासावर अधिक लक्ष केंद्रित करून मी पुढच्या परिक्षेत चांगले गुण मिळवून दाखवीनच. आणि खरोखरीच हा विद्यार्थी ८०% गुण मिळवून उत्तीर्ण झाला.

**<u>पोटभर गप्पांशिवाय आता जेवणच होत नाही</u>**

एका नव्याने शाखेत यायला लागलेल्या विद्यार्थ्याच्या घरी संपर्काला गेल्यानंतर गप्पा मारताना जाणवत होत की या विद्यार्थ्याच्या आईच्या मनात वर्धिनीच्या शाखेसंबंधी



काही शंका आहेत आणि त्यामुळे त्या मुलाला शाखेत पाठवायला फारशा उत्सुक नाहीत. एक दिवस त्याच सांगत होत्या की, हा फारच हळवा आहे. पैकीच्या पैकी गुण मिळवायला २ गुण कमी पडले, तर किती रडला. बस्स! सूत्र सापडले. मग त्यांच्याशी वर्धिनीत आल्याने धाडसीपणा, आत्मविश्वास कसा वाढतो हे त्यांना सांगितले. काही प्रत्यक्ष उदाहरणे सांगितली. आईचा दृष्टिकोन हळूहळू बदलू लागला. आता तर तो शाखेत

**प्रेम हा सौदा नाही. ते ईश्वरी वरदान आहे. प्रकाशासारखं ! पावसासारखं !**

इतका रमलाय की, काही विचारू नका. रोज शाखेतून गेल्यावर जेवायच्या वेळेस शाखेतल्या गमती-जमती सांगितल्याशिवाय त्याला आणि त्या गप्पा ऐकल्याशिवाय घरच्यांना चैनच पडत नाही. परवा तर आईच म्हणाली, "अहो सर वर्धिनी संबंधी पोटभर गप्पा मारल्याशिवाय आता जेवणच होत नाही."

**सर नक्की नक्की या ! मी तुमची वाट पाहीन**

वाढदिवसाच्या दिवशी वर्धकाच्या घरी जाऊन त्याचे शुभचिंतन करावे हे वर्धिनीच्या कार्यक्रमातील, विशेषतः संपर्काच्या रचनेतील, एक महत्त्वाचे काम. एक दिवस एका वर्धकाचा वाढदिवस होता. त्याच दिवशी नेमका धो धो पाऊस पडत होता. शाखेतच त्याचे शुभचिंतन केले. त्याला घरी जरा लवकरच पाठविले पण जाताना तो म्हणाला "सर तुम्ही नक्की या. मी तुमची वाट पाहीन. शाखेवरचे सर्व कार्यकर्ते शाखा सुटल्यावर संपर्क वगैरे कामे आटोपून घराच्या दिशेने निघाले होते. अचानक त्या वर्धकाचे वाक्य आठवले आणि सगळेजण त्याचया घराच्या दिशेने निघाले. रात्रीचे जवळपास ११.०० वाजले होते. या वर्धकाच्या घरापाशी आल्यावर लक्षात आले की, तो आमची वाट पहात जिन्यातच बसलेला आहे. त्याने आईबाबांना सांगितले होते की "कितीही उशीर झाला तरी सर नक्की येतील. ते आल्याशिवाय मी काही जेवणार नाही." आई बाबांशी थोड्या गप्पा झाल्या निघताना त्याचे बाबा म्हणाले "सर तुम्ही किती जीव लावता हो !" हे श्रेय अर्थातच वर्धिनीच्या कार्यपध्दतीचेच आहे. पण त्याचे आग्रहाचे निमंत्रण विसरले गेले असते तर ...?

**माझ्यापुरते माझे जीवन, विचार असला नको खुळा?**

वर्धिनीत येणारे विद्यार्थी हे वेगवेगळ्या आर्थिक स्तरातील आहेत. पण रोजच्या शाखेमुळे हे वर्धक एकमेकांच्या जवळ खऱ्या अर्थाने येतात असा अनेकदा अनुभव येतो. शाखेतला असाच हा एक प्रसंग. शाखेतल्या एका वर्धकाची आर्थिक परिस्थिती अगदीच बेताची आहे ही गोष्ट त्याच्या बरोबरच्या वर्धकांच्या लक्षात आली. दिवाळीच्या सुट्टीनंतर शाखेतल्या एका कार्यकर्त्याकडे गोळा केलेले काही पैसे त्यांनी सुपूर्द केले आणि त्या वर्धक मित्राला शर्ट घेऊन द्यावा अशी विनंती केली. या कार्यकर्त्यांने त्या सर्व वर्धकांना विचारले, "काय रे हे पैसे तुम्ही कोठून आणले? त्यावर त्यांनी दिलेले उत्तर विचार करायला लावणारं आणि आनंद वाटावा असचं होतं. ही मुल म्हणाली, "सर! दिवाळीत आम्ही फटाके उडवले नाहीत. त्यासाठीचे मिळालेले पैसे आम्ही गोळा केले. नाहीतरी फटाक्यांनी प्रदुषणच होतंच. त्यापेक्षा त्या पैशातून आमच्या मित्राला ड्रेस घेता आला तर आम्हाला अधिक आनंद होईल." त्यांचे ते विचार ऐकून वर्धिनीतच अनेकदा म्हटलेल्या गीतांच्या ओळी झट्दिशी डोळयासमोर आल्या "माझ्यापुरते माझे जीवन, विचार असला नको खुळा."

संपर्काच्या माध्यामातून, औपचारिक-अनौपचारिक गप्पांच्या माध्यमातून मुलांमधील बदल जाणवले की काम करण्याचा हुरूप खरोखरीच खूप वाढतो. आनंदाचे हे क्षण गेल्या १९ वर्षांत अनेकांनी, अनेकांच्या बाबतीत, अनेकदा अनुभवले आहेत.

◆ ◆ ◆

# यात्रा - चार सेवाधामांची

❑ ***श्रीमती पुष्पाताई नडे, सौ बागेश्री पोंक्षे, कु. रोहिणी तेंडुलकर, कु. सुरेखा माळी, सर्वश्री श्रीहर्ष सगरे, ज्ञानेश पुरंदरे, श्रीपाद कुलकर्णी, नंदन प्रभुणे, तेजस सप्तर्षी, आमोद काळे, केदार पारगांवकर, माधव केळकर हे 'स्व'रूपवर्धीनीचे कार्यकर्ते विदर्भातील चार सेवाभावी संस्थांच्या कार्याचे प्रत्यक्ष अवलोकन करण्यासाठी गेले होते. त्याचा वृत्तांत -***

✍ ***केदार मुकुंद पारगावकर***

अनेक संस्था आणि त्यांचे काम, कामामागची प्रेरणा, उद्देश, आणि एकूण कार्यकर्त्यांची मानसिकता, यावरून त्या कामाचा लहानमोठेपणा ठरत असतो. त्या अनुषंगाने अशाच काही संस्थांचा अभ्यास करून त्यांचा 'स्व'रूपवर्धीनीच्या कामात कसा उपयोग करता येईल या हेतूने 'उन्हाळयातील' विदर्भ दौरा संपन्न झाला.

५ मे ते १० मे १९९७ असा या शैक्षणिक सहलीचा कालावधी होता. आनंदवन, सोमनाथ प्रकल्प, गडचिरोली, लोकबिरादरी प्रकल्प अशा चार संस्थांचा अभ्यास या दौऱ्यात करण्याचे ठरले.

***आम्हीच अमुच्या क्षुद्रपणाने अमुचा बांधव शुद्रविला !***
***कलंक हा तर शेवाळयासम समाज जाईल रसातळा !***

५ मे १९९७ ला सायंकाळी ७.३० वा आमचा १२ जणांचा अभ्यासगट आनंदवनात पोहोचला. अभ्यासाच्या पहिल्या धड्याचा श्रीगणेशा, तेथे पोहोचल्या क्षणीच झाला. कारण "असं कळवण्यापूर्वी येत जाऊ नका" असे कडक शब्द कानावर आले. न कळवता अशा प्रकल्पांवर गेले की तेथील व्यवस्थेत काय अडचणी येऊ शकतात हे लक्षात यायला हवेच होते. अर्थात हे या प्रसंगी शिकायला मिळाले. पण त्यानंतर यथायोग्य स्वागत झाले हेही महत्वाचे.

प्रथमतः श्री अविनाश साठे यांच्याशी परिचय झाला. खान,पान, मुखमार्जन आटोपून शतपावलीसाठी साठेकाकांबरोबर सर्वजण बाहेर पडलो. अथपासून इतिपर्यंत माहितीची देवाणघेवाण सुरू झाली. डॉ. आमटें (बाबा) नी कोणत्या प्रेरणेने काम सुरू केले येथून सुरुवात झाली. साठेकाका सांगत होते...

'५० वर्षापूर्वी बाबांनी एक कुष्ठरोगी रस्त्यावर पाहिला. त्याच्याजवळ जाण्यास कोणी तयार नव्हते. सर्वजण त्याला टाळून चालत होते. तो मात्र आधारासाठी याचना करत होता. पण त्यासाठी त्याचे हात शाबूत नव्हते. बाबांना ते पाहवले नाही, आणि आत कुठेतरी त्यांच्या मनात त्याच्या विषयी सहानुभूती निर्माण झाली, त्या सहानुभूतीचा प्रत्ययच आजच्या आनंदवनात आम्ही अनुभवीत होतो. आजच्या या आनंदवनात काय काय सोयी-सुविधा उपलब्ध आहेत हे जाणून घेत घेत आम्ही आनंदवनातल्या निवासस्थानी येऊन झोपी गेलो.

पक्षांच्या मधुर किलबिलाटाने पहाटे ५.३० वा हळूवारपणे गोंजारून जागे केले, आणि सूर्याच्या पहिल्या किरणाबरोबरच या वास्तूच्या निसर्ग रम्यतेची ओळख पटली. निसर्गाबरोबर तास दोन तास गुणगुणत टिपणवही,

**निरहंकारी प्रेम हीच माणसाच्या आत्म्याच्या विकासाची पहिली पायरी असते.**

पेन घेऊन साठेकाकांचे शब्द टिपण्यासाठी आम्ही तयार झालो. आणि त्यांच्या मागून चालू लागलो. कुष्ठरोग्यांच्या निवासी नेण्याअगोदर त्यांनी आम्हाला अशा काही गोष्टी दाखविल्या की एखाद्या लहानशा पण सुसज्ज अशा खेडेगावातच आल्यासारखे वाटले.

प्रथम डायनोसोर व इतर पुरातनकालीन अवशेष जिथे व्यवस्थित जपून ठेवले आहेत अशा खोलीत जाऊन त्याची माहिती घेतली. कला व सौंदर्यदृष्टी त्यातून जाणवली. त्यानंतर 'मॉडर्न फूट वेअर' अशी पाटी असलेल्या खोलीत प्रवेश केला. तेथे चक्क मॉडर्न चपला, बुट, सँडलस बनत होत्या आणि फक्त हातांनीच. त्यानंतर गुलाब-मोगरा, इ. फुलांनी गच्च भरलेल्या मळयांमध्ये आम्ही प्रवेशलो. कित्येक एकर जमिनीवर कोणतेही यंत्र न फिरवता हे मळे फुलले होते. यानंतर घुमटाकार घरांची रचना व बांधणी

समजावून घेतली. भूकंपापासून व कोणत्याही तीव्र तापमानापासून बचाव करण्यासाठी हे घरांच्या आकाराचे व रचनेचे नवीन तंत्र कुठून बाहेरून आणलेले नव्हते. इथलेच होते. ५/६ दिवसात अनेक लोकांच्या मदतीने हे घर उभारले जाते.

आम्ही पुढे जात राहिलो, पोस्ट ऑफिस, बँक, थर्मल पॉवर स्टेशन, खडू-वीटांचे यंत्रांचे कारखाने, कॉलेज, फक्त हातांनी फुलविलेले गुलाब मोगरा भाज्यांचे मळे,फळांच्या बागा, इ. सर्व पाहून मन भरून आले हे सर्व पहात असतानाच असंख्य कुष्ठरोगी अप्रतिम भेटकार्डे बनवत असताना दिसले. तुटलेल्या बोटांनी सतरंज्या विणताना पाहिले. तुटक्या हाताने केलेली कलाकुसर पाहिली आणि थक्क झालो. या निरीक्षणानंतरचे श्री. विकास आमटेंचे बोलणे तितकेच समर्पक आणि प्रेरणादायी होते. "ज्यांचे शारिरीक सौंदर्य गेले आहे तेच चिरंतन सौंदर्याचा अविष्कार घडवत आहेत. आपले आयुष्य नाहीसे झाले तरी दुसऱ्याचे आयुष्य फुलवीत असतात. कारण एकच की, 'भीक मागून बोटे गळून पडण्यापेक्षा कष्ट करून गळून पडली तरी चालतील' असा बाबांचा संदेश त्यांनी ऐकला' आणि कामाला लागले". समाज याच फुलांना पायाखाली चुरगळण्याच्या मागे लागला आहे, आणि चुरगाळणाऱ्या त्याच पायांना ही फुले मात्र सुगंध ठेवून जात आहेत. हे कोणालाच कसे कळत नाही, याचे आश्चर्य वाटले.

हाताला बोटे नाहीत. त्यामुळे मतदानाचे हक्क नाहीत. प्रवास करणे नाही. अस्पृश्य म्हणून हिणवल्याने माणसात मिसळणे नाही. रक्तदान, देहदान करता येत नाही. असे सर्व हक्क समाजाने आणि नियतीनेही त्यांच्याकडून काढून घेतले आहेत, त्यामुळे आनंदवन हेच आता त्यांना घर आहे, खरा आनंद तेथेच त्यांना मिळत आहे.

पाहता पाहता दुपार कधी होवून गेली कळलेच नाही, आणि एकदम निघण्याची वेळ झाली. सर्व आवराआवर झाली. निरोप घेतला, आणि जड अंतःकरणाने अंतर्मुख होऊन पूढे निघालो. विषय काही डोक्यातून जात नव्हता. जिथे पडीक जमिनीवर हा स्वर्ग केवळ कर्तृत्वावर उभारला गेला, तिथे बाबांचे "Our work is poem in action !" हे शब्दही अपुरेच वाटले.

***अथक निरंतर परिश्रमाने या भूमीचा स्वर्ग करू :-***

दिनांक ६ ला रात्री ८.३० वा सोमनाथ प्रकल्पावर पोहोचलो. तेथे श्री. व सौ बढे हे काम पाहतात. आनंदवनापासून दीड-दोन तासांच्या अंतरावर हे कार्यस्थळ आहे. श्री. बढे स्वतः आनंदवनातून उपचार घेऊन आले, आणि येथे काम पाहू लागले. आनंदवनातून पूर्ण बरे झालेले रूग्ण येथे येतात, आणि कष्ट करून सुखाने नांदतात. आनंदवनाच्या तुलनेत याचा विस्तार प्रचंड आहे. कुष्ठरोग्यांसाठी निवास-स्थान, करमणुकीची साधने इ. वगळता इथे पूर्णपणे शेती हाच प्रधान प्रकल्प आहे. १३०० एकर इतका येथील शेतीचा प्रचंड विस्तार आहे. सर्व प्रकारची पिके येथे काढली जातात. फळाफुलांवर जास्त भर दिला जातो. प्रत्येक पिकाचे येथे भरघोस उत्पन्न निघते. स्वतः सोमनाथमधील कुष्ठरोगी, आनंदवन येथील कुष्ठरोगी, आणि हेमलकसा येथे, येथूनच धान्य, फळांचा पुरेसा पुरवठा होतो शिवाय ट्रक भरून मोगरा, तेवढीच फळं, काही क्विंटल वांगी, बटाटे निर्यात करण्याची क्षमता या प्रकल्पात आहे.

फक्त चार फुटाखाली मुरूम असूनदेखील जिद्द, कष्ट, व सुयोग्य मार्गदर्शन, मनुष्यबळाचा यथायोग्य वापर व अथक परिश्रम या सर्वांच्या समागमाने हे ओसाड रान हिरवे झाले. धरतीवरचा स्वर्ग आणखी दुसरा कुठला असणार?

***अंधारात चाचपडणाऱ्यांकरिता प्रकाशाचा SEARCH***

दिनांक ७ तारखेला संध्याकाळी ४.३० वा शोधग्राम (सर्च)ला पोहोचलो. सामान टाकून वेळ न दवडताच पाहणीसाठी बाहेर पडलो. डॉ. अभय बंग, डॉ. सौ राणी बंग आणि त्यांचे सहकारी तेथील काम पाहतात. तेथील काम हे थोडेसे भिन्न स्वरूपाचे आहे. या कामाची सुरुवात त्यांनी १९८७ मध्ये केली.

तेथील गाव हे अजूनही वनवासींचे गाव असे मानले जाते. तेथील लोक हे अतिशय दुर्लक्षित आणि मागास आहेत. अशिक्षितपणा, अंधःश्रध्दा, व्यसनाधिनता, गैरसमजुती, शहरी शिक्षित विचारांचा, जीवनाचा अभाव यामुळे अतिशय निकृष्ट दर्जाचे जीवन तेथील लोकांना जगावे लागते आहे. व्यसनापायी, दारूपायी पैशाची नासधूस, लैंगिक विषयातील गैरसमजुती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या ह्या डॉ. अभय बंगांना पाहवल्या नाहीत. यासंबंधी काहीतरी करायचे असे त्यांनी मनाशी निश्चत केले आणि तळमळीने बुध्दिमत्तेच्या जोरावर या प्रश्नांसाठी पूर्णपणे झोकून देऊन या दांपत्याने 'SEARCH' नावाची एक संस्था उभारली. या नावाच्या विस्तृत रूपातचं याच्या स्थापनेमागचा उद्देश कळतो Society for Education, Action & Research in Community Health.

सर्व प्रकारचे शिक्षण, दैनंदिन जीवनातल्या उपयुक्त गोष्टी आणि आरोग्य अशा विविध अंगातून SEARCH चे काम उभे राहिले आहे. त्याआधी डॉ. बंग यांनी कामासाठी उपयुक्त अशी माणसे तयार केली. त्या माणसांनाही सर्व प्रकारचे शिक्षण प्रत्यक्ष अनुभवांसह दिले. त्यानंतर आरोग्यदूत आणि दायी प्रशिक्षित झाल्या, गावातल्या सर्व वस्त्यांमध्ये ते सर्वजण विखुरले आणि खऱ्या अर्थाने लोकशिक्षण सुरू झाले. चांगल्या सवयी कशा लावाव्यात, कुठल्या गोष्टी चुकीच्या आहेत, हानिकारक आहेत, कुठल्या गोष्टी वायफळ घालवू नयेत तसेच अंधःश्रध्दा निर्मूलन हे हळूहळू सुरू झाले व कामाला निश्चित स्वरूप येवू लागले.

हळूहळू दवाखाने बांधले गेले. बाह्यरूग्णकक्ष (OPD) कुटुंबनियोजन केन्द्रे, सल्ला केन्द्रे सुरू झाली आणि कामला योग्य तो आकार प्राप्त झाला.

गावातल्या लोकांच्या सवयीमुळे दगडाविटांच्या खोल्यांत ते राहू शकत नाही आणि त्यामुळेच स्थानिक लोकांना परकेपणा वाटू नये म्हणून त्यांनी स्थानिक लोकांसारखेच बांबू काडया ताडपत्र्यांची घरे बांधलेली आहेत. सध्या तिथे दंतेश्वरी नावाचे एक आरोग्य केद्र आहे. मुक्तीपथ नावाचे रूग्णालय आहे. तेथे २५/३० रूग्णांची व्यवस्था ठेवली जाते. एकूण ५ डॉक्टर तेथे कार्यरत आहेत.

या व्यतिरिक्त जीवनशिक्षण, व्यक्तिमत्वविकास आणि व्यसनमुक्ती इ. अनेक विषयांवर शिबिरे घेतली जातात. प्रत्येक शिबिराचा कालावधी ७ दिवसांचा असतो. त्यात १५ ते २५ वयोगटातील मुलं, मुली सहभागी असतात. मुलांना बोलकं करणं, त्यांच्या अडचणी समजावून घेऊन योग्य ते मार्गदर्शन करणे हे शिबिरातून साध्य केले लाते. लैंगिक शिक्षण, नैतिक मूल्ये यांवर भर दिला जातो. पर्यावरण, भ्रष्टाचार, प्रसारमाध्यमे, स्वच्छता इ. अनेक विषयही शिबिरासाठी निवडले जातात.

सौ. विजया गडकरी यांनी आरोग्य शिक्षणाविषयी बरीच माहीती दिली. ३७ गावात आरोग्यदायिनी व आरोग्यदूत यांचे काम चालते. स्वच्छतेसंबंधी मनात आवड निर्माण करणे, आरोग्यदायक गोष्टी कोणत्या हे सांगणे अशा स्वरूपात ५६ आरोग्यदूत व ४० दायिनी कार्यरत आहेत.

**भग्न स्वप्नांच्या तुकड्यांना कवटाळून बसण्यासाठी मनुष्य जन्माला आलेला नाही.**

श्री. तुषार गडकरी यांनी व्यसनमुक्ती उपक्रमाविषयी सर्व माहीती दिली. व्यसनमुक्त होण्यासाठी कुठल्याही प्रकारची सक्ती न करता त्यांची मानसिकता तशी बनविली जाते. slide show, pictures, व कीर्तन प्रवचन, पथनाट्ये इ. च्या सहाय्याने त्यांच्यात जागृती निर्माण केली जाते. १५ दिवसांचे व्यसनमुक्ती शिबिर दरमहा घेतले जाते. ६०% पर्यंत यश अशा शिबिरांमुळे मिळते असा त्यांचा अनुभव आहे.

अशा प्रकारे अनेकविध उपक्रमांनी व कार्यक्रमांनी तेथे जनजागृती होत आहे आणि अंधारात चाचपडणाऱ्या प्रकाशाचा search घेणाऱ्या गडचिरोलीतल्या त्या खेड्यांना search खरोखरीच एक मोठा आधार बनत आहे.

**वनवासी (आणि वन्यप्राणीही) यांचा आपुलकीचा आधार लोकबिरादरी प्रकल्प :**

दिनांक ९ मे ला संध्याकाळी ५ च्या सुमारास लोकबिरादरी प्रकल्पावर जाऊन धडकलो. तेथे श्री बाबा आमटेंचे कनिष्ठ सुपूत्र श्री प्रकाश आमटे व पत्नी सौ. मंदा आमटे हे दोघे काम बघतात डॉ.प्रकाश व मंदा आमटे हे त्या दिवशी तेथे नसल्याने त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधता आला नाही. श्री. विलास मनोहर हेही तितक्याच जोमाने त्यांच्यात सहभागी आहेत. त्यांनीच आम्हांला या प्रकल्पाची माहिती सांगितली डॉ.प्रकाश स्वतः वैद्यकीय माध्यमातून वनवासींच्या जवळ आले. त्यांच्या अनेक अडचणी त्यांनी जाणून घेतल्या. व पत्नींसह मोफत औषधोपचार सुरू केले. पाहिली ते दहावी पर्यंतची एक शाळा काढली. मोफत सल्ला केन्द्रे सुरू केली. सौ मंदा आमटेंनी स्त्रियांसाठी विविध प्रकल्प आणि एक मार्गदर्शन केन्द्रही सुरू केले.

आता काम मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. स्थानिक मुलांच्या शिक्षण घेण्याच्या प्रमाणात वाढ होत आहे. दोन विद्यार्थी तर आता वैद्यकीय शिक्षणही घेत आहेत. गावकऱ्यांचा औषधावर विश्वास बसू लागला आहे. हानिकारक प्रथा कमी होत आहेत. स्त्रियांचे शिक्षणही होत आहे. आणि एकूणच वस्ती चांगल्या अर्थाने सुशिक्षित बनत आहे. प्रकाश आमटेंच्या या सेवा कार्याव्यतिरिक्त त्यांच्या प्राणीप्रेमावरही प्रकाश पडला. आई-वडील मरण पावल्यानंतर त्यांची शिकार केल्यानंतर त्यांची पिल्ले वनवासी लोक आमटयांना आणून देऊ लागले आणि त्यातून स्वतःच्या हाताने त्यांना लहानाचे मोठे करून अतिशय प्रेमाने वागविले. आपल्या मायेने बिबट्या, सिंह अस्वल इ. प्राण्यांच्या हिंस्त्रपणास काबूत आणले, त्यांच्या क्रूरपणावर मात केली अशा अनेक हिंस्त्र प्राण्यांबरोबरच त्याहून अवघड अशा माणसांनाही ते मोठ्या मायेने हाताळतात

चार दिवस कसे संपले हे समजलेच नाही कष्ट करण्याची, प्रतिकूल परीस्थितीशी झुंजण्याची क्षमता, मनातील तळमळ आणि जिद्द यापलिकडेही जाऊन 'Don't work for them, work with them", "Confidence must rest in your wrist" अशा वाक्यांनी आणि तशीच कृती पाहून विचारात नक्कीच मोलाची भर पडली. काम करण्याची प्रेरणा अधिक तीव्र झाली.

# एक सुखद अनुभव : शाखा चिमुरड्यांची

**पुष्पाताई नडे**

ती आली आणि तिनं पाहिल, अणि अवाकच झाली. ही आपल्याच शाखेची मुलं ना ! मग इतकी बेशिस्त ? क्षणभर तिला सुचेना. नुकतीच ती सरांच्या घरून आली होती. डोक्यात वेगळेच विचार होते. त्यात येताना तिची गाडी बिघडली. रिक्षातून कशीतरी शांखेच्या वेळात तिनं वास्तू गाठली होती. पाहते तर तो काही मुलं चप्पल स्टॅंडच्या मागे आडवी लपलेली. तर काही बालवाडीच्या साहित्यावर खेळत होती. तिथे फारच गर्दी दिसत होती. तर काही वर्धिनीच्या गाडीजवळ खेळत होती. म्हणजे खेळत नसून एकमेकांच्या खोड्याच काढत होती. हे दृश्य पाहत असताना मध्ये उभे असलेल्या मनिषाचा आवाज तिच्या कानावर आला. त्या बरोबर तिने मनिषाकडे पाहिले. मनिषा मुलांवर ओरडत होती. "पहा बरे आता तुम्ही ऐकले नाही तर मी पुष्पाताईंना सांगेन"

त्याबरोबर तिला म्हणजेच मला आपल्या नावाची, अस्तित्त्वाची जाणीव झाली आणि मी मनिषाला हाक मारून विचारले, 'हे काय चालले आहे ?' इतक्या वेळ आपल्याच मस्तीत मशगूल असलेली मुलं एकदम माझा आवाज ऐकून आहे त्या जागेत स्तब्ध उभी राहिली. पाच मिनिटे हे दृश्य पाहिल्यावर मी मनिषाजवळ गेले आणि विचारपूस केली. 'शाखेत हे काय चालले आहे?' तर मनिषानं अगदी रडकुंडीला येऊन मुलं कशी ऐकत नाहीत, कसा त्रास देतात हे सांगितले. रोंघे आजी आणि ती दोघीही अगदी थकून गेल्यासारख्या वाटत होत्या. हे पाहून मी मनाशी विचार करून एक पुसटसा, तात्पुरता म्हणून, निर्णय घेतला.

मनिषाला जवळ बोलावून सांगितलं " ठीक आहे. मुलं ऐकत नाही ना? आपण आजपासून शाखा बंद करू या. चला, तुम्हीपण आपापल्या घरी चला. मी पण माझ्या घरी जाते. त्यांना नुसती शाखेत मस्ती करण्यासाठीच यायचं असेल तर ते आपल्याला चालणार नाही." असं म्हणून मी सहज एक कटाक्ष मुलांकडे टाकला. तर सर्व मुलं पूर्वीच्या अवस्थेत होती पण माना खाली घालून उभी होती. कुठून तरी कोपऱ्यातून हळूहळू रडण्याचे आवाज सुरू झाले. तरीही मी आपला सूर सोडला नाही. आणि मनिषा व रोंघे आजींना म्हणाले 'चला चला आपण जाऊ या,' असे म्हणून मुलांकडे पाठ करून ड्युटीवरचे रक्षक बापू यांना सांगितलं "बापू या सर्व मुलांना घरी पाठवून द्या. त्यांच्या पालकांना सांगा की उद्यापासून शाखा बंद केली आहे".

त्याबरोबर मनिषा माझ्याजवळ आली. मनिषानं मला म्हंटलं "काय हो पुष्पाताई !" मी सहज मनिषाकडे पाहिले तर मनिषाच्या डोळयांतून छान पाणी वाहात होते. मी मनिषाला म्हणाले "अग वेडी आहेस का? बालशाखा म्हणजे माझा प्राण आहे. तू आणि रोंघे आजी माझ्या रूमवर जाऊन बसा मग मी सांगते." हे एवढं होईपर्यंत मुलं अजूनही त्याच अवस्थेत होती. मी सर्वांना जवळ बोलावलं आणि विचारले "बोला तुम्हांला काय वाटतं शाखा चालू ठेवायची का बंद करायची? चालू ठेवायची असेल तर शाखेचे नियम पाळायला हवेत. नाहीतर शाखा बंद करूयात" तर आणखीनच मोठा रडण्याचा आवाज होऊ लागला. मी विचारले "तुम्हीच सांगा काय करायचे

**संयम म्हणजे आपले स्वातंत्र्य गमावणे नव्हे तर दुसऱ्याच्या स्वातंत्र्याला अवसर देणे होय.**

ते." तर मुलं म्हणाली "आम्ही आता मस्ती करणार नाही पण शाखा बंद करू नका." यावर मी म्हणाले "ठीक आहे पण शिक्षा म्हणून तरी आज तुमची शाखा कोणीच घेणार नाही. तुम्हीच तुमचा प्रमुख निवडा. आणि नियमाप्रमाणे शाखा घ्या. मग आपण ठरवू या काय करायचे ते." त्याबरोबर सर्व मुलांनी मिळून इ. ४ थीतली स्नेहल बानखिळे नावाच्या नाजूकशी पण हुशार व चुणचुणीत मुलीला प्रमुख म्हणून निवडले. काही मिनीटांपूर्वी गोंगाट, गोंधळ करणारी मुलं स्वयंशिस्त दाखवू लागलीत.

स्नेहलनं ताबडतोब २ गट पाडून त्या गटांबरोबर खेळाचे प्रमुख निवडले. खेळ सुरू केले. त्यातही गंमत झाली. इ. ३रीतला भास्कर यद्रे नावाचा मुलगा हा एका गटाचा खेळ घेत होता. आणि खेळ घेण्यापूर्वी स्नेहलनं त्याच्यावर आणखी जबाबदारी टाकली होती. ती म्हणजे वेळेकडे लक्ष ठेवण्याची. आणि म्हणून तो दर ५-७ मिनिटाला खेळ सोडून घड्याळ पाहत होता. ६:५० झाले आणि त्यानं स्नेहलला जाऊन सांगितले की प्रार्थनेची वेळ झाली आहे. स्नेहलनं सर्वांना सावधानची आज्ञा देऊन मुलांना प्रार्थनेला जमायला सांगितले. त्याप्रमाणे स्वच्छ हातपाय धुऊन मुलं सभागृहात प्रार्थनेसाठी इयत्तेप्रमाणे उभी राहिली. शाखा भरवण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर प्रार्थना सुरू झाली. त्याबरोबर बापूंकरवी मनिषा व रोंघे आजींना बोलावून घेतले. त्यावेळी त्यांना सांगितलं, "आपण फक्त मागे उभं राहायचं. त्याप्रमाणे तिघीजणी मुलांच्या मागे हात जोडून प्रार्थनेकरिता उभ्या राहिल्या. मुलांनी प्रार्थना खूपच सुंदर आणि एका सुरात शांतपणे म्हटली. त्यानंतरचा ओंकारही खूपच सुरेख आवाजात झाला. ओंकार झाल्यानंतर मुलांना वाटलं मनिषाताई किंवा मी काही सूचना देऊ पण मी म्हणाले, "आम्ही आत्ता शाखेत नाही हे लक्षात घ्या" त्याबरोबर स्नेहलनं मुलांना पुढील आज्ञा देऊन इयत्तेप्रमाणे आपापल्या वर्गात जायला सांगितलं आणि त्यापूर्वी कोणत्या इयत्तेचा कोण गटप्रमुख असेल हे सांगितले, तसेच मुलांना वर्गावर जाण्यास सांगून मौनाभ्यास आज होईल असेही सांगितले.

मुले उठून दुसऱ्या मजल्यावरील आपापल्या वर्गात गेली. आम्ही तिघीजणी वर्गाच्या बाहेर व्हरांड्यात उभ्या राहिलो. ७.५० वा. स्नेहल करवी मी सर्व मुलांना एकत्रित जमण्यास सांगितले व ८.३० पर्यंत शाखा म्हणजे नेमकं काय? आपण शाखेत का येतो? अशा प्रकारे शाखेचं महत्त्व पुढे अर्धा तास सांगितले.

त्यानंतर मात्र मुलांनी शाखेवर त्रास दिला नाही अशा प्रकारे एक सुंदर, सुखद अनुभव वीर अभिमन्यु शाखेत आला. जबाबदारी पडल्यानंतर एवढी छोटी-छोटी मुले सुध्दा किती काळजी घेतात याचे हे एक उदाहरणचं म्हणावे लागेल !

## ऐसी कळवळ्याची जाती...

आजोळच्या शिबिरातील मुलं-मुली पर्वतीवरचं वस्तुसंग्रहालय पाहाण्यासाठी गेली होती. पर्वती चढताना सुरवातीच्या पाचव्या सहाव्या पायरीच्या दरम्यान एक विद्यार्थीनी पाय अडखळून पडली. कपाळावर ज़खम झाली. तिला चटकन उचलून पायथ्याशीच असलेल्या एका डॉक्टरांकडे नेण्यात आलं. डॉक्टरांनी त्वरित उपचार केले. वर्धिनीच्या कामासंबंधी चौकशी केली. निघताना बिल विचारल्यावर डॉक्टर म्हणाले, " वर्धिनीचं एवढं मोठं काम चालू आहे. माझा थोडा तरी वाटा त्यात असू दे ! वर्धिनीच्या उपयोगी पडण्याची संधी लाभली हाच माझा मोठा लाभ आहे ".

# शिवारातलं सोनं

✍ कु. वैभवी पवार

मुळशी तालुक्यातल्या कोळवणच्या शाळेत त्यादिवशी मी मानवी हृदय व मेंदू हा भाग इ. ९वी च्या विद्यार्थ्यांना शिकवत होते. दोन्हींच्याही प्रतिकृति दाखवून, रचना, कार्य समजावून सांगत होते. विद्यार्थी मोठ्या उत्सुकतेनं आपला मेंदू कसा असतो? त्याचं कार्य कसं चालतं हे समजावून घेत होते. वर्ग पूर्ण शांत होता. एकाग्रतेनं ऐकत होता. पूर्ण शिकवून झाल्यावर काही शंका असल्यास विचारा असं म्हटलं.पटकन एक विद्यार्थी उभा राहिला आणि त्यानं विचारलं, "ताई, आपल्या मेंदूला इतक्या वळया असतात पण त्या वळयांचं मूळ कुठं असतं?" प्रश्न मला समजला. पण खूपच मार्मिक, कुतुहलाचा प्रश्न वाटल्यानं व तो इतर विद्यार्थ्यांनांही, व्यवस्थित कळावा असं वाटल्यानं मी पुन्हा त्याला विचारलं, "म्हणजे नेमकं तुला काय म्हणायचंय् ! जरा सविस्तर सांग म्हणजे कळेल". मुलगा भारी चुणचुणीत. लगेच म्हणाला, "म्हंजे बगा, माझी मावशी शिटर इनत हुती तवा त्येचं मूळ माज्या आईनं घालून दिलंत्. आन् मग त्यो शिटर मावशीनं इनला. तर मेंदूच्या वळया म्हंजे इनल्याला शिटर समजला तर त्येचं मूळ कुटं असतं?" प्रश्न सगळयांना समजला होता. त्याच्या प्रश्नातली जिज्ञासा ज्यांच्या लक्षात आली नव्हती ती मुलं त्याच्या उदाहरणाला आणि प्रश्न विचारण्याच्या पध्दतीला फिदी-फिदी आपसातचं हसत होती. मला मात्र खूपखूप कौतुक वाटलं त्या मुलाचं ! सर्वांना आधी शांत करून त्याचं आणि त्याच्या प्रश्नाचं कौतुक केलं. आणि मग त्याच्या प्रश्नाचं समर्पक उत्तर दिलं. हे उत्तर देत असताना विचारलं तुम्हालां आक्रोड माहीत आहे का?" तर उत्तर, मिळालं नाही. तिथं आक्रोड कुणालाही माहीत नव्हता. त्यावेळी फळयावर आक्रोडचं साधारण चित्र काढून त्यांच्या शंकेच निरसन केलं. आणि नंतर पुन्हा पुढच्या वेळी जाताना आक्रोड घेऊन गेले. त्यांना आक्रोड दाखवला. आणि त्याच्या सहाय्यानं पुन्हा मेंदूही समजावून सांगितला. विद्यार्थ्यांचंही समाधान झालं. एकाबरोबर दोन गोष्टी कळाल्याचं !

पण त्यांच्या या जिज्ञासेनं, चिकित्सकतेनं मी मात्र अवाक् झाले आणि आनंदीही ज्या विद्यार्थ्यांना अक्रोड माहीत नाही. कधी भूगोलात ऐकलेला, तेवढाच तो कानावरून गेलेला. त्यांच्या विचारांच्या वेगाचं आणि जिज्ञासेचं राहून राहून कौतुक वाटलं !

असाच एक अनुभव विज्ञान शिबिरातला. डॉ. देवरे हे तज्ज्ञ पशुवैद्य. ते प्राण्यांची माहिती सांगत होते. त्यात कुत्र्याची माहिती सांगताना 'कुत्र्याला वासाचं ज्ञान खूप चांगलं असतं, पण त्याची दृष्टी कमकुवत असते. २०-२५ फुटापेक्षा जास्त अंतरावरच त्याला स्पष्ट दिसू शकत नाही' असा उल्लेख होता. व्याख्यान संपल्यावर कोणास काही शंका असलयास विचारावी असे सांगायचा अवकाश. एकापेक्षा एक सरस शंकांचा डॉक्टरांवर अक्षरक्षः वर्षावच झाला. ह्यातली एक शंका मोठी मजेशीर होतीच. पण त्याहून थोडी अधिक सृजनशीलता प्रकट करणारीही जाणवली. विद्यार्थ्याची शंका होती. "कुत्र्याची नजर कमकुवत असते तर त्याच्या घाणेंद्रियाप्रमाणेच त्याच्या नजरेचाही चांगला उपयोग होण्यासाठी त्याला चष्मा किंवा लेन्स् वापरू देऊ शकू का?" या प्रश्नानं मुलांमध्ये मोठा हशा झाला. पण आम्ही सगळे आणि ते डॉक्टर स्वतःही फारच खूश झाले. काय कल्पना असतात या मुलांच्या ! कसा विचार करतात ते !

**माणसाचं छोटं दुःख जगाच्या मोठ्या दुःखात मिसळून गेलं, की त्याला सुखाची चव येते.**

जेवढ्या उत्सुकतेनं त्यानं हा प्रश्न विचारला तेवढ्याच उत्साहानं डॉक्टरांनी उत्तरही सविस्तर दिलं.

आणखी एक मजेशीर आणि तितकाच तल्लख अनुभव. 'उष्णतेमुळे पदार्थाचे प्रसरण होते' असा विषय होता. विविध उदाहरणांनी बागेश्रीताई तो समजावून सांगत होत्या. घनपदार्थाला उष्णता दिली असता तो द्रवरूपात रूपांतरित होतो, द्रवपदार्थाला उष्णता दिली असता तो वायुरूपात रूपांतरित होतो असे सांगताना तिने यापेक्षा काही वेगळे निरीक्षण कोणी केले आहे का? असे विचारताच एक मुलगा मध्येच उभा राहिला आणि त्यानं विचारलं, "उष्णतेनं द्रव बायुरूपात रूपांतर होतं तर मग आम्लेट करताना गरम तव्यावर अंड फोडून पसरून ओतलं तरी ते घट व्हतंय, हे कसं काय ?" आता आहे का? तव्यावरचं आम्लेट ताटात कधी पडतंय आणि मी त्यावर कधी ताव मारतोय असं वाटायचं याचं वय ! ते सोडून याला अशी शंका यावी ! त्याच्या त्या चिकित्सकपणाचं मात्र कौतुक वाटलं आणि **'Protine Co-agulation'** माझ्या मनात कायमचं अधोरेखित करून ठेवलं गेलं.

एकदा संदर्भ आला म्हणून पेशी, उती अशी माहिती सांगता सांगता, मग उती संवर्धन (**Tissue Culture**) म्हणजे काय? वनस्पतींच्या विविध नवीन जाती या पध्दतीने कशा निर्माण केल्या जातात अशी माहिती, नवीन तंत्रज्ञानाची ओळख म्हणून सांगत होते. विषय पुढे अगदी अलिकडच्या 'क्लोनिंग' पर्यंत आला. इ.९वी चे विद्यार्थी समोर होते. त्यांना समजेलसं, साध्या सोप्या पध्दतीनं सांगण्याचा मी प्रयत्न करत होते. तरीही मनात मला अशी शंका वाटत होती की हा विषय या मुलांना कितपत समजेल कोण जाणे. तेवढ्यात माझ्या शंकेचं निरसन एका मुलानं झटकन केलं. तो म्हणाला, "ताई, क्लोनिंगमध्ये कोणत्याही प्राण्याचं प्रतिरूप निर्माण करता येतं. म्हंजे कोणता बी प्राणी हाए तसाच दुसरा प्राणी तयार करता येतो, आसंच ना? 'मी म्हंटल हो' यावर तो चटकन् म्हणतो 'तर मग जुळया मुलामंदी, शेळयामंदी एका येळेला दोन-तीन पिल्लं हुत्यात तर ती पिल्लं म्हंजे मग या क्लोनिंगचाच प्रकार का?' (इथ 'क्लोनिंग' हा शब्द त्यानं प्रयत्नपूर्वक का असेना पण जसाच्या तसा दोनदा उच्चारला हेही माझ्यासाठी काही कमी नव्हतं !) त्याच्या या प्रश्नानं मलाही त्याला कसं समजावयाचं असा प्रश्न पडला. आणि मग "जुळया-तिळयातल्या पिलांमधले साम्य हे क्लोनिंगच्याच तत्त्वावर आधारलेलं आहे. फक्त ते नैसर्गिकपणे होतं म्हणून मग आपण त्याला "नैसर्गिक क्लोनिंग" म्हणू असं मी त्याला सांगितलं. हे सांगताना मी मारे त्याची इयत्ता लक्षात घेऊन अगदी गंमतीदार वाटेल अशा टाईपात समजावून सांगत होते. तर तो म्हणतो कसा की "नैसर्गिकपणे प्रतिरूप तयार होत आसलं तर त्येला 'क्लोनिंग' हे नाव कसं देता इल?" मी चपापलेच. काय ही केवढी मोठी जिज्ञासा ! तीही अशा ग्रामीण विद्यार्थ्याची ! किती रास्त शंका होती त्यांची. त्याच्या शंकेचं निरसन केलं.

या सगळयावरून एक मात्र नक्की जाणवतंय की ज्या उद्देशानं, आणि ज्या गोष्टी गृहीत धरून आपण हा उपक्रम सुरू केलाय. तो खरचं खूप रास्त आहे. ग्रामीण भागातही अशा प्रकारचं 'सोनं' दडलेलं आहे. त्यांच्या विचारांना, जिज्ञासेला वाव देणं, अधिक गती देणं हे या निमित्तानं होतंय आणि त्याला या विद्यार्थी - शिक्षकांकडूनही खूप चांगला प्रतिसाद मिळतोय याचं समाधान वाटतं.

शाळेच्या आवारात प्रयोगशाळेची गाडी गेली की खिडकीतून डोकावणाऱ्या त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंदच प्रयोगशाळेच्या सहर्ष स्वागताची, या उपक्रमाला ज्या मुक्कामावर जाऊन पोचायचं आहे ते ठिकाण जवळ जवळ येतंय याची जणू पावतीच मिळते !

✱ ✱ ✱

# अरूणाचलच्या दैनंदिनीतील चार पाने

**'स्व'रूपवर्धिनीच्या कार्यकर्त्या वैद्य कु. मनिषा बोईन या अरूणाचलमध्ये वनवासी कल्याण आश्रमाच्या आरोग्यकेंद्रावर काम करीत होत्या. अंतर्मुख करणारे त्यांचे अनुभव त्यांच्याच शब्दात देत आहोत.**

**दोन सव्वादोन वर्षांनंतर मी आता पुण्यात आली आहे. अरूणाचलचा विषय निघाला की अनेक घटना डोळ्यासमोर चित्रपटासारख्या सरकत जातात. त्यातील काही अंतर्मुख करणाऱ्या घटना त्यावेळच्या दैनंदिनीमध्ये उतरल्या आहेत. त्याच दैनंदिनीची काही पानं आपल्यापुढे ठेवत आहे.**

✡ दि. १५ ऑगस्ट ९५. आज आमचा दिवस सकाळी चार वाजल्यापासूनच सुरू झाला होता. कल्याण आश्रमाच्या कार्यालयामध्ये सकाळी सात वाजता ध्वजवंदनाचा कार्यक्रम ठेवला होता. कोण व किती जण येणार अशी मनात जरा शंकाच होती. पण ठीक सात वाजता तेथील स्थानिक कार्यकर्ते उपस्थित. एकटेच नाही तर सहपरिवार.

हळूहळू दिवसभरातल्या वातावरणातून, प्रथमच 'राष्ट्रीय सण' इथे साजरा होतोय, असं जाणवत गेले. बाजारात सर्व दुकानांसमोर साफसफाई करून ध्वजारोपण केलेलं होतं. काही उत्साही व्यापाऱ्यांनी ध्वजाभोवती रांगोळी, रंग, फुले वापरून सजावट केली होती. ज्युबिली ग्राउंडवर (Jubilee Ground ) वर मोठा जाहीर कार्यक्रम झाला. दिवसभर सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ, संचलन असं सर्व सुरू होते.

संध्याकाळी आम्ही सहजच बाजारात जाण्यासाठी बाहेर पडलो. संपूर्ण बाजार दिव्यांच्या प्रकाशाने उजळला होता. प्रत्येक दुकानापुढे रोषणाई केलेली होती. वातावरण अत्यंत प्रसन्न आणि सुंदर वाटत होते.

पुण्यासारख्या मोठी परंपरा लाभलेल्या शहरामध्ये राहूनदेखील आज प्रथमच, आणि तेही अरूणाचलमध्ये, 'राष्ट्रीय सण' अनुभवला होता.

✡ दि. २७ ऑक्टोबर ९५

आज लोयलियांग (Loiliang) मध्ये गेलो होतो. गावांतील एका घरात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी चर्च सुरू केलंय असं कानावर आलं. आणि ते चर्च शोधायला म्हणून गेलो होतो. खरंतरं वेडेपणाच. चर्च किंवा चर्च पाहून आम्ही काय करणार होतो? कशासाठी गेलो होतो याचं उत्तर देता येणार नाही. पण गेलो होतो. वैद्यकीय शिबिराची (Medical camps)ची सुरूवात (Loiliong) लोयलियांग मध्येच झाली होती. तेथील काही महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी चांगला परिचय होता. याच गावामध्ये मागच्याच वर्षी विद्यार्थी व गावातील लोक यांनी एकत्र येऊन तेथे सुरू झालेल्या धर्मांतराला संघटित विरोध केला होता.

मागच्या वर्षी या गावात ख्रिश्चन मिशनरी येऊ लागले. गावातील ३-४ घरातील माणसांचे त्यांनी धर्मपरिवर्तनही केले होते. काहीवेळा ख्रिश्चन धर्माची महती पटवून देऊन तर काहीवेळा इंपोर्टेड टॉर्च, ब्लँकेटस् देऊनही.

**त्याग ही संस्कृतीनं मानवाला दिलेली सर्वात मोठी देणगी आहे.**

ख्रिश्चन झाल्यावर हळूहळू घराचं स्वरूपही बदलू लागलं. मिश्मी देवतेला सैतान म्हंटलं जाऊ लागलं. मिश्मी पूजेचं साहित्य घराबाहेर फेकलं जाऊ लागलं. आणि ही चार-पाच घरातील माणसं गावातील अन्य माणसांना मिश्मी-पूजा, देवता, नियम हे सर्व कसं फालतू आहे असं सांगू लागले.

काही दिवसांनी तेथील एका महिलेच्या लक्षात आलं की आपलं काहीतरी आपण गमावतोय ! तिने विरोध केला. हा विरोध हळूहळू संघटित झाला. त्यात गावातील महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले. आणि सर्वांनी मिळून गावांतील फादरला गावाबाहेर घालवले.

काही दिवसांतच सर्व काही निवळलं. प्रतिक्रिया (Reaction) म्हणून निर्माण झालेलं गावातील संघटनही सुस्त झालं. आणि ख्रिश्चन मिशनरी पुन्हा नव्या जोमाने कामाला लागले. फक्त उघडपणे धर्मांतर न होता ते गुप्तपणे होऊ लागलंय. त्यातूनच आता चर्च वेगळं न बांधता गावातील एक घरच चर्च केलय.

लोयलियांगहून येताना पोमलियांग नावाच्या गावात गेलो. श्री. कृलेसो नादुंग, कल्याण आश्रमाचा कार्यकर्ता, पोमलियांग मधील शाळेत शिक्षक आहे. त्याला भेटायला गेलो. गप्पा सुरू झाल्या. तो सहज म्हणाला "आप गायका मांस नही खाते। इसलिए आप हिंदू है । मुसलमान सुअर का मांस नही खाते । हम तो गाय और सुअर दोनोंका मांस खाते है । शायद हम ख्रिश्चन होंगे !" तो आणि त्याच्यासारखे अनेक - सर्वांच्याच मनात गाईचं मांस न खाणे, अस्पृश्यता, जात पात मानणे, बरेच उपास तापास करणे म्हणजे हिंदू असणे असं आहे. याचं कारण अपप्रचाराबरोबरच तिथे असणाऱ्या हिंदूंचा व्यवहार हेही असावं असं वाटतंय.

✡ दि.२६ जानेवारी, १९९६

आज २६ जानेवारी, पण वातावरण मात्र कर्फ्युसारखं आहे. वातावरणात प्रचंड ताण आहे. अरूणाचल बंद पुकारलाय. हा बंद चकमा प्रश्नासाठी आहे. केन्द्र सरकारच्या निर्णय क्षमतेच्या विरोधात हा बंद आहे. तीस वर्षांपूर्वी केन्द्र सरकारने दहा वर्षांकरीता चकमांना अरूणाचलमध्ये आणून ठेवलंय. सध्या इथे तरी चकमा स्वतंत्र अस्तित्व जपून आहेत. अरूणाचलामधील लामा, नेपाळी लोकांसारखे ते येथील लोकांशी समरस झालेले नाहीत.

गेल्या काही दिवसात याच प्रश्नासाठी दोनदा अरूणाचल बंद होता. पण राष्ट्रीय उत्सवासाठी बंद पुकारण्याची ही पहिलीच वेळ. आतापर्यंतचे बंद अहिंसात्मक होते. पण बावीस जानेवारीचा बंद तेजूमधे तरी हिंसात्मक ठरला. अगदी छोट्या छोट्या विद्यार्थ्यांनी सायकलस्वारांना सायकल चालवली म्हणून, तर काही छोट्या मुलांना खेळत होते म्हणून मारहाण केली. हे विद्यार्थी जमतेम, सातवीतले आज ध्वजवंदनासाठी कोणीही बाहेर पडायचं नाही हे सांगण्यासाठी अकरावीचे विद्यार्थी दोन-तीन दिवस शाळा सोडून फिरत होते. शाळांमध्ये वर्गावर्गातून बेधडकपणे जायचं आणि बंद पाळण्याचं आवाहन नाही तर आज्ञा करायची. तीही अकरावी बारावीतील एखाद्या विद्यार्थ्याने वर्गात शिकवत असणाऱ्या शिक्षकासमोर त्याचं शिकवणं मध्येच थांबवून.

जाहीर कार्यक्रम नाही. किमान ध्वजवदंन तरी होऊद्यात. अशी प्रशासनाची विद्यार्थ्यांपुढे केविलवाणी भूमिका.

सर्वसाधारण विद्यार्थ्यांमध्ये 'हम सेव्हन सिस्टर्स का अलग राष्ट्र बनाऐंगे।' अशी चर्चा. अरूणाचलमध्ये बरेच अधिकारी आसामी. 'हम तो १९८१ से ऐसेही करते आए है ।' अशी त्याची थंडावलेली प्रतिक्रिया. या सर्व पार्श्वभूमीवर आपण काहीच करू शकत नाही याचं दुःख असह्य होतयं!

✡ दि. १५ ऑगस्ट, १९९७

आज पूर्वांचलातील फक्त अरूणाचलमध्येच ५० वा स्वातंत्रदिन साजरा होतोय. उरलेल्या सहा

राज्यांमध्ये कालपासूनच कर्फ्यू आहे. आसाम, नागालँड, त्रिपूरा, मणिपूर, मिझोराम व मेघालय अशा सहाही राज्यांतील सर्व विद्यार्थी संघटना व अतिरेकी संघटना अशा सर्वांनी चोवीस तास बंदचं आवाहन केलं आहे. वर्तमानपत्रात त्यांनी असं जाहीरपणे म्हटलंय की 'पूर्वांचल हा भारताचा भाग केंव्हाच नव्हता. तसाच तो सध्याही नाही. उलट भारत सरकारने पूर्वांचलातील जनतेचं शोषण केलं आहे. याचा निषेध म्हणून १४ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट, २४ तासांचा बंद पाळण्यात यावा.

आज संपूर्ण देशभरामध्ये स्वातंत्र्यदिनाचा सुवर्णमहोत्सव उत्साहाने साजरा होत आहे. आणि त्याचवेळी पूर्वोत्तर राज्यांमध्ये कर्फ्यू पाळला जातोय.

२वर्षात अशा प्रकारच्या घटनांची सवय झालीय पण यावेळेस प्रकर्षाने जाणवणारा विरोधाभास सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने अधिकच गडद वाटतोय.

अरूणाचलमध्ये जाताना फक्त दूरच्या प्रदेशात जाऊन काम करण्याचं आकर्षण मनामधे होतं. तिथं गेल्यावर मात्र सामाजिक काम म्हणजे काय ? कशासाठी? कुणासाठी? का? असे अनेक मूलभूत प्रश्न स्वतःलाच जाणवू लागले. कामाचं स्वरूप, गती आणि काळ पाहता अगदी थोड्या प्रमाणात आणि तेही डॉक्टर असल्यामुळे लोकांना वैद्यकीय सेवेचा फायदा मिळाला. पण कित्येकदा असं वाटायचं की ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या कामाची प्रतिक्रिया म्हणून आम्ही काम करतो का? समजा काही अंशी असं असेल तर त्यांच्याकडे जो समर्पण भाव आहे, की ज्यामुळे मिशनरी हा शब्दच मूळ संस्थावाचक न राहता प्रवृत्तिवाचक झाला आहे. तो आपल्याकडे किती प्रमाणात आहे? की काही काळाने आपले अस्तित्व धोक्यात येईल या भीतीने आपण प्रतिबंधात्मक उपाय म्हणून काम करतोय? असे कितीतरी प्रश्न आणि प्रश्न पण, एकीकडे खात्री वाटतेय, की आपल्या कामातनचं-निःस्वार्थी कामातनंच हा प्रश्नांचा गुंता सुटणारंय. तेच त्याचं खरं उत्तर आहे.

---

### तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला...

वर्धिनीच्या एक कार्यकर्त्या एका सेवावस्तीत गेल्या होत्या. अचानक लागलेल्या आगीत त्या वस्तीतील बावीस घरे नष्ट झाली होती. सर्व कुटुंबे रस्त्यावर आली होती. हे दृश्य पाहिल्यावर आपल्या गळयातील सोन्याची चेन त्यांनी काढली. " ही चेन विकून येतील ते सर्व पैसे या लोकांची घरे बांधण्यासाठी खर्च करा " असे एका सामाजिक संस्थेच्या जबाबदार कार्यकर्त्याला सांगून त्या सहजपणे आपल्या कामाला लागल्या.

**देशातील दरीद्रनारायणांची व श्रमजीवी विष्णूंची पूजा करा**

# शब्देविणे संवादिजे

वैद्य कु. मनिषा बोईन

आलांगचे medical camps अगदी स्वप्नातल्यासारखे झालेत. सकाळी सहा वाजता घरातून निघायचे, चालत जायचे. नदी कोणत्या तरी बाजूने पार करायची, हँगिंग ब्रीज (hanging bridge) वरून आणि पहाड चढायला सुरूवात करायची. गावात वर पोहचल्यावर 'गावबुढा' (गावप्रमुख) सर्व रूग्णांना बोलवून आणायचे. दिवसभर रूग्ण तपासून. संध्याकाळी चार वाजता गावात जेवण आणि परत अपांग. कॅम्पस्मूळे सात आठ दिवस अगदी छान गेले. दिनांक २६ ला परतीचा प्रवास सुरू झाला. दुसऱ्या दिवशी माझ्या केंद्रावर पोहचू असं मनात होते. पण परतताना मोठी दरड कोसळली: बारा कि.मी चा रस्ता संपूर्ण वाहून गेला. त्या रस्त्यात असणारे सर्व मोठे मोठे पूल होत्याचे नव्हते झाले. बसमधील सर्व प्रवासी तेथील रहिवासी होते. त्यामुळे कडा कोसळला होता, पण काय प्रकारचा आहे हे त्यांच्या लक्षात आलं. आणि ते फटाफट आपापलं सामान उचलून चालत निघूनसुध्दा गेले होते. कडा कोसळण्याची मला अजिबातच कल्पना नव्हती. बस हळूहळू रिकामी होऊ लागली तसतशी मी जाणाऱ्या प्रत्येक माणसाकडे आशाळभूत नजरेनं पहात होते की कुणीतरी मला म्हणेल, 'दीदी ! आप हमारे साथ चलिये ! ' पण बहुधा माझ्याकडचे सामान पाहून कुणी असं म्हणायचं धाडस केलं नाही. मागच्या रस्त्यातही कडा कोसळला होता. त्यामुळे बस मागेही फिरणार नव्हती. तिथेच अडकली होती. एक रात्र बसमध्ये बसून कशीबशी काढली.

दुसऱ्या दिवशी सकाळीच बुलडोझर सुरु झालेला पाहिला. आज तरी आपण जाऊ शकू अशी आशा वाटू लागली. पण तेथील मजुरांकडे चौकशी केल्यावर कळलं की ऐंशी ठिकाणी छोट्या मोठ्या दरडी कोसळल्या होत्या. रस्ता साफ व्हायला किमान एक दीड महिना तरी लागणार. शेवटी मनाशी ठरवलं की अगदी आवश्यक सामान बरोबर घ्यायचं आणि चालायला सुरूवात करायची पण असा निर्णय होईपर्यंत दुपारचे १ ते १.३० बाजत आले होते यावेळात एकटं निघणं धोक्याचं होते.

बुलडोझर आणि त्याबरोबरची माणसं पाहून जवळपास कुठेतरी जनरल रोडस् टास्क फोर्स (General Roads Task Force) चा कॅम्प असावा असं लक्षात आलं होते. 'या कॅम्पमध्ये आजची रात्र रहायचं असं ठरवलं. ठरवलं म्हणजे तोच एक पर्याय उपलब्ध होता ! उतरताना उगाच इथे मराठी माणूस शोधूयात' असं वाटलं होतं. बसमधून सामान घेऊन उतरले. क्षणार्धात पावसाने चिंब भिजून गेले. जेमतेम GRTF मध्ये पोहचले. योगायोगाने पुण्याचेच एक श्री. प्रसाद पुरंदरे भेटले. त्यांनी व्यवस्था केली.

सर्व कॅम्प पाहून सुरक्षित वाटत नव्हते. पण दुसरा पर्यायही उपलब्ध नव्हता. तो दिवस रक्षाबंधनाचा होता. जवळ राख्याही होत्या. सर्व जवान व त्यांचे २ Officer यांच्याकडे एकदा पाहिले आणि त्यांना राख्या सरळ बांधून टाकल्या. बहिणीचं नातं जोडलं आणि रात्र निभावली.

दुसऱ्या दिवशी सकाळीच उठून चालायला लागले. अरूणाचल अगदी जवळून पहायला मिळालं. हिमालयाचं रौद्र रूप अनुभवायला मिळाले. एरवी नीळसर काळया हिमाच्छादित सुंदर वाटणाऱ्या उंचच उंच रांगा, त्यावेळी भयाण वाटू लागल्या. ठिकठिकाणी दरडी कोसळल्या होत्या. या भागात रस्ता होता अशी

शंकासुध्दा मनात येत नव्हती. सर्वत्र प्रचंड चिखल. पाय ठेवताना थेट पाताळात जाऊन पोहचू असं वाटतं होते. ठिकठिकाणी मोठमोठी झाडं, वेली आडव्या पडल्या होत्या. चालताना थोडे जरी लक्ष विचलित झालं तरी तोंडावर पडायला होत होते. 'लँड स्लाईड' शेवटी साडेचार पाच तासांनी मजल दरमजल करत पार केला. आता ब्रम्हपुत्रेचा किनारा गाठायचा होता. जीप मिळाली. किनाऱ्यावर पोहचले पण काही क्षणांचा उशीर झाला होता. शेवटची बोट माझ्यासमोर पलीकडे जात होती. आता पुन्हा तिसऱ्या रात्रीचा प्रश्न उभा राहिला. येताना दोन-तीन किलोमिटर आधी एक वस्ती पाहिली होती. तिथे जायचं ठरवले. वस्तीत पोहचले गावबुढाच्या घरामध्ये गेले. दोघांची भाषा एकमेकांना येत नव्हती. पण माझा अवतार पाहून व लँड स्लाईडची बातमी ऐकलेली असल्याने त्यांच्या लक्षात सारा प्रकार आला. त्या घरातील दिदिंनी मला घरात बोलावले. स्वतः विणलेले नवीन कपडे घालायला दिले. माझ्यासाठी स्वयंपाक केला. जेवून मी लगेचच घरातील मुले आणि कोंबडीची पिल्ले यांच्या संगतीत, घराखाली असणाऱ्या डुकरांचा आवाज ऐकत शांत मनाने झोपून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी चार वाजता उठून निघाले. मी उठण्यापूर्वीच त्या दिदींनी उठून माझ्यासाठी अंडी उकडून ठेवली होती. तुला पुन्हा कधी जेवण मिळणार देव जाणे! असं त्यांनी हावभावातून सांगितले. त्यांची भाषा माहीत नव्हती, पण माहीत असती तरी माझ्या भावना मला शब्दांत व्यक्त करणं शक्य झालं असतं का?

या आणि यासारख्या आणखी काही प्रसंगातून इथली शब्दांशिवाय संवाद साधणारी भावात्मक संस्कृती वारंवार भेटली.



## स्वयंप्रेरणा

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती. प्रतिवर्षाप्रमाणे 'स्व'रूपवर्धिनीची पाणपोई सज्ज झाली होती. पाणपोईच्या उद्‌घाटनाची वेळ जवळ जवळ येत होती. पण मुख्य अडचण होती 'पाण्याचीच'! महानगरपालिकेच्या नळांच्याच तोंडचं पाणी नेहमीप्रमाणे पळालं होतं. पाणपोईची व्यवस्था आजोळकडे होती. अजून पाण्याच्या टँकर्सचाही पत्ता नव्हता. तिथं असलेल्या शासकीय व महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना भेटून पाण्याची व्यवस्था लवकर करण्याच्या विनंत्या चालू होत्या. त्यांना 'थंड प्रतिसाद ' मिळत होता. तोपर्यन्त इकडे आजोळमधल्या छोट्या वर्धकांनी मात्र उत्स्फूर्तपणे आपणहून एक वेगळाच उपक्रम सुरू केला होता. आजूबाजूच्या पथारीवाल्यांशी, फेरीवाल्यांशी गोड गोड बोलून त्यांनी काही हंडे, बादल्या मिळवल्या. ससूनमधला आणि बाजूच्या बागेमधला असे दोन पाणीदार नळ शोधून काढले. आणि दोन रांगा लावून अर्ध पाऊण पिंप-जवळ जवळ दोनशे लिटरचं - आपणहून भरून टाकलं होतं. ते सुध्दा पिंपावर स्वच्छ पांढर धोतर टाकून, गाळून, आणि हे सर्व त्यांना कुणीही आदेश वा आज्ञा न देताना त्यांनी करून टाकलं होतं !**

**देशसेवा केली म्हणजे त्यात देवाची भक्ती आलीच. तरी पण थोडे भजन पाहिजे**

# बांधिलकी - 'स्व'रूपवर्धिनीशी

**श्रीमती. जयवंती कलबाग**

'स्व'रूपवर्धिनी हे नावच अर्थपूर्ण आणि बोलकं आहे. 'स्व'रूपवर्धिनीची उद्दिष्टे म्हणा किंवा नकळत घडणारे संस्कार म्हणा; पण ते या संस्थेत येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला कळत नकळत स्वतःत केव्हा मुरले जातात हे समजतच नाही. कारण हा परिवार सर्वांनाच जिव्हाळा आणि आपुलकी देतो. परिस्थितीचा शाप असो अथवा सभोवतालचा ताप असो, सदैव परिस्थितीवर मात करायला शिकविणारी ही कार्यशाळा आहे. एवढेच नाही, तर ती प्रगतीपथावरही आणून सोडते.

ही एक संघटना आहे. तेथील व्यक्तींच्या सहवासातून बरेच काही शिकायला मिळते आणि संस्कार आपल्यात एकजीव होतात. याचं श्रेय जर कुणाला द्यायचं असेल तर या संस्थेतील तळमळीचे कार्येकर्ते आणि व्रती शिक्षक यांनाच ते द्यावं लागेल. त्यांच्या संपर्कात आल्यावर येणारी व्यक्ती कळत नकळत 'स्व'रूपवर्धिनीकउे आपोआप आकृष्ट झाली नाही तरच नवल म्हणायचे? स्वतःला सर्वकाळ संस्थेला वाहून घेणारी ही व्यक्तिमत्वं आहेत. कंटाळा किंवा थकणे या शब्दप्रयोगांना यांच्या लेखी स्थानच नाही.

माझा आणि वर्धिनीचा संपर्क येण्यापूर्वी मी बरंच काही अनुभवलं होतं. सोसलंही होतं. वयाच्या तिसऱ्या वर्षी वडिलांचं छत्र हरवलं आणि जवळ जवळ सर्व आयुष्य स्वतःच्याच हातांनी घडवावं लागलं. आधी मामाच्या घरी मॅट्रिकपर्यंत. तिथून मुंबईच्या के. इ. एम. मध्ये. तेही मामाच्या घरी परतण्याचे सर्व दोर कापून. १०-११ तास काम. शिवाय नर्सिंगचा अभ्यास. खूप अडचणी. आणि यात भर म्हणजे अँग्लो इंडियन सिस्टरची तिरस्कारयुक्त बोलणी. अशी तीन वर्षे काढावी लागली. पण परिक्षेत मात्र उत्तम यश. मग मिडवायफरी कोर्स. त्यातही सुयश. मग दिल्लीच्या कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये 'पोस्ट ग्रॅज्युएट' ट्रेनिंग. पुढे सौराष्ट्र-गुजरात. खूप चांगल्या लोकांचा सहवास आणि अनुभवांचा साठा. तेथून के. इ. एम., पुणे, एक वर्षे कॉलेज ऑफ नर्सिंग, बोस्टन. हा सगळा प्रवास होऊन २८ वर्षे के. इ. एम. नर्सिंग कॉलेजची जबाबदारी पार पाडली. आता निवृत्तीनंतर वर्धिनीत आले आहे.

आपल्या देशातली बालकं ही आपल्या देशाची मानवी संपत्ती आहे. सामाजिक बांधीलकीचा अभाव असल्यानं ज्यांनी जाणतेपणानं या संपत्तीचा उपयोग देशोध्दाराकरिता करायचा तेच ती उधळून लावताहेत. मला हे जाणवलं आणि मी वर्धिनीत रमले.

गृहरूग्ण परिचर्या वर्गाचं (Home Nursing Course) काम मी इथे करते. तेव्हा या मुलींच्यातून, महिलांच्यातून 'स्वतःच्या पायावर उभ्या असलेल्या महिला' वर्धिनीला उभ्या करायच्या आहेत याचं भान मी विसरू शकत नाही. आणि हव्या हव्याशा वाटणाऱ्या या बांधिलकीच्या जाळयात स्वतःला गुंतवून घेते.

# वाढता वाढता वाढे


१९ वर्षांपूर्वी काम सुरू झाले. पहिल्या आर्थिक वर्षाचा एकूण खर्च होता, फक्त २०,८०२.१९ रुपये. मार्च १९९७ ला संपलेल्या आर्थिक वर्षाचा एकूण खर्च आहे रु. १०,१०,८७८.६२. खर्च वाढत वाढत जात सध्या तो दरमहा रु. ६८,०००/- इतका झाला आहे. अर्थात असा खर्च वाढण्यामागे चलनवाढ वगैरे कारणे आहेतच. **परंतु सर्वांत महत्त्वाचे कारण आहे कामातील वृध्दी.** १९७९ साली केवळ १२ मुलांनिशी काम सुरू झाले. आज ८ सायंकालीन शाखा, एक बालशाखा, आजोळ प्रकल्प, ३०० मुलांची बालवाडी, गरजू महिलांसाठीचे विविध उद्योग शिक्षण वर्ग, प्रौढ साक्षर वर्ग, फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प असा कार्यविस्तार झालेला आहे. मार्च १९९७ ला संपलेल्या आर्थिक वर्षाच्या खर्चांकडे एक दृष्टिक्षेप टाकला, तर एक गोष्ट सहज लक्षात येईल की विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे जे आपले प्रमुख उद्दिष्ट आहे, त्या उद्दिष्टांसाठी झालेला एकूण खर्च हा व्यवस्थापकीय व इतर खर्चाच्या तुलनेत खूप अधिक आहे.

'स्व'-रूपवर्धिनीला कोणत्याही प्रकारचे शासकीय अर्थसहाय्य मिळत नाही. सुरुवातीपासूनच वर्धिनीचा भार सांभाळण्यासाठी आपल्यासारख्या हितचिंतकांनी दोन्ही हातांनी भरभरून अर्थसहाय्य केले आहे व याबद्दल आम्ही

**EXPENSE GRAPH FOR THE YEAR 1996-97**

Comparative Graph for Expenses for the year 1995-96 & 1996-97

| Exp. Head | Object | Depreciation | Administration | Property |
|---|---|---|---|---|
| 95-96 AMOUNT | 562533 | 219126 | 62931 | 14015 |
| 96-97 AMOUNT | 732056 | 231810 | 114025 | 12988 |




आपल्याविषयी अत्यंत कृतज्ञ आहोत. वाढत्या कार्यविस्तारामुळे होणारा वाढता खर्च पेलण्यासाठी आपले असेच अर्थसाहाय्य यापुढेही मिळेल असा विश्वास वाटतो. **देणगी देणाऱ्यांसाठी आयकरातून १००% सवलतीची सोय आयकराच्या कलम ८० जी व्यतिरिक्त ३५ ए.सी. अन्वये 'स्व'-रूपवर्धिनीला मार्च २००१ पर्यंत उपलब्ध आहे.**

**धुमसत असताना प्रकट करू नये, पेटल्यावर दिसेलच**

# ✿ आदरांजली ✿

वि. स. खांडेकर आणि आचार्य अत्रे यांच्या जन्मशताब्दीचं हे वर्ष, दोघेही थोर साहित्यिक मराठी मातीतले. या मातीशी एकरूप झालेलें. उभयतांनी या मातीतून उभारलेल्या साहित्यमंदिरात आराधना केली तो विश्वात्मक देवाच्या सर्वव्यापी, सर्वमंगल अन् प्रेरणादायी रूपाची. दोघांच्याही कलाकृतींना राष्ट्रीय पातळीवरचे सर्वोच्च बहुमान लाभले. खांडेकरांची 'ययाती' ही कादंबरी, आणि आचार्य अत्र्यांचा 'श्यामची आई' हा चित्रपट या व अशासारख्या त्या उभयतांच्या अनेक कलाकृतींनी आपणा सर्वांच्या मनाला सुसंस्कारांचे धन देऊन संपन्न केलं आहे. वि. स. खांडेकरांची प्रकाशवाट दाखविणारी काही सुभाषितेही या कार्यवृत्तात समाविष्ट केली आहेत. जन्मशताब्दीनिमित्त या उभय साहित्यिकांना त्यांचं ऋण स्वीकारून, कृतज्ञतापूर्वक आदरांजली अर्पण करीत आहोत.

---

## रणी फडकती लाखो झेंडे ..

*'रणी फडकती लाखो झेंडे अरूणाचा अवतार महा ! विजयश्रीला श्रीविष्णुपरि भगवा झेंडा एकच हा ॥ ' हे गीत ऐकताना आणि त्याहीपेक्षा 'हल्ला फोड' किंवा 'युध्दा'चा जोरदार 'खेळ' झाल्यानंतर, झोंबणाऱ्या जखमा, तप्त कानशिलं आणि घामानं चिंब भिजलेलं शरीर अशा अवस्थेत सर्वांबरोबर जोरदार आवाजात म्हणताना खरोखरच तन-मन रोमांचित कसं होतं हा एक निखळ अनुभवाचा विषय आहे.* ***वि.स. खांडेकरांनी*** *केवळ हे एकच गीत लिहिलं असतं तरीही हा अनुभव घेणाऱ्या युवक-युवतींच्या मनात ते आता आहेत तसेच अजरामर राहिले असते. या गीतांतील वीरश्री अन् चवथ्या कडव्यातील अलौकिकाच्या पातळीवरील उदात्तभावे यांनी खरोखरच हे गीत 'चिन्मंगल' झाले आहे. वि.स.खांडेकरांचे हे गीत या अंकात त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त एक आदरांजली म्हणून मुद्दाम देत आहोत.*

**'रणी फडकती लाखो झेंडे अरूणाचा अवतार महा !**
**विजयश्रीला श्रीविष्णुपरि भगवा झेंडा एकच हा ॥ धृ०॥**

**शिवरायाच्या दृढ वज्राची सह्याद्रीच्या हृदयाची**
**दर्या खवळे तिळभर न ढळे कणखर काठी झेंड्याची**
**तलवारीच्या धारेवरती पंचप्राणा नाचविता**
**पाश पटापट तुटती त्यांचा खेळे पट झेंड्यावरचा**
**लीलेने खंजीर खुपसता मोहक मायेच्या हृदयी**
**अखंड रूधिराच्या धारांनी ध्वज सगळा भगवा होई**
**अधर्म लाथेने तुडवी**
**धर्माला गगनी चढवी**
**राम रणांगणी मग दावी - रणी फडकती लाखो झेंडे ॥ १ ॥**

कधी न केले निजमुख काळे पाठ दाउनी शत्रूला
कृष्ण कारणी क्षणही न रणी धर्माचा हा ध्वज दिसला
चोच मारण्या परव्रणावर काकापरि नच फडफडला
जणू जटायू रावणमार्गी उडत रणांगणी हा दिसला
परलक्ष्मीला पळवायाला पळभर पदर न हा पसरे
श्वासाश्वासासह सत्याचे संचरती जगती वारे
गगनमंदिरी धांव धरी
मलिन मृत्तिका लव न करी
नगराजाचा गर्व हरी - रणी फडकती लाखो झेंडे ॥ २ ॥

मुरारबाजी करि कारंजी पुरंदरावर हृदयाची
सुकली कुठली दौलत झाली धर्माच्या ध्वजराजाची
संभाजीच्या हृदयी खवळे राष्ट्रप्रेमाचे पाणी
अमर तयाच्या छटा झळकती निधड्या छातीची वाणी
खंडोजी कुरवंडी करी प्रेमे प्रभुचरणावरूनी
स्वामिभक्तीचे तेज अतुल ते चमकत राहे ध्वज गगनी
हे सिंहासन निष्ठेचे
हे नंदनवन देवाचे
मूर्तिमंत हा हरि नाचे - रणी फडकती लाखो झेंडे ॥ ३ ॥

स्मशानातल्या दिव्य महाली निजनाथासह पतिव्रता
सौभाग्याची सीमा नुरली उजळायाला या जगता
रमामाधवासवे पोचता गगनान्तरि जळत्या ज्योती
चिन्मंगल ही चिता झळकते या भगव्या झेंड्यावरती
नसूनी असणे मरूनी जगणे राख होउनी पालवणे
जिवाभावाच्या जादूच्या या ध्वजराजाला हे लेणे
संसाराचा अंत इथे
मोहाची क्षणी गांठ तुटे
धुके फिटे नवे विश्व उठे - रणी फडकती लाखो झेंडे ॥ ४ ॥

या झेंड्याचे हे आवाहान 'महादेव हर हर बोला'
उठा हिंदूनो अंधारावर घाव निशाणीचा घाला
वीज कडाडूनी पडता तरूवर कंपित हृदयान्तरि होती
टक्कर देता फत्तर फुटती डोंगर मातीला मिळती
झंजावातापोटी येउन पान हलेना हाताने
कलंक असला धुवुनी काढणे शिवरायाच्या राष्ट्राने
घनचक्कर या युध्दात
व्हा राष्ट्राचे राऊत
कर्तृत्वाचा द्या हात - रणी फडकती लाखो झेंडे ॥ ५ ॥

**आधी प्रेम, मग त्याग, शेवटी शांती**

*आपल्या स्वातंत्र्यसंग्रातील दोन महापर्वांची शताब्दीही यंदा आपण प्रेरणादायी पुण्यमय स्मरण म्हणून साजरी करीत आहोत.*
*त्यापैकी एक म्हणजे २२ जून, १८९७ चं, इंग्रजांच्या राजसत्तेचं प्रतिक असलेल्या रँडच्या वधानं अधिक प्रखर झालेलं, स्वातंत्र्यसंगराचं महापर्व!*
*आणखी एका महापर्वाचे उद्‌गाते सुभाषचंद्र बोस, यांचंही हे जन्मशताब्दी वर्ष!*
*क्रांतीवीर चाफेकर बंधू, नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याविषयीची भावना आचार्य प्र. के. अत्रे यांनी आपल्या सिध्दहस्त लेखणीने स्वातंत्र्यवीर सावरकरांवरील मृत्युलेखात प्रभावीपणे प्रकट केली आहे. १९९७ हे आचार्य अत्रे यांचेही जन्मशताब्दी वर्ष आहे. या सर्वांनाच आदरांजली म्हणून आचार्य अत्र्यांच्या स्वातंत्र्यवीर सावरकरांवरील मृत्युलेख जसाच्या तसा देत आहोत.*

# स्वातंत्र्यवीराचे आत्मार्पण

अखेर आज तात्या गेले; आमचे तात्या सावरकर गेले! मृत्यूशी जवळ जवळ ऐशी दिवस प्राणपणाने झुंज देता देता शेवटी तात्या कामास आले. मृत्यूची अन् तात्यांची झुंज गेली साठ वर्षे चाललेली होती. दहा साली तात्यांनी आपले मृत्यूपत्र लिहिले; तेव्हा त्यांनी स्पष्टच सांगितले की,

**की, घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने**
**लब्ध प्रकाश इतिहास निसर्ग- माने -**
**जे दिव्य दाहक म्हणून असावयाचे,**
**बुध्याचि वाण धरिले करि हे सतीचे !**

तात्या सावरकर कोण आहेत हे पुष्कळांना माहीत नाही. तात्या हे कवी आहेत, कादंबरीकार आहेत, नाटककार आहेत, लघुकथाकार आहेत, निबंधकार आहेत. मराठीप्रमाणे इंग्रजी भाषा त्यांच्या पायाचे तीर्थ घेते. त्यांच्या लेखनाचे एकंदर आठ खंड असून त्यांची साडेपाच हजार पाने होतात. मराठी भाषेत विपुल लेखन करणारे पुष्कळ लेखक होऊन गेले आहेत. हरि नारायण आपटे, विठ्ठल सीताराम गुर्जर, नाथ माधव इत्यादि, पण तात्या सावरकरांएवढे प्रचंड लेखन करणारा एकही लेखक मराठी भाषेत आजपर्यंत होऊन गेलेला नाही. तात्यांची गंमत ही की, ते नुसते क्रांतिकारक नव्हते, ते केवळ कवी आणि कादंबरीकार नव्हते, ते निबंधकार आणि नाटककार नव्हते, ते भारतीय इतिहासातील एक चमत्कार होते. इंग्रजांनी हा देश जिंकून निःशस्त्र केल्यानंतर पौरुषाची नि पराक्रमाची राखरांगोळी झाली. ती राख पुन्हा पेटवून तिच्यातून स्वातंत्र्यप्राप्तीचा आणि देशभक्तीचा अंगार ज्यांनी बाहेर भडकविला, त्या ज्वलज्जहाल क्रांतिकारकांचे वीर सावरकर हे निःसंशय कुलपुरुष आहेत. भारतीय शौर्याचा आणि पराक्रमाचा तेजस्वी वारसा घेऊन सावरकर जन्माला आले. इतिहासाच्या धगधगत्या कुंडांमधून त्यांचा पिंड आणि प्रज्ञा तावून सुलाखून निघाली. सत्तावन्नच्या स्वातंत्र्यसमराची धग देशातून नष्ट झालेली नव्हती. किंबहुना वासुदेव बळवंत फडक्यांच्या आत्मयज्ञाच्या वातावरणामध्येच सावरकरांचा जन्म झाला. **चाफेकर बंधूंनी दोन जुलमी इंग्रज अधिकाऱ्यांचे क्रांतिदेवतेच्या चरणी बलिदान केले त्याच्या प्राणज्योतीने चेतविलेले यज्ञकुंड भडकवित ठेवणे हे आपले कर्तव्य आहे, असा सावरकरांना साक्षात्कार झाला.** घरातल्या अष्टभूजा-देवीपुढे त्यांनी शपथ घेतली की, "देशाचे स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मी मारता मारता मरेतो झुंजेन !" वयाच्या चौदाव्या वर्षी मृत्यूला आव्हान देण्याची प्रतिज्ञा सावरकरांनी केली, आणि ती विलक्षण रीतीने खरी करून दाखविली. सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने जाण्याची केवळ प्रतिज्ञा करून सावरकर स्वस्थ बसले नाहीत, तर त्यासाठी त्यांनी क्रांतिकारकांच्या गुप्त मंडळांची

स्थापना करून श्री शिवजयंतीच्या आणि गणेशोत्सवच्या निमित्ताने क्रांतिकारकांची त्यांनी संघटना निर्माण केली. अग्निरसाच्या कारंज्याप्रमाणे स्वातंत्र्याची ज्वलज्जहाल काव्ये सावरकरांच्या अलौकिक प्रतिभेतून उचंबळू लागली. स्वातंत्र्यलक्ष्मीला 'अरिरुधिराचे स्नान' घातल्यावाचून ती प्रसन्न होणार नाही, या मंत्राची जाहीर दीक्षा देशातील तरुणांना देऊन सशस्त्र क्रांतीची मुहूर्तमेढ सावरकरांनी ह्या शतकाच्या प्रारंभी रोवली, ही गोष्ट महाराष्ट्र विसरू शकत नाही! सात सालच्या अखेरपासून देशात बॉम्बचे आणि पिस्तुलांचे आवाज ऐकू यायला लागले. बाँबचे पहिले दोन बळी आठ सालच्या प्रारंभी खुदीराम बोस ह्या अठरा वर्षाच्या क्रांतिकारक तरुणाने मुझफरपूर येथे घेऊन सशस्त्र क्रांतीचा मुहूर्त केला. सत्तावन्नी क्रांतियुध्दात अमर झालेल्या हुतात्म्यांची शपथ घालून सावरकरांनी भारतामधल्या क्रांतिकारकांना त्या वेळी बजावले की, '१० मे १८५७ रोजी सुरू झालेला संग्राम अद्याप संपलेला नाही. सौंदर्यसंपन्न भारताच्या डोक्यावर विजयाचा देदीप्यमान मुकूट जेव्हा चढेल, तेव्हाच हा स्वातंत्र्यसंग्राम संपेल!' अशा रीतीने वयाच्या अवघ्या पंचविसाव्या वर्षी सावरकर हे भारतातल्या सशस्त्र क्रांतीचे सूत्रधार बनले. आठ सालच्या जुलै महिन्यात लोकमान्य टिळकांना सहा वर्षे काळया पाण्याची शिक्षा झाली. त्यानंतर विलायतेमधील भारतमंत्र्यांचे सहाय्यक सर कर्झन वायली ह्याना एका मेजवानीच्या प्रसंगी मदनलाल धिंग्रा या पंचवीस वर्षाच्या तरुणाने गोळया घालून ठार केले. धिंग्राजी फाशी गेले. त्यांच्या फाशीनंतर अवघ्या साडेचार महिन्यांनी नाशिकचे कलेक्टर जॅक्सन यांना भर नाटकगृहात अनंत कान्हेरे नि त्याचे दोन सहकारी यांनी गोळया घालून ठार केले. त्यानंतर लंडनमध्ये आपले क्रांतिकार्य निर्वेधपणे करणे सावरकरांना शक्यच नव्हते. अडीच महिन्यानंतर त्यांना पकडून 'मोरिया' बोटीतून स्वदेशी पाठवण्यात आले असताना त्यांनी मार्सेल्स बंदरात एका पहाटे पोलिसाचा पाहारा चुकवून बोटीमधून समुद्रात उडी मारली. ही उडी म्हणजे वीर सावरकरांच्या पराक्रमाचा सुवर्णकळसच होय. ही त्यांची उडी त्रिखंडात गाजली. त्यानंतर ब्रिटिश सरकारने सावरकरांवर खटला भरून त्यांना दोन जन्मठेपींच्या शिक्षा दिल्या. त्यावेळी सावरकर अवघे अठ्ठावीस वर्षांचे होते. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाला आंतरराष्ट्रीय स्वरूप देणारे सावरकर हे पहिले क्रांतिकरक होते; म्हणूनच 'भारतीय क्रांतिकारकाचे मुकुटमणी' असे त्यांना म्हटले जाते. क्रांतिकारक सावरकरांचे अवतारकार्य येथे समाप्त झाले. पहिल्या महायुध्दाच्या वेळी जर सावरकर यूरोपमध्ये मोकळे असते, तर 'आझाद हिंद' चा झेंडा त्यांनी सुभाषबाबूंच्या आधी येथे फडकविला असता, ह्यात काय संशय? म्हणून आम्ही म्हणतो की, **भारताच्या सशस्त्र क्रांतीचा सावरकर हे 'पाया' आणि सुभाषचंद्र हे 'कळस' आहेत!** भारतात गेल्या दीडशे वर्षांत अनेक क्रांतिकारक होऊन गेले, पण स्वातंत्र्यवीर सावरकरांसारखा महान क्रांतिकारक आजपर्यंत केवळ भारतातच नव्हे, पण जगात झालेला नाही. वीर सावरकरांनी हजारो पाने लिहिली. उत्कृष्ट लिहिली. तुरुंगांमध्ये दहा हजार ओळी तोंडपाठ करून एका आचाऱ्यामार्फत त्या भारतात पाठविल्या. काँग्रेसच्या राज्यात सावरकरांना काही किंमत राहिली नाही. उलट गांधीजींचे खुनी म्हणून त्यांना पकडून त्यांची जास्तीत जास्त मानहानी अन् बदनामी करण्याचा भारत सरकारने प्रयत्न केला. पण या अग्निदिव्यातून ते सहीसलामत सुटले. मानवी जीवनात असा एक विषय नाही, की ज्यावर सावरकरांनी लिहिलेले नाही. त्र्याऐंशी वर्षांचे जीवन ते जगले.

त्यांना आता जीवनात रस म्हणून राहिला नाही. आत्मार्पण करण्याचे विचार त्यांच्या मनात येऊ लागले. आजपर्यंत महापुरुषांनी आणि

**सेवा करताना 'अ-कृत' भावना असावी, सेवा घेताना कृतज्ञ भावना असावी**

साधुसंतांनी जे केले, त्याच मार्गाने जाण्याचा त्यांनी निर्धार केला. कुमारिल भट्टाने अग्निदिव्य केले. आद्यशंकराचार्यांनी गुहाप्रवेश केला. वैष्णवाचार्य गौरांगप्रभूंनी जगन्नाथपुरीच्या श्यामल सागरात 'हे कृष्ण, हे श्याम' असा आग्रह करीत प्रवेश करून जलसमाधी घेतली. ज्ञानेश्वरानी वयाच्या एकविसाव्या वर्षी आळंदीला समाधी घेतली. समर्थ रामदासांनी शिवरायांच्या मृत्यूनंतर अन्नत्याग करून रामनामाच्या गजरात आत्मसमर्पण केले. एकनाथांनी गंगेमध्ये समाधी घेतली. तुकोबा, 'आम्ही जातो आमुच्या गांवा! आमुचा रामराम घ्या!' असे म्हणत म्हणत वैकुंठाला गेले. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी प्रायोपवेशन करून आत्मसमर्पण करण्याचे ठरविले. कारण, त्यांना ह्या आयुष्यात इतिकर्तव्य म्हणून काहीच उरले नाही.

**धन्योऽहम् । धन्योऽहम्।**
**कर्तव्यं मे न विद्यते किंचित् ॥**
**धन्योऽहम् । धन्योऽहम् ।**
**प्राप्तव्यम् सर्वमद्य संपन्नम् ॥**

***

# आता केवळ यांचा आठव

## कै. सौ. लीलाताई पटवर्धन

'स्व'-रूपवर्धिनी व त्यापूर्वीच्या वेगवेगळया सामाजिक क्षेत्रात काम मोकळेपणाने व झोकून देऊन करावे यासाठी कै. सौ. लीलाताई यांनी ज्या प्रकारची प्रेरणाशक्ती शेवटपर्यंत श्री. किशाभाऊ पटवर्धन सरांना दिली, वर्धिनीच्या कार्यकर्त्यांमध्ये ज्या प्रकारचे संस्कार जागवले त्याबद्दलची कृतज्ञता या श्रध्दांजलीने व्यक्त करीत आहोत.

## कै. सौ. सुमती लेले

'स्व'-रूपवर्धिनीच्या प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यावर अनेकांचे समर्थ मार्गदर्शन हे वेळोवेळी लाभले आहे. कै. सौ. सुमती लेले यांचेही फार मोलाचे मार्गदर्शन वर्धिनीतल्या अनेक वर्धकांना, कार्यकर्त्यांना लाभले आहे. त्यांच्याही स्मृतीस विनम्र अभिवादन!

## कै. सदाशिव विष्णू भिडे

'स्व'-रूपवर्धिनीचे सक्रीय हितचिंतक व एकशे तीन वर्षांचे दीर्घायुष्य लाभलेले कै. सदाशिव भिडे यांना कृतज्ञतापूर्वक श्रध्दांजली !

**ईश्वर मृतात्म्यांना सद्गती देवो !**

# राष्ट्राचा जीवनहेतू

*हिंदुवंशाचा जीवनहेतू आणि त्याचे उद्दिष्ट धर्म हेच आहे. आणि या जीवनहेतूला अजून धक्का लागलेला नसल्यामुळे तो वंश अद्यापही जिवंत आहे.*

*रोमचे उदाहरण घ्या. रोमचे ध्येय साम्राज्यसत्ता आणि त्याचा विस्तार हे होते आणि त्या ध्येयाला धक्का लागल्याबरोबर रोमचे तुकडे तुकडे होऊन ते नाहीसे झाले. ग्रीसचे ध्येय बुध्दिमत्ता, बौध्दिक प्रगती हे होते. आणि त्याला धक्का लागल्याबरोबर मग ग्रीसही नामशेष होऊन गेले. तीच गोष्ट हल्लीच्या काळातील स्पेनची व इतर सर्व आधुनिक राष्ट्रांची आहे. प्रत्येक देशाला जगासंबंधाने एक उद्दिष्ट व जीवनहेतू असतो. जोपर्यंत त्या उद्दिष्टाला धक्का लागत नाही. तोपर्यंत कोणतेही संकट आले तरी ते राष्ट्र जिवंत राहते. पण ते उद्दिष्ट नष्ट झाले, तर मग मात्र लगेच ते राष्ट्र कोलमडून पडते.*

- स्वामी विवेकानंद



कुठल्याही विशेष नामाचे भाषांतर होऊ शकत नाही हा व्याकरणाचा नियम आहे,

**मग हिंदुस्थानचे इंडिया का?** - सखाराम बापू पंडित, मुंबई